नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मकर संक्रांत १९२३

॥ शताब्दी वर्ष ॥


युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक


जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२२



अनुक्रमणिका




चित्रा



ज्योती



पाशा



सेल्फ पोर्ट्रेट

अनुक्रमणिका

मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
वर्ष ७६ वे
जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०२२

युगवाणी

चित्रकार प्रभाकर कोलते विशेष

संपादक
प्रफुल्ल शिलेदार

अनुक्रमणिका

संपादक
प्रफुल्ल शिलेदार

संपादकीय पत्रव्यवहार
प्रफुल्ल शिलेदार, ६अ, दामोदर कॉलनी, सुरेंद्रनगर, नागपूर – ४४० ०१५
ई-मेल : edityug@gmail.com

प्रकाशक
विलास मानेकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

मुखपृष्ठ क्र. १, २ व ३ वरील चित्रे : प्रभाकर कोलते

मुखपृष्ठावरील सुलेखन : शुभानंद जोग

जाहिरात सहयोग : प्रदीप दाते, वर्धा

मुद्रितशोधन : दीपक रंगारी

अक्षरजुळणी व मुद्रण :
माधव लोखंडे, मलय ग्राफिक्स, नागपूर । भ्रमणभाष : ९३२६९९९०१५

युगवाणीच्या वर्गणीबाबत सूचना :
– युगवाणीची वर्गणी आपण 'युगवाणी-विदर्भ साहित्य संघ' या नावाने धनादेशाद्वारे पाठवू शकता.
– युगवाणीची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.

Bank Account :
'YUGWANI-VIDARBHA SAHITYA SANGH'
Bank of Baroda, Sitabuldi Branch, Nagpur
A/c. No.: 04650100 005638
RTGS/IFSC Code : BARB0SITABU
← Fifth Character is 'ZERO'

SCAN TO PAY
WITH ANY BHIM UPI APP
YUGWANI AND VIDARBHA SAHITYA SANGH
yugwa77090@barodampay

– युगवाणीची वर्गणी संपली असल्यास नूतनीकरण अवश्य करावे.

व्यवस्थापन :
वर्गणीबाबत आणि अंक नियमित मिळण्याबाबत संपर्क :
सना पंडित, व्यवस्थापक, युगवाणी, द्वारा : विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल,
झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२ । भ्रमणभाष/व्हाट्सॲप : **७७०९०४७९३३**

प्रकाशनाची कालनियतता : त्रैमासिक (जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑनोडि)

या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये (टपाल खर्च ३० रुपये वेगळा)
वार्षिक वर्गणी : ४०० रुपये, त्रैवार्षिक वर्गणी : १००० रुपये
वि.सा. संघाच्या आजीव सभासदांना युगवाणीचे अंक मिळण्याकरिता विशेष सवलतीत त्रैवार्षिक वर्गणी ५०० रुपये भरणे गरजेचे आहे.

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.

अंतरंग ।

संपादकीय

साहित्य आणि इतर ललित कला यांचा जवळचा संबंध असतो. या मूलतः मानवनिर्मित असल्याने माध्यम बदलले तरीही निर्मिती करणारे मन मानवी जीवनाशी, परंपरेशी, सभ्यता आणि संस्कृतीशी जोडलेले असते. कलांच्या माध्यमात, अंगभूत सौंदर्यात आणि अभिव्यक्ती पद्धतीत वेगळेपण असले तरीही आतून जोडले जाण्याच्या शक्यता खुल्या असतात. माध्यमाचे स्वरूप, अभिव्यक्तीची पद्धती, शैलीवैविध्याची वैशिष्ट्ये, गुणवत्तेचे निकष अशा गोष्टींबाबत सजग राहता आले तर आपल्याला कलाकृतीच्या तळाशी जाऊन त्यातला रस टिपता येणे शक्य होते. थोडेसे प्रयत्न करणे त्याकरिता गरजेचे असते. चित्रकला, शिल्पकला, साहित्य या ललित कला तसेच नृत्य, नाटक, गायन-वादन या प्रयोगजीवी कला यांच्यात कलावंतांच्या पातळीवर देवाणघेवाण सुरू असलेली बरेचदा दिसून येते. छायाचित्र, चित्रपट ही अभिव्यक्तीची प्रभावी कलामाध्यमेदेखील आता समृद्ध झालेली आहेत.

अनेक लेखक रेखाटने काढतात, चित्रे काढतात. अनेकांना इतर कलांमध्ये रस असतो आणि ते त्यातून आपली जाण अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न करीत असतात. विंदा करंदीकरांना तालवाद्यात रस होता. दिलीप चित्रे बहुआयामी कलावंत होते. किशोरी आमोणकर किंवा सत्यशील देशपांडे यांच्यासारखे गायक मराठीत चिंतनात्मक लेखन करतात तेव्हा भाषेत मोलाची भर पडत जाते. लेखकाने चित्र पाहायला हवे, चित्रकाराने कविता वाचायला हवी, दोघांनी संगीत ऐकायला हवे, असे सतत सुरू असायला हवे, जोडले जाण्याचे इतर मार्गही आपल्याला ठाऊक असायला हवे.

लेखकाला अन्य कलांमधून झालेल्या अभिव्यक्तीच्या आस्वादाच्या अनुभवातून काय मिळू शकते याबाबत काही लेखक स्वानुभवातून लिहीत असतात. आपण चित्र पाहतो, छायाचित्र पाहतो, शिल्प पाहतो तेव्हा एका दृष्टिगोचर अनुभवाला सामोरे जात असतो. शब्दांपेक्षा हे माध्यम वेगळे असते. त्या माध्यमावर लेखकाची पकड नसणे शक्य आहे. मात्र प्रत्येक कलेत निखळ सौंदर्यनिर्मितीखेरीज काही कथ्यदेखील असते. या कलाकृती अनुभवत असताना आपल्याला एका पातळीवर शब्दात व्यक्त करण्यासारखे अनुभव येत असतात तर सोबतच काही कलाकृतींबाबत शब्दात वर्णन करता येणार नाही अशीही अनुभूती येत असते. मानवी जगणे अर्थपूर्ण करणाऱ्या गोष्टी साहित्यासोबत इतर कलांमधूनही निर्मित होतात. भाषा हे माध्यम आपल्या स्मृतींना आवाहन करून परिणाम साधत असते. भाषेचा एक गुण असाही एक आहे की भाषा ही इतर कलांबाबतचे विचार आणि चिंतन लिपिबद्ध करून स्थायी रूपात मांडू शकते. भाषेच्या माध्यमातून इतर कलांबाबत देवाणघेवाण शक्य आहे. त्यामुळे भाषा ही या सर्व कलांना सामावून घेणारी असू शकते याची जाणीव असायला हवी. लेखकाला लिहिण्यासाठी जगण्यातून महत्त्वाची रसद मिळत असतेच तसेच साहित्यासोबतच इतर कलांमधूनही त्याला अभिव्यक्तीच्या अनेक दिशा खुणावू शकतात. अभिव्यक्तीचा परीघ वाढवणारी ही फार मोठी शक्यता आपण गंभीरपणे घेत आहोत ना हे पडताळून बघणे गरजेचे आहे.

भारतीय चित्रकलेच्या परंपरेतले महत्त्वाचे चित्रकार प्रभाकर कोलते यांनी नुकतीच वयाची पंच्याहत्तरी ओलांडली. प्रभाकर कोलते यांनी चित्रकलेत महत्त्वाचे योगदान दिलेच; सोबतच त्यांनी महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणूस चित्रसाक्षर कसा होईल याबाबत अत्यंत कळवळ्याने सातत्याने मराठीतून लेखन केले आहे, भाषणे दिली आहेत, कार्यशाळा घेतल्या आहेत. अमूर्त चित्रकलेसारख्या सर्वसामान्य माणसाला प्रथमदर्शनी समजायला अवघड वाटणाऱ्या गोष्टीकडे कसे बघावे याची नेमकी दृष्टी देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यातून बरेच काही साध्यही झाले आहे असे आपण नक्कीच म्हणू शकतो. येणाऱ्या पुढील पिढ्यांवर प्रभाव टाकणारा हा चित्रकार आहे. मराठी समाजास अभिमान वाटावा अशा या चित्रकारावर आम्हाला या अंकात विशेष विभाग करता आला याचा आनंद होतो आहे.

– संपादक

अनुक्रमणिका

दिनकर मनवर यांच्या कविता

प्रदीर्घ यात्रेचं त्रोटक टिपण

या अंतिम मुक्कामावर थकलेले पाय घेऊन
मी मागे वळून पाहतो आहे
पाठीमागे काहीच दिसत नाही
केवळ कोलाहल ऐकू येतो आहे निष्पर्ण झाडांचा
जिथं बसलो आहे तिथून अजूनही खूप दूरवर आहे
स्वप्नातील पिवळ्या गवताचे रान

पाय टाकेल तिथं पाणी निघेल आणि डोळा उघडला तर
खाक होईल सगळं काही अशी धमक आता उरली नाही
नपुंसक काळाला जन्म दिलाय सूर्यानं
तरीही माझ्यातलं लहान मूल मी जपू पाहतो आहे

ज्याला स्पर्श करतो ते मृतवत
वाऱ्याला नाव ठेवून काय फायदा
पाणी तर उताराकडेच वाहात जाणार होतं
पण उजेड कसा काय परावर्तित होत गेला काळोखाकडे
नि स्वप्नांना बुरशी कशी लागत गेली
याचं कोडं उलगडता उलगडत नाही

सुख मरून गेलं याचं दुःख नाही
पण उरात द्वेषाचं रान माजलंय
त्यात जगण्याच्या आसक्तीनं वेडं केलं
कुठलंच दार उघडता आलं नाही मला
मीच एकापाठोपाठ बंद करत गेलो
निर्वाणाच्या सगळ्या खिडक्या

रहस्य उलगडायला निघालो होतो
माझ्या रक्तातून वाहणाऱ्या
तांबड्या पेशीतील हिंस्र पशूचे
पण या अंतिम टप्प्यावर
मला अजूनही कळलं नाही की
त्याचा उगम कुठल्या काळोखात होत राहतो

षड्रिपुपासून माझ्या मनाला वाचवू शकलो नाही
उलट वणव्यात कोवळ्या फुलांचे बहर जाळत गेलो
काहीच मागे ठेवलं नाही निष्पाप डोळ्यांसाठी
एवढी दूर यात्रा करूनही आत्मचरित्राची मोकळी पानं
भरता आली नाहीत मला माझ्यासाठी
काळ्या पाण्याच्या ओघळासारखा
द्वेष वाहात राहतोय तुमच्या परसबागेत
उमलणाऱ्या गुलाबाच्या गंधातून

• • •

इच्छेचा इवलासा कोंभ

देहाचा केंद्रबिंदू इवलासा
त्यातून निघणारी त्रिजाही वीतभर
तरीही आकाशाच्या वर्तुळाची
परिमिती पार करावी म्हणून
किती छेदत राहतो विशाल परिघाला

जेही भेटले त्याला समुद्र दाखवत सुटलोय
गाज ऐकवली मनात दाटून आलेल्या दुःखाची
एकाकीपणाच्या लहरी वाऱ्यावर सोडून
जमेल तसे पतंग उडवीत रमलो स्वप्नांच्या कुशीत

तसं काही नसतं एकच एक घर करून
एकाच खिडकीतून आभाळ न्याहाळत राहावं

अनुक्रमणिका

पायाला पाय फुटतात आवडतं चालायला
रस्ते येतात विनासायास पुढ्यात फुलं उमलतात
हात नसले हातात तरीही मनाच्या विहिरीत
इच्छांचे काजवे चमचमत राहतात दीर्घकाळ

कंठ दाटून येतो रात्रीच्या नीरव शांततेत
कुणाच्या काळजात काटा अडकून पडलेला
निघता निघत नाही उलट सलत राहतो अहोरात्र

जे असतं ते नकोय जे नको ते हवंहवंसं
सगळ्या झाडांवर प्रेम करावं म्हटलं तरी
तेवढं विशाल हृदय नसत असतं आपल्याकडे

किती मोहक असतं सगळं असं म्हणत म्हणत
साध्या साध्या वाक्यांचा उपयोग करता आला नाही
भाषेच्याही पलीकडं अमर्याद पहुडलेलं असतं व्याकरण
त्यात ऱ्हस्व-दीर्घच्या जाचात वाळून जातात देहाची पानं

मागण्यानं हात कोरडे होतात
आणि ओठं सुकून पडतात पिवळे
विश्वाच्या पोकळीत कुणाला तरी वाटतं
आपण तरंगत राहावं आकाशाच्या निळाईत

पण काळ असा कोसळतो आपल्या माथ्यावर की
सगळं वाहून जातं तरीही आत इच्छेचा इवलासा कोंभ
तळमळत राहतोय पृथ्वीच्या अंतःकरणासाठी

• • •

शरीर

शरीरातून एक शहर निघून जात नाही
तोवर दुसरं शहर येऊन वसतं आतमध्ये

शरीर म्हणजे एक प्रकारचं बेटच असावं
थकलेल्या शहराला आराम करण्यासाठी

स्थलांतरित पक्षी यावेत काही काळ
जगणं व्यतीत करण्यासाठी

आणि परत निघून जावेत आपापल्या दिशेनं
तसे या शरीरात शहरं येतात पक्ष्यांसारखे

हे शरीर शहरांनी बहरून येतं
जेव्हा ह्या शरीराच्या हृदयातून
उमलत राहतात पिवळी फुलं

या शरीरात प्रेम येतं दुःख येतं
कधी कधी तर पाऊसही कोसळतो
वादळं उठून सगळी वाताहत करतात
शहराच्या यातनांनी या शरीरात
केव्हा केव्हा तर चंद्राच्या
काळजालाही तडे जातात

कधी कधी तर असंही होतं
की एखाद्या अनोळखी शहराची
अपूर्ण इच्छा स्वप्नं बनून येतात
नि शरीराच्या स्वप्नांत निजून जातात

कवीच्या शरीरात तर कोणतं ना कोणतं शहर
असतंच असतं दडून खोल मनाच्या कपारीत
जे तुम्हाला स्वप्नांच्या रात्री दाखवत राहते
तुमच्या स्मृती नष्ट होत नाहीत तोवर

पण तुझं मात्र उलटंच आहे
तू वेगवेगळ्या शहरांच्या देहात
वेटाळून बसला असून नि स्वतःचीच
शेपटी खात चालला आहेस

• • •

जे काही आहे ते

जे काही आहे ते ते सगळं तूच तूच आहेस अविनाशी
असं समजून सगळं काही प्यायला निघालो होतो
तुझ्या देहातून नदी वाहात होती
नि डोळ्यांतून पूर वाहात होता प्रेमाचा
कल्लोळ एवढा होता सभोवती की माझा मलाच

अनुक्रमणिका

ऐकायला आला नाही आवाज
समुद्र म्हणजे सगळ्या दयाशील नदीचं अंतःकरण
आणि आकाशाची खोल खाई म्हणजे स्वप्नांची बाग

किती भुरळ पडली होती माझ्या पोपटी मनाला
हे रस्ते असे निघून जातात घरातून
परतून न येण्याच्या बोलीवर
सगळ्या फुलांनी बहरून सगळीकडे
सुगंधित करावा आसमंत
तर माझ्या स्वप्नांची थडगी उभारल्या गेलीत सर्वत्र

माझे हात चिमुकले काहीच घेता आले नाही भरभरून
तुला भरभरून द्यायचं होतं पण मला काहीच घेता आलं नाही
रिकाम्या हातानं परतून यावं भरल्या नंदनवनातून
तसा परतून आलोय जिथं हरविली होती माझी कोवळी स्वप्नं

वाऱ्याला हाक मारू की पृथ्वीची याचना करू
की दगडाला पाठीवर वाहात नेऊन ठेवू ढगांच्या पर्वतात
डोळ्यांत काळानं काळोखाचं जणू जाळं विणून टाकलंय
आणि काळजात काटेरी बन उगवलं
ध्यानीमनी नसताना भूगर्भात भूकंपाचे हादरे बसताहेत
पाखरं सैरभैर होऊन परागंदा होत चालली आहेत

जेही पाहिलं त्याची पडछाया
स्मृतिपटलावर पडली आहे उलटी
आणि जे काही बोललो ते कुणालाच ऐकू गेलं नाही
ऐकलं तेही केवळ किरकोळ
ज्यानं दरवाजे उघडले नाहीत सुखाचे

या झोपेच्या अंतिम प्रहरापाशी मी पडून
हातात पृथ्वीगोल घेऊन सूर्यफुलांची आर्जवं करतो आहे
की सूर्यकुळाचं बीज रुजू दे आकाशातल्या जमिनीत
बरसू दे पाऊस या सुकत चाललेल्या सरोवरात
पाहू दे डोळ्यांना जे जे पाहायचं राहिले ते ते दृश्य अदृश्य
द्वैत-अद्वैताच्या कोड्यात नको अडकून पडू दे मन कुणाचेही
ज्याला जे जे हवंय ते ते मिळू दे उघडू दे सगळी दारं
कुणाच्याच अतृप्त इच्छा उरता कामा नये मरणाआधी

शेवटी शेवटी शक्य झालं तर
मलाही होऊ दे रूपांतरित
उगवू दे एखाद्या पठारावर गवत म्हणून
ज्यात कुणी तरी पडून राहीन
कुणाचे तरी अदृश्य हात हातात घेऊन
या पृथ्वीचा सांभाळ करण्यासाठी

• • •

समूळ नष्ट होण्याची वाट

कसलाच आवाज नाहीये की कसलीच हालचाल
जे काही होतं आत ते सगळं आटून गेल्याची स्थिती
डोळ्यांत भिरभिरणारं असं काहीच नाही

रक्त संथ वाहतंय काहीच धडधड नाही
संथ पाण्यावर दगड भिरकावून झाल्यावर
हळूहळू तरंग विरून जावेत
आणि पाणी निमूट पडून असावं तळ्यात
अगदी तसं शांत झालंय मन

केव्हा तरी वसंत ऋतूचं आगमन होईल
हळूहळू पानगळ होऊन माझ्या सर्वांगाला
पळसाची लालफडक फुलं फुलतील
ती मी डोळाभरून पाहिलीत की
माझ्या आतून लालजर्द रंगाची नदी उगवून
तहानलेल्या समुद्राकडे वाहात जाईल

मग मी काळ्या खडकानं
माझे डोळे फोडून घेईन

नंतर मग एकट्यानेच
आंधळा होऊन भटकत राहीन सगळीकडे
कुणीही मला रस्ता दाखविणार नसल्यानं
मीच माझ्या परतण्याची वाट भुलून जाईन

अनुक्रमणिका

रात्र होईल अगदी स्वप्नात होते तशी
रात्रीच्या किर्र काळोखात
रातकिड्यांचे आवाज ऐकत
सगळं अशांतपण शांतपणे अनुभवत
मी माझीच समूळ नष्ट होण्याची
अगदी मनोमन वाट पाहात राहीन

• • •

दिवस

अद्भुत आणि रोमहर्षक असे दिवस आता संपले आहेत
उदासीचं मोहळ लगडलंय मनाच्या सुकल्या फांदीवर
सभोवती मन रमून जाईल असं दृश्य दृष्टीत पडत नाही

आता या वाटेवरून पुढे जाताना मृत्यूचा गंध येतो आहे
पुढे काय माहीत नाही मागे फुलं उरलीयेत तळहातावर
आकाशात अनिच्छेने विझत चालल्या आहेत चांदण्या

विनाकारण एक पिसाट ढग अडकून पडलाय माथ्यावर
पलीकडे कुठे तरी एक गाव आहे त्यात आठवणींचा खच
नदीकाठावर दगड आहे ज्यावर पक्षी बसतो तासन्तास

देहात अखेरची तडफड अडवून बसले आहे जुनाट दार
मागचे काही दिवस पक्ष्यांनी डवरून गेले होते झाडं सुस्वर
लाटांवर स्वार होऊन स्वप्नांचे शीड फडफडायचे वाऱ्यावर

दोन स्वप्नांच्या मधोमध एक पूल असायचा आठवणींचा
तो आता काळाच्या प्रवाहात कोसळून वाहून गेलंय सगळं
तरीही आठवणी येत राहतात तरंगून वाहत्या पाण्यावर

मरणानंतर तसंही काहीच तर मागे शिल्लक उरत नाही
आठवणी जळून जातात चितेसोबत कवटी फुटताना
तरीही किती ही अखेरची तडफड कुठल्या जीवासाठी

• • •

सगळे निसरडे वाळूचे प्रदेश

काळ वाहात जातो ही भ्रामक कल्पना आहे
काळ वाहात नसतो तर आपणच वाहात राहतो
एका जागी बसून आपण पृथ्वीला फेऱ्या मारतो
हे एक सापेक्षवादाचं गुळगुळीत उदाहरण आहे

पृथ्वी फिरत राहते झाडं जागीच असतात मुळांशी
पाणी वाहतं म्हणजे काय असतं नदी वाहात राहते
समुद्र ओढ ओढत नेत नसते नदीला तिच्या जन्मापासून
रंगांचं म्हणाल तर डोळ्यांचा खेळ असतो सावल्यांचा
जो खेळत खेळत आपण पोहचतो काळोखापाशी

समजण्याच्या अर्थाजवळ झरे फुटतात अनेकार्थांचे
शब्दकोशात समानार्थी शब्द गवसत नाहीत अखेरपर्यंत
जुळवून जुळवून किती मेळ बसणार स्वप्नांच्या पतंगाची
दोरी तुटतेच धड वेगळं व्हावं तशा इच्छा गळून जातात
गवताचे तुरे डोलावतात मनाच्या प्रतलातील वाऱ्यावर

कशाला वेड लावून घेतोस सगळं निसरडे प्रदेश वाळूचे
मृगजळांचे आलेख काढता काढता ओठांची ओढ मरते
तुला कसं कळत नाही हे जग काचेचं आहे काच तडकते
तुझ्या हातात ना दगड ना तीर भेदता येईल हे भूमंडल
माशासारखा वाहात राहा वाहत्या पाण्यात जाईल तिकडे
पाणी आटून गेले की जा मरून नको कुणाचे हात हातात

• • •

ही विश्वव्यापी वलये गंधाची

कुठल्याही गोष्टींची कधीच सवय होऊ नये
गोष्टी दूर गेल्या की सैरभैर होऊन जातो जीव

पक्षी फडफडतात झाडे सळसळतात पाणी वाहतं
तरीही गोष्टी येऊन बिलगत राहतात वर्तुळाकार
कोपरे करून छळत राहतात मनात अतोनात

अनुक्रमणिका

मला लहानपणी सावलीची सवय झाली होती
नंतर नंतर कोवळं उन्ह आवडायला लागलं होतं
पिवळ्या फुलांच्या बागेचा शोध तर मला आजही
इतकी वर्षे होऊन गेली तरी सुटता सुटत नाही

कुणाला कशाची सवय लागते हे एक कोडंच आहे
कुणाला विश्वाच्या उत्पत्तीचा शोध घ्यावसा वाटतो
तर कुणाला स्वतःचाच शोध घेत जावं वाटतं मुळांपर्यंत
काहींना तर वाटतं की दगडाखाली प्रेम दडून असावं

गंध अशी गोष्ट की मला जन्मापासूनच लळा लागलाय
पृथ्वीच्या कुठल्या तरी कोपऱ्यातून गंध येत राहतो मोहक
नुकत्याच जन्मलेल्या मुलासाठी आईच्या स्तनातून
स्रवणाऱ्या धारोष्ण दुधाचा गंध तर पाठ सोडत नाही

मला ना जन्म झाल्यापासूनच गंध येत राहतो
सवयच जडली आहे वेगवेगळ्या मोहक गंधाची

हे विश्वव्यापी वलये गंधाची
हे तळातून उगवणारी वर्तुळं
कशाकशाचा हिशेब
मांडत बसलो आहे मी

हातातून निसटून चाललाय वारा
पृथ्वीविभोर केस उडत राहतात
माझ्या सभोवती

जे काही होतं ते सगळं नष्ट होत चाललंय
आता फक्त मनाच्या कोपऱ्यात दडून आहे
सर्वकाही जे कुणालाच सांगता येत नाही
गंध आहे तोवर तू जिवंत राहशील
मृत्यूच्या वाटेवर सैरभैर होशील आठवणींनी

कशाला ऊर बडवून घेतो आहेस
तुझं असं म्हणून आहे तरी काय ?
जे होतं ते तर पांगत गेलंय तुझ्यापासून

कुणाला देतो आहेस आवाज ?
तुझी साद केवळ वारा ऐकत आहे

ते पुरे आहे या नाळ तुटत चाललेल्या
पृथ्वीच्या पोटावर
•••

असेन नसेन

तुम्हाला प्रिय असणारं काहीच नाही माझ्याजवळ
किंवा भूल पाडावी अशी एखादी स्वर्गातील फुलांची बाग
काटेरी रान वाढत चाललं आहे माझ्या अंगाखांद्यावर
तळहातावर कोरडे नक्षत्र बरसत राहतात आणि माथ्यावर
विझलेला चंद्र जो तुमच्या खिडकीला देत नाही आधार

स्वर्ग आणि नरक पाप आणि पुण्य ह्या कल्पनाविलासानं
माझी चौखूर उधळलेली आदिम भूक शमता शमत नाही
फुलांशी गुजगोष्टी ऐकत मी निवांत झोपी जाऊ शकतो
नि मंद वाऱ्याच्या झुळकेनंही चिरनिद्रेतून जाग येते मला
ज्या पाखरांसाठी तुम्ही अंगणात पाणी ठेवता वा दाणे
ते पक्षी माझ्यासाठी आकाशातून स्वप्नं घेऊन येतात

तुमच्या वाट्याचं काहीच नकोय मला नको मला चंद्रतारे
मी माझं मिळवीन मातीतून रक्त शिंपून उगवीन शिवार
तुम्ही निवांत बसून तुमच्या घरात उगवत राहा स्वर्ग
ऐकत राहा सांजसूक्त वा गात राहा पहाटेची अविट गाणी

माझ्या आत द्वेष नाही तुमच्याबद्दल वा दुखत नाहीत डोळे
तुमच्या ईश्वराची शपथ घेऊन सांगतो की तुमचे सुखाचे
इमले पाहून मला आता काडीचीही असूया वाटत नाही

मी असेन नसेन पण माझ्या आतील करुणेचं पाणी
वाहात जाऊन समुद्रातील मिठाचं अमृत करेनच
तुमच्यासाठी
•••

आकाशाच्या मांडवाखाली

मला हव्या असलेल्या
आकाशाच्या मांडवाखाली
मी दोन्ही हात जोडून
तुला प्रार्थना करतोय

अनुक्रमणिका

हे मृण्मयी महामाये
मला तुझे डोळे काढून दे
काही काळ

पाहू दे पाण्यासारखं पाण्याला
नि उजेडाला उजेडासारखं
तुझ्या आत निरंतर उगवणारी ज्वालामुखीची वेल
माझ्या आतून फुटून बहरू दे थंड पडलेल्या पहाडांवर

सुखाला साद घालून
काहीच फरक पडला नाही चिरवेदनेवर
बघ तुझ्या इवल्याशा किमयेनं आनंदाचे
आरोह अवरोह फुटले आहेत पर्णहीन वृक्षांवर

घरांची दारं उडत राहतात वाऱ्यावर
हरेकाच्या अंगणात शुभ्र हत्ती झुलू दे
दगडी भिंती बाजूला सारून मी तुझे हृदय
उघडले आहे या किर्र काळोखात
पापण्यातून पिवळे पक्षी चोचीत गुलाबी कमळं घेऊन
अनाथ लेकरांच्या परातीत भाकर म्हणून टाकू पाहताहेत

बघ कसं गहिवरून आलंय माझं मन ह्या कुरणांसाठी
तुझ्या स्पर्शानं महाभयंकर त्रासातून सुटका होत आहे
या सगळ्या निरागस चराचराची
काळाच्या किंकाळ्यांनी व्यापून गेलं होतं अख्खं आकाश
बघ आता कसं लहान लेकरासारखं झोपी गेलं आहे

मी आंधळ्यासारखा दगडालाच हत्ती समजत होतो
पण तुझ्या डोळ्यांनी निर्वाणाचा मार्ग दिसू लागलाय मला
बघ आता माझी चिवचिव तुझ्या ओठांतून ऐकू येत आहे
सगळं पाणी कसं स्फटिकासारखं प्रसन्न पहाट उगवावी तसं
आता मला संध्याकाळीही पहाट दिसू लागली आहे

• • •

गोष्टी

किती तरी अशा गोष्टी होत्या
ज्या मला पूर्ण करायच्या होत्या
पण एकही पूर्ण झाली नाही
सगळ्याच्या सगळ्या अर्धवट राहिल्या

जसं की मला वाहत्या हवेचा रोख बदलायचा होता
आकाशाचा रंग बदलून चंद्राला चोरायचं होतं
समुद्राचं खारं पाणी बदलून गोड करायचं होतं
एवढेच नाही तर उन्हाला सावलीत बदलून
हरेकाच्या अंगणात सुखाचा पाऊस पाडायचा होता

पण असं होणं कदाचित शक्य नसावं एका कवीला
वा असं असावं की या शतकाची ही
विपरीत प्रतिक्रिया असेल जी आपल्याला
कोणतीही गोष्ट पूर्ण होण्यास रोखत असेल

खरं सांगू तर मला कोणत्या तरी स्त्रीच्या गालावर
सेमलचं झाड उगवायचं होतं
नाही तर या वाकड्यातिकड्या सडकेला सरळ करून
त्यावर मुलांना सूर्याची लोखंडी रिंग बनवून
खेळताना पाहायचं होतं
पण मी असं काहीच करू शकलो नाही
उलट त्या स्त्रीच्या गालावर विस्तीर्ण वाळवंट उगवलंय
नि सडक पहिल्यापेक्षाही जास्तच वाकडीतिकडी होऊन गेली

वा असंही असावं की जगातील
कोणत्याही गोष्टीला बदलायचं नसेल
जसं की माणूस माणूसच बनून राहतो
दगड पण दगड बनून जगत राहतो शेवटपर्यंत

कोणतीही गोष्ट पूर्ण न होणं
प्रत्येक माणसाच्या आयुष्यात
शाप बनत चालली असेल

नाही तर कुणी कशाला आपल्या
खोलीची खिडकी बंद करून
वाहत्या वाऱ्याला कोंडून ठेवत असेल

• • •

स्पर्श

किती साध्या साध्या स्पर्शांनी
रोमांचित होत राहतो आपण

देहाचा स्पर्श असो की फुलांचा किंवा जमिनीचा
पाण्याच्या स्पर्शात तर दडून असतं प्रेम पृथ्वीचं
स्पर्शामध्ये जणू चंद्राचं शीतल हृदयच
चादर होऊन प्रतीक्षा करत असते उन्हाची

किती किती पवित्र असतात स्पर्श सगळे
किती तलम असतात स्पर्श सुखावणारे
परीच्या वा फुलपाखराच्या पंखाहूनही
अद्‌भुत असतात अंत:करणाचे स्पर्श

ज्याचे हात स्पर्श करतात पृथ्वीच्या पायांना
त्याच्या देहातून तर स्वर्गीय सुख
ओतप्रोत भरून वाहात राहते रात्रंदिवस

स्पर्श कधीच नष्ट होत नाहीत
की करता येत नाहीत जाळून खाक
स्पर्श तर मृत्यूच्या अखेरपर्यंत
तगमगत असतात गाईच्या डोळ्यांत

जमिनीच्या आत दडून असलेल्या झऱ्याला
स्वप्नातही चुकूनही स्पर्श केला कुणी तहानेनं
किंवा व्याकूळ झालेल्या माणसानं
तर त्याला कळून येईल की
तहानेतूनच जन्म घेत असते निरागस पाणी

मला स्पर्श आवडतात
पण तुम्ही म्हणतात तसे नाहीत

मला आवडतात अस्पृश्य स्पर्श
किती अनाघ्रात असतात सगळे

अस्पृश्य स्पर्शात आग असते निद्रिस्त
गोठून असतो रंग लालभडक पळसफुलांचा
सूर्याच्या डोळ्यातील धगधगता जाळ तर
कायमच अस्पृश्य असतो डोंगरदऱ्यातील काजव्यांना

कुणालाही सांगायचं नव्हतंच मला कधीही
दगडाखाली गवसलेलं अस्पृश्य स्पर्शाचं रहस्य
पण आता शुक्राची चांदणी मावळत असताना
ती विचारते आहे म्हणून सांगतो
अधिर होऊन जेव्हा मी पृथ्वीच्या ओठांचं चुंबन घेतलं
तेव्हा एकाएकी तुझे ओठ मधुर झाले सकळ
आणि मी वैशाख वणव्यात बहरलेला पळस

शेवटी अस्पृश्य स्पर्शाचंही रहस्य असतं
कोमल स्पर्शाहून अगदी कठोर
जे मला कळून चुकलेलं आहे या कठीण काळात
त्यात तुम्ही तर आता स्पर्शाचं पिठूर चांदणंही
आकाशाच्या सुपातून पाखडत चालले आहेत

• • •

स्वप्नांचं दार

स्वप्नांचं दार उघडून कितीही झोपी गेलो तरी
जे इच्छित असतं ते काही स्वप्नात येत नाही

म्हणजे खिडकीतून उतरून पलीकडे जाऊन
डुंबत राहायचं नदीच्या निळ्याशार पाण्यात सुखनैव

तोडून खायाची मनमुराद मधुर वृक्षांची पिवळीधम्म फळं
ढगांसोबत विहरत मनसोक्त विसरायचं दुःख सगळं

परतण्याची वाट भुलून भटकत भटकत अज्ञातात जाऊन
कुणालाही सापडू नये असं देहभान विसरून जायचं हरवून

या इकडच्या जगात प्रेम नाही
सगळं दुःखच दुःख यातनांचे पहाड
कष्टांचे महासागर नि सुखाच्या
कोरड्या विहिरीच विहिरी

या सगळ्यापासून सुटका करून घेऊन
चिमुकल्या दगडात
जे फूल अप्राप्य असतं
ते फुललेलं पाहून मन भरून येऊ द्यायचं

पण हे स्वप्नांचं दार कुणी टाकलंय बंद करून कायमचं
जे उघडता उघडत नाही उलट नवशे दारांच्या आत निद्रिस्त

मला काय नि तुला काय वासनेच्या पलीकडे जाऊन
देहात देह मनात मन नि चैतन्यात चैतन्य द्यायचं होतं विरघळून

आता हे स्वप्नांचं दार तर जाऊ दे
एवढीशी खिडकीसुद्धा कुणी उघडी ठेवलेली नाही
कसा येईल वाहात वारा मुक्तीचा उडवून नेईल पारा
आत चिकटलेला इंद्रियांचा

• • •

खरं तर त्या तिथे

खरं तर त्या तिथे एक नदी असायला हवी होती
एक दगड पहारा देत सभोवतीच्या प्रदेशावर

त्या तिथं एक माणूस असायला हवा होता एकटाच
हातात हात घालून नदीच्या काठाकाठाने फिरताना

एक पक्षी हवा होता आकाशात घिरट्या घालत
एक संध्याकाळ नदीत अलगद उतरत असणारी

आणि पाणी स्वतःला जपत जंगलातून वाट काढत
चंद्राच्या सोबतीने रात्रभर आवाज ऐकत स्वतःचाच

खरं तर त्या तिथे तू पण असायला हवी होतीस
एकटीच माझ्यासारखी भटकत मृगतृष्णेच्या शोधात

• • •

(भ्रमणभाष : ८१०८६८३९१९)

अनुक्रमणिका

सौमित्र यांच्या कविता

एक दिवस म्हणतील – १

झालं आता
कुठेच उरलं नाहीय् खोदायचं
माणसंही राहिली नाहीत
पहिल्यासारखी खोदणारी

हे मलब्याचे ढीग हटवायचे तरी कशाला
जातील वाहून पावसात उडतील वादळात
नाही गेले तरी तुम्हाला
सवय होईल हळूहळू याचीच
आता या खड्ड्यांच्या शहरातच जगा
तुमचं तुम्ही बघा
आम्हाला तर निघायलाच हवं

अजून कितीतरी एरिया
कव्हर करायचाय
ग्रामीण वगैरे...
प्रगतीची वाट दाखवायचीय् राष्ट्राला

बघून घ्या शेवटचं एकदा
चेक करा सगळी जमीन
खात्री करून घ्या की
कुठेच उरलं नाहीय् खोदायचं

एक दिवस म्हणतील – २

बंद करा ते इंजिन
इंधन वाचवा थोडं
आता हे ट्राफिक बिलकूल
हलणार नाहीय्
पुढली कितीक वर्षं

वाजवू द्या लोकांना हॉर्न
कितीही वेळा कितीही जोरात
तुम्ही गप्प राहा
आजवर वर्षानुवर्षे राहिलात तसे

शहरं घट्ट झालीयेत
सगळं पॅक झालंय
बम्पर टू बम्पर
च्युतियाटिक

हे रस्त्यांचे पट्टेही वर्षानुवर्षे
सडून अडकून गेलेत एकमेकांत
खूपच चढलाय गंज त्यांच्यावर
अनेक प्रकारच्या स्पर्शांचा पावलांचा

ही मैलोन् मैल ट्राफिक थिजून गेलेली
सबवेज् हायवेज् अंडरग्राउंड
गल्ली बोळात अडकलेली

शहरभर ट्रका रिक्षा कार्स बसेस
अँब्युलन्सेज् मोटर बाईक्स्
सायकल्ज् स्कुटर्स सारी
जागच्या जागी खिळलेली

सगळी माणसं हॉर्न वाजवून
शिव्या देऊन आरडाओरडा करून
तिथल्यातिथे गुदमरून
वेडसर होण्याच्या सीमेवर
रस्त्यावर आपापल्या गाड्यांत
हताशपणे बसून राहिलेली

काही जिवंत काही मरायला टेकलेली
वाहनं सोडून निघून गेलेली कधीचीच
कितीक वर्षं घरीच न पोहचलेली

ट्रकं टॅक्स्यं बसेस् कार्स
उन्हात तापणाऱ्या अँब्युलन्सच्या डब्यांत

अडकलेले अगणित पेशंट
स्मशानाकडे निघालेल्या शववाहिन्या
कोंडलेली गुदमरलेली होरपळलेली माणसं

भ्रमिष्ट होऊन वाहनं सोडून
पायीच निघालेली तरी
रस्ते सापडत नसलेली
हरवून वाहनांच्या गदारोळांतून
भलत्याच प्रदेशात निघून गेलेली माणसं

अख्खं शहरच ठप्पं झालेलं
थांबलेलं खोळंबलेलं अडलेलं
तुटलेलं संपुष्टात आलेलं
मिटलेलं संपलेलं
रुतलेलं छोट्या मोठ्या खड्ड्यांत

पण तेही अडकलेत
त्यांच्या त्यांच्या भिकारचोट रहदाऱ्यांमध्ये
ते कसले शोधणार
कुठल्या काळात कुठली गाडी
कुणी कुठे घातलीये कशी
त्यांचं त्यांनाच कळेना अजून
फर्स्ट सेकन्डमध्येच चाललेत कधीपास्नं
रिव्हर्स गियरही विसरलेत
त्याला कोण काय करणार

तर ती एक गाडी सापडली
की आम्ही मोकळं करू सारं
तुम्हाला कळलंच असेल आतापर्यंत
आम्ही जबाबदार नाही या गदारोळाला

तोवर या ट्रॅफिक जॅमचंच एक शहर
किंवा राष्ट्र किंवा एक वस्ती
किंवा एक मुहल्ला समजून
तुम्ही जगायला सुरुवात करा

सुरुवात करा काय...
एक दिवस म्हणतील
तुम्ही समजूतदार असाल तर खुशाल इथेच मरा
आम्ही वरून पाहात आहोतच ना
दिसेल तुमचा धूर वर वर येताना

एक दिवस म्हणतील – ३

आमचा जमिनीशी संबंध नव्हताच कधी
आम्ही आकाशातूनच पोहचलोय् थेट इथे
आपापल्या परीनं आपापल्या ठिकाणी
आता प्रयत्न करत आहोत आम्ही
हे सगळं मोकळं करण्याचा

कुठल्या तरी एका फाल्तू क्रुकेड माइंडेड
वेडसर माणसाच्या चुकीच्या पार्किंगमुळे
हा अख्खा ट्राफिक जॅम झालाय्
खूप शतकांपासून
तुम्हाला तो आता दिसतो आहे एवढंच

हिस्टोरियन्स आर्कियॉलॉजिस्ट
इकॉनॉमिस्ट बायोलॉजिस्टांना
त्यांच्या जुन्या भानगडी घोटाळे बाहेर काढून
त्यांनाच अज्ञानी ठरवण्याच्या धमक्या देऊन
लावलंय कामाला

एक दिवस म्हणतील – ४

कोण म्हणतं तुम्ही इतकी वर्षं
सरकारची नोकरी केलीत
तुमचं बायोमॅट्रिक तर
गेल्या काही दिवसांच्या
दाखवत नाहीये नोंदी

आधी भलेही केली असेल नोकरी कितीही
आम्ही तर आतापासूनचाच काळ

अनुक्रमणिका

मोजू शकतो ना

गेल्या सत्तर वर्षांतलं
आम्हाला काय करायचंय
तसंही काय घडलंय
गेल्या सत्तर वर्षांत या देशात
ही प्रगती सगळी आम्हीच तर केलीये
आता नावं बदलावी लागतात गावांची, योजनांची
जसे बदलावे लागतात फोटोही
सरकारी ऑफिसांतले सगळ्या
तशी पद्धतच आहे गेली कितीक वर्षं

पुरावा हवा असेल तर
फिरून तर या बाहेर जरा
काय बिशाद तुम्ही परत पोहचाल
जिथून निघालात तिथेच पुन्हा

नशीब समजा तुमचं
तुम्हाला जिवंतपणी मरणाचा दाखला देऊन
नाही करत तुम्हाला नाहीसं

एकदा निघून तर पाहा बाहेर
अहो खड्ड्यांचं सोडा हो
त्यांनीच खणले होते हे गेल्या सत्तर वर्षांत
आता दिसताहेत तुमच्या नजरेला
आणि तसेही आपण
खड्ड्यांतच राहात आहोत की वर्षानुवर्षं

आता आम्ही फक्त तुम्हाला त्यात घालून
माती लोटणार शेवटची
मग कुठे असणार तुम्ही...
तुमचं आधार... वगैरे वगैरे

एक दिवस म्हणतील
तुम्ही असला तरी
बिघडून बंद पडलेल्या मशीनवरच
आमचा विश्वास आहे जास्त

द्या अंगठा द्या इथे
अरे ?
अंगठा कुठेय तुमचा ?

तुमचं काय
सवय आहे तुम्हाला
शतकानुशतकं

गोष्ट

एखाद्याच बातमीचा होतो
क्वचित अग्रलेख
एखाद्याच क्वचित वर्तमानपत्रात
आजच्या वृत्तांताचं अस्तिव उरत नसतं
उद्याच्या ठळक बातमीनंतर

मला बातमी व्हायचं नाहीये
जी पेरली जाऊ शकते
केली जाऊ शकते एडिट
वाजवली जाऊ शकते पगारानुसार
बदलली जाऊ शकते हुद्द्यानुसार

बातम्यांच्या गोष्टी करून
गोष्टीतल्या गोष्टीतली गोष्टच
अधांतरी लोंबकळत ठेवून
मनोरंजक माहिती होण्याच्या काळात
रिपिटेटिव्ह बातमी व्हायचं नाहीये मला

गोष्ट व्हायचंय
परंपरा होत जिचं मिथक होईल
वाहत्या प्रवाहात

लहान मुलांच्या पुस्तकातल्या
निखळ आनंदासारखी गोष्ट
होण्यात रस आहे मला
घाई नाहीये बातमी होण्याची

अनुक्रमणिका

सार्वजनिक आपण

कुणी ऐकणारं नाहीये का
बोलणारं नाहीये का कुणीच
नुस्त गप्प राहणारं नाहिये का कुणीच
कुणीच नाहीये का आसपास

मग ही इतकी माणसं का आहेत
जी बोलताहेत कुणाशी
ऐकताहेत कुणाचं
कुणी आहे समोर तरी
का बोलताहेत ती सतत फोनवर

की ओळखीचं आहे कुणी
म्हणून बोलत नाहीयेत
मग अनोळखी माणसाशी
कशी बोलू शकतात ती इतकं

कुणाचा चेहरा आठवतात ती बोलताना
की करताहेत कल्पना
एखाद्या अनोळखी चेहऱ्याची
ओळखीचा चेहरा लावून

फोन संपल्यावर
ओळखीच्या माणसांशी
कसं वागायचं बोलायचं

ती अनोळखी व्यक्ती
कधी भेटलीच दिसलीच तर
खऱ्या व्यक्तीचं काय करायचं

की तीदेखील झालेली असेल तोवर
फेसबुक व्हाट्सअॅप ट्विटर...

आता कशाला लिहायचे अभंग
कशाला फिरायची मंदिरं
शोधायचे स्पर्श
कशाला गंध श्वासायचे
नाती जपायची
प्रेमात पडायचं भांडायचं
आता कशाला हवीत जिवंत माणसं
असली तरी त्यांना जिवंत कसं समजायचं

माणसांनी नात्यांनी गप्पांनी
स्पर्शांनी गंधांनी आपण भरलेले तुडुंब
आता उरलोय आपण एकटे
रोजच्याच सार्वजनिक जगण्यात

कालकल्लोळ

१.
रूममध्ये एसी फुल्ल करून
गाढ झोपण्याच्या प्रयत्नात असतो
नाईट लॅम्पसकट सगळे दिवे घालवून
पांघरून घेतलेली असते रजई
कुठलीच फट नसते ठेवलेली
थंडगार काळोखही पोहचू नये म्हणून

मध्यरात्र नुक्तीच उलटून
उत्तररात्र संथपणे पंख फैलावत असताना
खोलीत अधूनमधून
एसीच्या वाऱ्याचाच
काय तो आवाज येत असतो

२.
काही अंतरावरच
एस्टी स्टॅण्डवर खडखडाट करत
येतजात असतात किती तरी एस्ट्या
बसलेली असतात माणसं
धावत असतात चहा घेत असतात
खात असतात
तंबाखूचा बार चोळत असतात

अनुक्रमणिका

बोलत असतात फोनवर काही
बघत असतात इकडेतिकडे

झोप नावाचं श्वापद
दबकत फिरत असतं या सगळ्यांमधून

३.
रेल्वे स्टेशनवर
अगणित प्रवाशांना घेऊन
सतत येत-जात असतात रेल्वेगाड्या

सगळ्या प्लॅटफॉर्मज्वर झोपेची
एक अदृश्य चादर पसरलेली
लोकांना झालेल्या घाईने
अधूनमधून विस्कटत जाणारी
तिच्यात अडकून काही जण
प्लॅटफॉर्मवर बसल्याबसल्याच कलंडतात

लाल डगले सवयीप्रमाणे फिरत असतात
कधी रिकामे कधी ओझं वाहात परक्यांचं
वेटिंगरूममध्ये एकमेकांना चिकटून बसलेली माणसं
त्यांचं पापण्याजड सामान

मधूनच ऐकू येणारी
रेल्वेची अस्पष्ट घोषणा
कॅन्टीनच्या जर्मन थाळीतल्या
उरल्यासुरल्या भज्या-वड्यांवर
घोंघावत असतात माशा
चहाच्या कळकट भांड्याला
येत असते अधूनमधून पेंग
बरणीतल्या नानकटायांचे डोळे
सताड जागे राहून गेलेले खोल
थाळीतल्या पिचलेल्या कचोऱ्या
चिंचेच्या चटणीचं बरबटलं भांडं
काचेच्या कपाटातल्या
कोल्ड्रिंकच्या पाण्याच्या बाटल्या
या साऱ्यांवर पसरलेली
झोपेची एक संदिग्ध पेंग

४.
दूर कुठे आकाशात प्रचंड पंख फैलावत
अलगद खाली उतरत असतात विमानं
चाकं जमिनीला टेकताच
दोन्ही पंखांची पिसं उघडून
धुंवाधार हवा सोडणारी

विमानात सतत
ताजं हसू उगवणाऱ्या हवाई सुंदऱ्या
गंड देणारे उंचेपुरे गोरेगोरे इंग्रजाळले फ्लाईट पर्सर
प्रशस्त पसरलेल्या विमानतळावरल्या
आपसूक हालचाली
थंडगार लॉब्यांमधली ग्लोबल दुकानं
गार सोफे खुर्च्या
आवाज न करता वरखाली सरकणारे जिने
त्यावरती हवेत स्लोमोशन उडणारे
डिग्निफाईड पोशाख
मधूनच मधाळ आवाजात सूचना देणारी
अदृश्य मुलगी

चहाकॉफीचे मद्याचे सेंट्सचे दर्प
तळपायाखालची मऊसर पांढरी संगमरवरी जमीन
रस्त्यांवरल्या स्टॅन्डवरल्या
प्लॅटफॉर्मवरल्या माणसांपेक्षा
आपोआपच उंच अभिमानी वाटणारी
गोरी काळी गव्हाळ टापटीप माणसं

वर आकाशात
प्रचंड वेगाने कुठे कुठे निघालेल्या
अनेक पातळ्यांवर उडणाऱ्या विमानांचं जाळं
अवाढव्य विमानं पोटात घेऊन
अलगद् बाहेर सोडणारे ढग

५.
आपण गाढ झोपेत शिरल्यावरही
चालू असतं जग
आपल्या पांघरुणातल्या उबेला

अनुक्रमणिका

वेधून घेणाऱ्या बाहेरच्या गारेगार काळोखाला
नसतो त्याचा पत्ता

सकाळी उठतो ताजेतवाने
तेव्हा ट्रेन्स बसेस एस्ट्या वहानं विमानं माणसं
पोहचलेली असतात कुठे कुठे आपापल्या जागी
सरकलेलं असतं जग दोन पावलं पुढे

अर्धवट गुंगीत ढगाळ चालत
उघडतो बाथरूमचं दार
आरशासमोर उभं राहून
चेहऱ्यावर मारताच पहिला हबका
उडतात काही थेंब आरशावर

ब्लॅक कॉफीचा मग हातात घेऊन
उघडतो दार बाल्कनीचं तर समोर
विस्तीर्ण हिरवी शांतता पसरलेली
पहिला घोट घेतो कॉफीचा
आणि नजरेचा घोडा
विस्तीर्ण हिरवाईवरून दौडत जाऊ लागतो.

ओळख

आज
खूप वेळ राजकारणावर बोल्लो
एका खूप जुन्या मित्राशी

इतका की रस्त्यावर उभ्या उभ्याच
वर्तमान पारतंत्र्यात कधी गेला
कळलंच नाही

खरं तर
मला तुझा विषय काढायचा होता
जो निघालाच

तू कुठे असतेस काय करतेस
कशी दिसतेस वाचतेस काय पाहतेस
तुलाही झाला असेलच कोरोना
व्हॅक्सीन घेतलंस का बूस्टर

लॉकडाऊनमध्ये
काय बदलं तुझ्यात
तिकडच्या लोकांत वातावरणात
हे सगळं बोल्ता बोल्ता
तूच राजकारण झालीस

आधी राजकारणात नव्हे
प्रेमात इंट्रेस्टेड होतो मी
कुणास ठाऊक कधी
प्रेमात राजकारण शिरलं
आणि गोंधळच उडाला सगळा

आता भेटशील तेव्हा
तू नसशील तशीच
नाही राहिलो मीही तसा

कुठल्याही काळात
कसेही दिसलो असलो कसेही तरी
प्रेम तसंच राहील असं
शाश्वत नव्हतंच का काही
आपल्यात

हत्या की...

काय झालं नक्की...
बोलत होतो
कदाचित कविता म्हणत असेन एखादी

मागून एक गोळी आली
मेंदूतच शिरली थेट
उजव्या बाजूनं

अनुक्रमणिका

हेलिकॉप्टरनं
हॉस्पिटलमध्ये नेलं
नंतर मेलो असं जाहीर केलं कुणीतरी

समोर माझे लोक
मागेही माझेच लोक होते
तरी कायम
मागे असणाऱ्यांबद्दल बोलल्यानंतरच
समोरच्यांबद्दल बोलायचो
दोघांच्या बरोब्बर मध्ये असायचो मी

मग कशासाठी मारली गोळी
कुणाला दुखावलं होतं मी
आणि फरक कुणाला पडला
अमेरिकेला रशियाला चायनाला
भिंतीवर टांगल्या नकाशाला
राज्यातल्या पक्षांना नेत्यांना
कार्यकर्त्यांना लोकांना कुणाला
फक्त जगात हत्या झालेल्यांच्या यादीत
माझंही एक नाव जोडलं गेलं बास्स

मृत्यू सहज घडणं
आत्महत्या करणं
एखाद्याला मारणं
मग ती हत्या होती सांगणं
हे सगळं वेगवेगळं असतं

खून झाला असं लहानपणी ऐकायचो
अलीकडे हत्या झाली असं ऐकतोय
खून सामान्य माणसाचा होतो
हत्या मात्र
कुण्या मोठ्याचीच होत असते

आता
मी कोण होतो
आणि माझा खून झालाय
की हत्या
हे तुम्हीच ठरवा

चालणं

वडील जाण्याआधी नेहमी
गावाला जाऊन यायचंय म्हणायचे
वास्तविक त्यांना परतायचं होतं तिथे
की गावाला जाऊन पुन्हा
इथे परत पोहचायचं होतं
याबद्दल संभ्रम घेऊनच
मीही चालतो आहे

कुठे गेलो होतो
कुठे चाल्लो आहे
कुठे जाणार आहे याबद्दल
काहीच कल्पना नाही मला

फक्त परतायचं आहे कुठंतरी
एवढंच आठवतंय अंधूक
तरी कुठे ते कळत नाहीय

चालतोय ते जाण्याच्या दिशेने
की परतण्याच्या
काही उमजत नाहीय

चाललोय फक्त
कुठे पोहचेन माहीत नाही
जिथेही पोहचेन तिथे
आलोय की परतलोय हेही
ओळखू शकणार नाही

पोहचण्याच्या
आणि परतण्याच्या सीमेवर
चालतो आहे
चालतोच आहे

मला परतायचं आहे कुठतरी

याचं भान आहे
तोवर मी चालत राहीन
फक्त चालत राहीन

जेम्स बॉण्ड...

जोवर इतिहास स्वतः
येत नाही समोर व्यक्ती म्हणून
दावा करत नाही मीच तोच आहे
ज्याबद्दल बोलताहेत सगळेच

इतिहासकार अभ्यस्त बोलताहेत
माणसांनीच लिहिलेलं वाचलेलं
पुस्तकं लिहून वाचून बोलताहेत सारे
माझ्या बद्दल पण मी तोच आहे
ज्याबद्दल बोललं जात आहे

बदललं जात आहे रचलं जातं आहे
रचवलं जातं आहे रुजवलं सजवलं
भिजवलं आठवलं पाठवलं नासवलं
गाजवलं माजवलं जातं आहे

काल मी कोर्टात गेलो होतो तेव्हाची गोष्ट
माझं एफिडेविड करायला
त्यांनी सर्व प्रथम माझा मोबाईल
आधारकार्ड पॅनकार्ड मागितलं
मी दिलंही सगळं पण त्यांच्याकडे
सगळं वेगवेगळं होतं कॉम्प्युटरवर

जवळच्याच पोलीस ठाण्यात गेलो तेव्हा
कुणाविरुद्ध नोंदवायचाय गुन्हा
असं विचारल्यावर
खोट्या इतिहासाविरुद्ध असं मी म्हटलं

तुम्ही कोण
मी खरा इतिहास
कशावरून ?
हा मी आहे ना तुमच्यासमोर उभा
पण तुम्हीच खरे कशावरून ?
बरं तुम्ही खरे कशावरून ?
असं मी विचारताच त्यांनी
माझ्या कानफटात एक लगावली सन्नकन्
तेव्हा त्यांचा हात
आरपार गेला भूगोलातून

त्यांना कळलंच नाही काय होतंय
पण मी कुणीतरी आहे एक
याची दखल घेत त्यांनी
एक अदखलपात्र गुन्हा नोंदवून घेतला
आणि ती कॉपी मला दिली आहे...

अशा अदखलपात्र गुन्ह्यांच्या
करोडो फायलींची रद्दी जमा आहे
माझ्यात हे त्यांना ठाऊकच नाही

पण मी इतिहास आहे
कधीतरी मी दखलपात्र होईन
या विश्वासावर अजूनही
मी नव्यानं माझी ओळख सांगतो
प्रत्येक व्यवस्थेला माझी

हाय !
बॉण्ड... जेम्स बॉण्ड ..
•••

(kiishorkadam@gmail.com)

राहुल पुंगलिया यांच्या कविता

पाहुणे

ह्या रोंरावत्या नद्या
स्पष्ट बोलत्या,
रस्ते, जगण्याचे तगण्याचे,
शोधत आलेत, झोपेतून उठवायला.

तर
आता उठून बाहेर पडावे लागेल
चंद्रकोर सदऱ्याला लावून
हिंडावे लागतील गल्लीबोळ
हे सघन शहराचे दुरापास्त अवयव
शोधत जाणे
सतत न सापडलेल्या घरांच्या दारातून परतणे.
हे सांज वेळेचे दुखरे गाणे.

दिवसांची वळचण
जिथे मनाची मांजरे
निजली आहेत हिंडून थकून
जिथे झुंबरांचे दिवे लागायचे कधीकाळी
तेथे
आता डोळ्यांची झुंबरे
मनाच्या खोल्यात तेवत आहेत.

थकल्या मनामध्ये
येऊ नयेत कधी
असे पाहुणे
असे पाहुणे आलेत वस्तीला.

• • •

फांद्यांवरील उजेडाची शाई

फांद्यांवरील उजेडाची शाई
अजून वाळली नाही
मग ही कसली घाई ?

अद्यापि डोळा लागला नाही
आकाशाचे सात रिते घुमट
अजून गजबजले नाहीत
तरीही हे कोण
येत आहेत तिघेजण
इकडे चालत ?

का बघू नये वाट अजून ?
पिंपळ पानांवरील विरजले नाही दही
मोतीया पंखांना लागण झाली नाही.
वाटाही अजून संपल्या नाहीत
आम्ही जरी कधी त्या जपल्या नाहीत.

अजून घरांना आहेत कुलपे
होती तशीच
मांजरांना ओलांडायची आहेत छपरे
उंचावून शेपट्यांची अर्धवर्तुळे
शब्द रिते झाले तरी
ऐकू आली नाही अजून तान
अर्थांचे ओहोळ वाहू लागलेत
पण भिजलेत का डोळे ?
भिजले का चेहरे ?

अजून का उरलेत प्रवास ?
गावाच्या शिमग्यांचे उंच ढोल
एरवीदेखील ऐकू येतील
उद्या परवा
मग आजच्याच कनवटीचा रुपया
यांना का हवा ?

गंभीर होऊन गेलेत फुटपाथ
आणि खिन्न झालेत रस्ते
शेजारील उंच झाडांच्या कतारीमध्ये

अनुक्रमणिका

सावल्यासावल्यांनी कुजबुजून घेतलेय
इमारती सड्या मोकळ्या
नामानिराळ्याच राहिल्या
दूर अंतरावर जराशा
त्यांच्याही भिंतींवर
सूर्यास्तानी गिरवलाय कित्ता.

दूर जाणाऱ्या ट्रेनची शीळ
विरून गेली हवेत
नि भिंतींनी अंधारात बसकण मारली
अंगणं आवरून घरं सामसूम झाली
झिरोच्या उजेडात पांघरुणं पडली.
तरीही
वाहत्या नद्या या वाहात राहिल्या
आकाशाची निळाई धुपून गेली
पांथस्थाची पावले वाजली नाहीत.

रात्र रात्र सरली
सकाळींनी बाळसे धरले
दुपारींना पोक आले
गावे होती तशीच आजही
यत्किंचित न बदलता
आडवळणांच्या रस्त्यांना
थांबून आहेत की
रोज आकाशात देव भरतो
निळी शाई, कधी दाट कधी फिकी.

जाहिराती येतात जातात
उंबरठ्याबाहेर व्हरांड्यात चपला पडून राहतात
आपली नजर त्यांच्यावर जाते कधी
कधी नाही
अंगणातल्या कडुनिंबाची
कातर किनरी पाने
उन्हांना झुलवतात भुलवतात
तरीही शब्द कधी वाया जात नाहीत
सवयीच जुन्या तशा आहेत.

कोणी कवितेचा हात
घरी येते एकटेच सोडून बाजारात

पण मना कानातील कविता
जागी होते रात्री अपरात्री
झोप नासवते
जागही नासते
विझलेल्या वास्तवाच्या
उबेमध्ये निजलेले
मनाचे मुटकुळे दाखवते.

• • •

त्र्याण्णव सालची झाडे

त्याला वाटले,
त्र्याण्णव सालची झाडे वाढली
का वाढली नाहीत
हे बघायला आज आपण जाऊया.
दिवस अजून कोवळा आहे
तोवर जाऊन येऊया.

या झाडांच्या सावल्यांमध्ये
घनदाट झोप येते
अशी त्यांची ख्याती आहे
जेव्हा तो शहरात आला
तेव्हा शहर निजलेले होते
नुकतेच पहाटलेले असताना
रस्त्यांवरून फिरताना
त्याचा देह थांबून राहिला
ओढाळ कुत्र्यासारखा
आतल्या कुठल्या तरी गल्लीत
त्याने वळून पाहिले
पण तो रेंगाळला नाही.

तसाच तो निघून गेला
शहर जागे होण्यापूर्वी परत
खोलीत जाऊन

खिडकी बंद करून
डोळे मिटून तो बसला
नंतर कधी तरी जाऊया
त्र्याण्णव सालची झाडे बघायला म्हणाला.

मग कालांतराने त्याचा देह आढळला
त्र्याण्णव सालच्या झाडांखाली
विमनस्क अवस्थेत बसलेला.

इमारतींमधल्या रहिवाशांनी
खिडक्या वर करून तोंडं दाखवली
परंतु त्यांचं समाधान झालं नाही
त्यांनी खाली येऊन तेव्हा निश्चिंत होऊन
प्रत्यक्ष खात्री करून घेतली
ते आपापल्या कामाला लागले.

उरलेले दहाही दिवस खूप काम होते
अकराव्या दिवशी सार्वजनिक सुटी होती
त्यामुळे सगळे बाहेर पडले
आणि फिरता फिरता इतस्ततः विखुरले
माळांवर, डोंगरांवर, समुद्रकिनारी
पहाटे, दुपारी, गर्द रानात.

ते जेव्हा परतले
तेव्हा घराघरांत
प्रेम, प्रणय, संभोग, उल्हास
आणि आनंदात
त्यांनी सारी रात्र व्यय केली.

• • •

संवादाच्या तीन शक्यता

संवादाच्या तीन शक्यता
आपण अजमावून पाहिल्या
दिवसा, रात्री, अनोळखी व्यक्तीबरोबर
डोंगरांवर, नदीकिनारी, घरी.

तर, आपण
बऱ्याचदा बोलायचा प्रयत्न केला
पण शब्द फुटेनात
दूरवर पक्षी दिसले
फांद्यांवर बसता बसता
आणि
इमारतीतल्या खिडक्या उघडल्या
कोणी तरी बघता बघता.

निरुत्तर तर आपण
बिलकूल असता कामा नये.

सुई-दोऱ्याने टीप मारता मारता
किंवा दिव्याच्या बटणावर हात ठेवून
आपण काही तरी बोलू शकू
दारातनं येता येता
किंवा खुर्चीवर बसताना
एखादं वाक्य
मनात जे तयार होतंय ते.

• • •

हॉटेल

आज पाहू,
काय आणलंय वेटरनी?
झाकण काढ वरचं

ही वेटोळी कसली?
हे तर सागरी साप!
नेतील खोल पाण्यात
लाटा ओठांवर ओलावतील
वाळू कानामागून वाहील
निळे आकाश वरचे काळवंडेल
हळूहळू जसे ढग जमतील.

नि पाण्यात विरघळलेले आपण
आसवंच जणू

अनुक्रमणिका

घरंगळू गालांवरून.

परत पाठवा हा पदार्थ
काही दुसरं आणा म्हणावं
पोहेच आणा
आणि
आणा आधी पाणी
वारं वाहतंय
खिडकी बंद करा.

• • •

मथुरेचा बाजार

मथुरेच्या बाजारी
तू काय आणलंयस ?
तू जे आणलंयस
ते मी घेईन
पण तू जे आणलंच नाहीस
ते मी कसं घेऊ ?

तू लांबसडक केस आणलेयस ?
गोरेपान हात ?
काळे काळे डोळे
निळ्या बटांमध्ये लपवून ?
आणलीस का चंद्राची सुरेख कोर ?
पुष्ट नितंब आणि दुष्ट मांड्या ?
का केवळ स्तन आणलेयस,
प्रेमळ निवारे ?

का यापैकी काहीच नाही तुजजवळ
केवळ काही थरथर बोटांची
आणि प्रश्न विचारणारी मान.

तू काय आणलेयस येताना ?
तुझ्याजवळ जे आहे
ते सारे खपेलच बाजारात
पण जर, तू नसलेस काही आणले
तर काय विकशील तू ?

एखाद कुत्रं तरी आलंय का
तुझ्या सोबतीला ?
टेकायला काठी,
बसायला खुर्ची ?

तू दारिद्र्य आणलं असशील
तर ते विकून
तुला समृद्धी नेता येईल परत.
हाडं, आणली आहेस का,
अंगातली, बरोबर तुझ्या ?
आणि प्राण ?
जगणं आणलं असलंस तू
तर आता मरायला काही हरकत नाही.

विदेह आली असशील जर तू
तर तुला देह मिळेल
आणि आली असलीस सदेह
तर एक मन,
भावना कल्पनांनी सजवून
पण नसलंच जर हे दोन्ही
तर देतील तुला हाकलून.

फिरायला नुसती
आली असशील हात हलवत
तर फिरून
तेच हात हलवत माघारी जा
आता खंत नको करूस
आपण काय काय विकू शकलो असतो याची.

खंतच का आणली नाहीस बरोबर ?
तिचं काही तरी करता आलं असतं
डोळे नाही तर नाही
निदान पापण्या तरी आणायच्या
इथे दिले असते नेत्र बसवून.

तू काहीच कसं आणलं नाहीस ?

अनुक्रमणिका

येताना पाऊस तरी आणायचा थोडासा
ही छत्री ठेवली होती त्यासाठी
तू आलीस तेव्हा रात्र झाली नाही
दिवस झाला नाही
गेला बाजार, दुपारही, उष्ण
जाळून टाकत भुवया आली नाही.

नुसती आलीस अन् गेलीस
ही खेप वाया गेली
मथुरेच्या बाजारी
रिकाम्या हाती
येत नाही ग कोणी.

• • •

दिवाभीत


अगदीच असू शकतात या शक्यता
म्हणालो का ?
की माझंच खरं आहे
एवढेच
की सांजवेळ संपताना
निदान निजताना
सर्व भांडी पालथी ठेवा
म्हणजे कोणी दिवाभीत येऊन
भांडं तोंडाला लावायचा नाही
तृष्णेला बोलावयाचा नाही.

ठेवा सगळं झाकूनपाकून जागच्या जागी
दोरीवरच्या कपड्यांच्याही
ठेवा घड्या घालून.

बघा
बघता बघता गेलो का नाही
मी ऊन-सावलीत विभागून!
माझ्या आतून उमटली आहेत
सारी दुःखं आणि सौख्यं
आता थांबून बघतो
मी माझीच वाट
आभाळात ढग दाटताना
विजा कडाडताना म्हणतो
अजून कसा नाही आला हा ?
किती वेळ झाला ?
काळजी वाटते नकोशी.

• • •

अनुक्रमणिका



गुरुवर्य प्रा. शंकर पळशीकर यांच्या छायाचित्रासोबत
चित्रकार प्रभाकर कोलते (ट्रेझर आर्ट गॅलरी, नवी दिल्ली.)

अनुक्रमणिका

चित्रकार प्रभाकर कोलते विशेष

युगवाणी

शिष्याबद्दल : शंकर पळशीकर

पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट,
एकदा एका चित्रकाराची भेट झाली
तरुण होता तो. भावभावनांशी जवळून खेळणारा.
वाटलं, रंगरूपाशी त्याचं आपलं नातं जोडलं तर
कलाविश्वात कौतुकास्पद स्थान मिळविल.
माझं खलील जिब्रान वर फार प्रेम.
तोही चित्रकार होता आणि कवी पण
मी त्याचे "Jesus the Son of man" हे
पुस्तक वाचत होतो
तो म्हणतो "Give me your ears and I will
give a Sound".
हे वाक्य त्याच्या कानावर पडले मात्र
तो गहिवरला. मी विचारलं
काय झालं! तो गप्पच होता.
वाचन चालू ठेवा एवढंच म्हणाला.
किती वेळ निघून गेला, समजलं नाही.
उत्तर रात्री, आल्या पावली परत गेला.

दुसरा दिवस तो
आपली चित्रं दाखवू लागला
मला जाणवलं की हा
रंगांशी नातं जोडून आहे
माझी ओळख वाढली आणि
तिथ पासून तो आज तागायत.
तो, त्याची चित्रे आणि मी
हे नातं अतूट आहे.
आज तो शिक्षकच नाही पण उत्कृष्ट कलाकार आहे.
असं, आजचे मान्यवर कलाकार म्हणतात.
आणि त्यात काही खोटं नाही.
त्याचा शिष्यवर्ग ही जाणकार आहे
असं क्वचित आढळतं. आजच्या जीवनात
असं अतूट प्रेम असावयाचं.
पण ते सत्य आहे.



प्रभाकर कोलते यांचे पोर्ट्रेट शंकर पळशीकर

ती गुरुशिष्य परंपरा आहे
भारतीय सांस्कृतिक जीवनात तिचा
फार मोठा वाटा आहे
त्या संस्थेने ती सेवा मान्य केली आहे
असा आजच्या विद्यार्थी आणि सहकारी लोकांचा
विश्वास आहे
असा विश्वासपात्र त्याला म्हणतात
'केवळ चित्रकारा सारखा
केवळ
प्रा. प्रभाकर कोलते

शंकर पळशीकर

अनुक्रमणिका

कविता

प्रभाकर कोलते यांच्या कविता

तो दिसतोय

तो दिसतोय
तसा नाहीय, पण
मी पाहू शकतो त्याला
ते मात्र त्याच्यामुळेच

माझा वकुबही
त्याचीच वहिवाट

तो मिसळतो
विरोधी घटकांना
अनुभवण्याजोग्या
घटाघटांत, ज्यांना
धरून ठेवतो, तोच
एकवटून आतून
गतिशीलतेने

तो राहिलाय
हाती तरीही हाताबाहेर
म्हणूनच
सुरक्षित आणि मुक्त
त्याच्या उमटलेल्या
पाऊलखुणा
त्याच तर त्याच्या
प्रवासखुणा, त्यावरच्या
नाव-गाव शिक्क्याविना
मी करतोय
पाठलाग त्याचा

सुरू होतो तिथेच
तो परततो

सुरूच असते सतत
त्याचे असे परतणे
इथे-तिथे-सर्वत्र

वाटते भेटू शकेन
मी त्याला
जमले जर सोडून जाणे
माझे मलाच

• • •

छळ

छळ छळ छळतो
रंग काळा काळा
नवलाईचा निळा
त्याला तुझाच उमाळा

ओठ तुझे जांभूळ
डोळ्यांत तुझेच आभाळ
पिवळे ऊन हातावर
हिरवे रान तळपायात

अश्रूविना डोळे ओले
हात माझे काळे-निळे
तुझ्या स्पर्शाविना झाले
तनामनाचे भेंडोळे

एकदाच सांग मला
संपले का गं सारे सारे
जगण्यातल्या कैफाविना
आपण मरूनच का भेटायचे ?

• • •

अनुक्रमणिका

रात्रीचा अंधार

रात्रीचा अंधार
उतरतोय माझ्या देहात
हळूहळू आतबाहेर
सगळंच अंधारून येईल

डोळ्यांना दिसायचं
बंद होईल असं वाटतंय
डोळे असूनही
तू दिसणार नाहीस

पण स्वप्न बघायचं कुणी
थांबवू शकणार नाही
त्यासाठी डोळे लागत नाहीत
लागतं मन

पण ते तर किती
भरून गेलेलं आहे
गेल्या कितीतरी जन्मापासून
येणाऱ्या कितीतरी जन्मांपर्यंत

मी ते सगळं भोगून येतो
तुला मिठीत घेण्यासाठी
तोवर माझे हात शाबूत राहोत
आणि तुझा देह अगतिक

• • •

आकाश

अंधारल्या दाही दिशा
डोळ्यांत आठवण थांबली

पाय रुजले मातीमध्ये
आणि झाली त्याची मुळे

आकाश काळेकुट्ट सारे
उतरले थेट खाली

खोल मुळापर्यंत माझ्या
अनवाणी पायातुनी

• • •

पाऊस

चिंब पाऊस
उग्र किनारे
आहेत माझ्या
पायापाशी
नेतील कधीही
ओढून मला
समुद्राच्या तळाशी

मागे राहतील
वाळूत रुतलेले
माझ्या पावलांचे ठसे
मला कितीही वाटले की
त्या खोलगट ठशात
उगवीत समुद्रफुले
पण त्यात असेल
गढूळ खारट पाणी
मी आयुष्यभर
डोळ्यांतल्या डोळ्यांत
साठवून ठेवलेल्या
अश्रूंच्या तळ्यासारखे

कुणी त्याकडे पाहताक्षणी
झिरपून जाईल ते
अन् वर येईल
एक प्रचंड लाट
खळखळून हसणारी
अगदी तुझ्यासारखी

• • •

स्वप्न

झोपली असावीस
माझी तुझी
सगळी स्वप्नं कुशीत घेऊन
आणि मी
त्या स्वप्नांचा मागोवा घेत
पोहचलोय तिथेच

अनुक्रमणिका

जिथे ती सारी स्वप्नं
तू बंद डोळ्यांनी
एकाच वेळी पाहतेयस
सापडला का तुला
आपला संदर्भ
घनिष्ठ आणि लवचीक
काही संदर्भ आगळेच असतात
ते आपल्या मर्मात भिनतात
ते मारत नाहीत आणि
जगूही देत नाहीत
घनदाट अंधारात

अंधार होऊन
निपचित पडून राहावं
जमल्यास स्वतःच
स्वप्न होऊन जावं
तुझ्या डोळ्यांत
एवढंच आता कळतंय मला
कदाचित तुलाही

• • •

कोविडची ओवी

ना वाऱ्याचा आवाज
ना पंखांची फडफड
ना गाड्यांची वर्दळ
ना माणसांची धडपड

रात्र थोडी वाढलेली
वर्दळ घरातच थांबलेली
चिमण्या तर कधीच मेल्या
झाडेही मरायला टेकलेली

छाटली गेली ती सुटली
मेट्रोच्या कुंटणखान्यात
हजारो दफन झाली
झाडं गेली काडं उरली

• • •

कोणत्या बिंदूत होते

कोणत्या बिंदूत होते
मनाच्या अथांगतेची सुरुवात
बीजाशिवाय, मुळांविना
जागेविना, आधाराविना
कित्येक स्वप्नं चिकटतात
लोहचुंबकाप्रमाणे
मनावकाशाला
वटवाघळाच्या चिकाटीने

म्हातारा रोगीसुद्धा तरणा होतो
केवळ स्पर्शाच्या सहवासाने
उनाड पक्ष्यांच्या सावल्याही
उतरतात दिमाखात तनामनावर

खरं सांग, एकाच वेळी कोण गाते
आपल्या दोघांसाठी एकच गाणे
जे इतरांनी कधी ऐकलेले नसते नि
आपण ऐकण्यापूर्वीच हरवलेले असते

एकमेकांत प्राण अलगद ठेवावेत अन्
केवळ श्वासांचे देणे-घेणे करत
जागून घ्यावे एकदाच नेहमीसाठी
रुतत जावे एकदुसऱ्यात कायमचे

पाण्यात मिसळावे पाणी तसे...

• • •

अनुक्रमणिका

चित्रकार प्रभाकर कोलते विशेष

लेख

अंत:प्रेरणेचा शाहीर

जयंत भीमसेन जोशी



चित्रकार प्रभाकर कोलते आणि जयंत भीमसेन जोशी (छायाचित्र : रवी कुळकर्णी)

कल्पना करा, समोरच्या भव्य अवकाशात स्मृतीचा वटवृक्ष आहे आणि वेगवेगळ्या दिशांनी कमी-जास्त अंतरावरून, वेगवेगळ्या कोनांतून या भल्यामोठ्या झाडावर शांत प्रखर प्रकाशाचे झोत येऊ लागले आहेत. स्थळ-काळविरहित आठवणींच्या पाखरांचा थवा एकदम त्या वृक्षावरून उठतो. एकमेकांत मिसळत, हलणाऱ्या, हरक्षणी बदलणाऱ्या प्रतिमांचे, सावल्यांचे आणि आकारांचे नृत्य त्या अवकाशात सुरू होते. लयीचा आवर्त पसरतो, मनात तरंग लहरतात, नवे काही दिसू लागते. हा सारा साक्षात्कार जो अनुभवतो, त्याची मौज होते. त्याच्यासाठी जणू तो क्षण, सण होतो. काही अनमोल सापडल्याचा आनंद व्यक्त करावासा वाटतो. संवेदनशील माणसाच्या मनात आनंद, निराशा, करुणा, आत्ममग्नता आणि समाजाभिमुखता, भावनांच्या अनेक छटा, कळत-नकळत त्याच्या विचारमंजुषेत जमा होत असतात आणि त्याबरोबर सर्व प्रकारचे अनुभव, चांगले विचार, चांगला सहवास, संस्कार त्याच्या मनात अनेक प्रतिमा तिन्हीत्रिकाळ तयार करत असतात. कवी त्या शब्दांतून, संगीतकार त्यांच्या संगीतरचनांमधून या संवेदनांना शाश्वत रूप देतात तर प्रभाकर कोलते यांच्यासारखे सिद्ध चित्रकार त्यांच्या चित्रप्रतिमांद्वारे त्या संवेदनांना, त्यांच्या प्रतिभेने परिष्कृत करून आपल्यापुढे ठेवतात. संस्कृती आणि सभ्यता आपोआप समृद्ध होत जाते...

लय, विलय, स्थिती, उत्क्रांती या चक्रातून जाताना ज्ञान साठवले जाते ते संपूर्ण नसते; पण जे मिळालेले ज्ञान आहे तोच जगण्याचा आधार आहे. या आधारावर. या सापडलेल्या पायऱ्यांवर उभे राहून भविष्यातली गृहीतके मांडली जातात. कलेची अनेकविध रूपे याच गृहीतकांवर बसून, याच आराखड्यांच्या साहाय्याने जगासमोर येतात. ज्ञानाला रूप नाही, आकार नाही. भावनेचेही तसेच आहे. बघणाऱ्यालाही दृश्यरूप नाही. आकाशाला रूप आहे. त्यातल्या हालचाली दिसतात; परंतु सारा विस्तार नजरेत मावत नाही. आकाशाला शिखर नाही.

तळही नाही; पण आकाशातल्या हालचालींना नाद असतो, त्यांचा कंप जाणवतो. सृष्टी अफाट आहे. कल्पनासृष्टी अथांग आहे. विषम आणि निर्विषय यांचे अनेकविध मेळ सतत घडत असतात. प्रत्येक क्षणी काही नाहीसे होते, काही नवे जन्मते. भौतिक आणि आधिभौतिकाच्या सीमेवर उभा असलेला तरल, तलम, आध्यात्मिक प्रदेश हा कोलते सरांच्या प्रेरणेचा स्रोत असावा. ओळखीचे आकार, ओळखीच्या छटा यांच्या कैवल्याच्या पातळीवरच्या मनोज्ञ हालचाली, कोलते सर त्यांच्या एका विशेष मचाणावरून टिपतात. त्यांची अंतःप्रेरणेने नोंद करतात. ही नोंद करण्याची प्रक्रिया म्हणजेच सरांचे पेंटिंग आणि ही प्रक्रिया पेंटिंगशिवाय इतर कुठल्याच माध्यमातून प्रकट होऊ शकत नाही. कला आणि शास्त्रविचार इथे एकमेकांमध्ये आनंदाने लोप पावले आहेत असे वाटते. या प्रतिमासृष्टीतले आकार, रंग, रेषा, प्रकाश, अंधार यांचे एकमेकांमधले व्यवहार आणि नाती, प्रत्येक प्रतिमेमध्ये, प्रत्येक चित्रात रूप पालटतात. पात्रे तीच : आकार, रंग, रेषा, प्रकाश, अंधार; पण जादू होते आणि पाहता पाहता संदर्भ बदलू लागतात. रूढार्थाला किंचित धक्का बसतो; पण नीट परिशीलन केल्यास लगेच त्या त्या प्रतिमेचे अस्तित्वभान मन उजळू लागते. प्रत्येक पेंटिंगमधले दृश्य-नाट्य आणि दृश्य-काव्य स्वतंत्र असते. कोलते सरांचे चिंतन, त्यांनी अनुभवलेले साक्षात्कार ते दृश्यरूपाने साकारतात. या चिंतनातून घडलेल्या सरांच्या पेंटिंग्जमध्ये तारुण्याचा जोश आहे, भावनांची धीरगंभीरता आहे. रसपरिपोष आहे, विरक्तीमधली तृप्ती आहे. अभिव्यक्तीतली संपूर्णता आहे. कार्यकुशलतेतल्या सातत्याची शक्ती आहे.

भौतिकशास्त्राचे नियम खूप सनातन आणि शाश्वत आहेत. आज माणसाला त्यातले जेवढे काही समजलेले आहे त्यावरच आजचे आपले तंत्रसंपन्न जग उभे आहे. हजारो साधक, विद्वान आणि शास्त्रज्ञ आजही न समजलेल्या अज्ञात निसर्गनियमांची समीकरणे शोधताहेत. आस्तित्वात असणाऱ्या प्रकृतीच्या गूढ, चल-अचल स्वरूपाबद्दल सरांच्या पेंटिंग्जमध्ये आडाखे बांधले आहेत असे वाटले. या प्रतिमा आपल्याला गुंगवून ठेवतात. ही आहे कोलते सरांची लोभस, अकृत्रिम प्रतिमासृष्टी जी वास्तवात रूपांतरित होत असतानाच्या प्रवासातला एक एक पैलू आपल्याला त्यांच्या प्रतिमासृष्टीत दिसत राहतो. सरांची पेंटिंग्ज, त्यातली तरलता, भव्यता आणि आवेग प्रत्यक्ष अनुभवणे हा एक संपूर्ण रोमांचक दृष्टांत आहे.

चित्रभाषेचे प्रमाणीकरण हे मोठे आव्हान आहे. अमूर्त चित्रांची जादू शब्दांमधून अनुसरित करणे सोपे काम नाही. शब्द आणि त्यांचे अर्थ शेवटी वैयक्तिक आकलनावरच अवलंबून असतात. चित्रभाषा आणि प्रमाण भाषेचा मेळ जमणे हा भाग्ययोग असतो. पेंटिंग हे खूप प्रवाही माध्यम आहे. हा प्रवाह अथांग आणि खोल आहे. या प्रवाहाशी कलावंत संवाद करत असतो. हा संवाद म्हणजेच कलावंताचे चिंतन. हे चिंतन आणि कलावंताच्या अंगभूत प्रेरणा या कलावंताच्या मनात निर्मितीचा निग्रह तयार करतात.

संस्कार, अनुभव, उत्साह, अभ्यास, व्यासंग, जिज्ञासा, निरीक्षणे, चिंतन, प्रेरणा आणि प्रतिभा यांच्या खूप विलक्षण रसायनातून कलावंताची अभिव्यक्ती साकार होत राहते. दिसणारी कलाकृती/पेंटिंग हा तिचा अंश/स्लाइस असतो. वास्तवाशी समांतर असलेली पेंटिंग्ज एखाद्या टुरिस्ट स्पॉटच्या गाईडप्रमाणे बाह्य रूपाचे वर्णन करत राहतात; परंतु अमूर्त पेंटिंग्जचा संबंध आधिभौतिकतेशी आहे. इथे संकल्पनांचे आकाश पसरलेले आहे. अध्यात्माइतकाच हा सर्वसमावेशक अवकाश आहे. ज्यात सर्व शास्त्रे, कला, व्यवहार व अस्तित्वे आणि वर्तमान-भूत-भविष्य यांचे मर्म सामावलेले आहे. अगदी नैसर्गिक आणि स्वयंभू. कितीही मोठे पेंटिंग असले तरी हे सर्वकाही, त्या एका फ्रेममध्ये मावणे शक्य नसते. तिथे त्या त्या क्षणी कलावंताच्या मनाला स्पर्श करणारी एखादी संकल्पना, विचार तितक्याच उत्कटतेने मांडला जातो. या कलाकृतीत नावीन्य असते आणि नवे संकेत असतात, कधी बंडखोरी असते. केवळ एखाद्या धावत्या दृष्टिक्षेपात आशय पाहणाऱ्याला आकळू शकत नाही. पेंटिंग समजून घेण्यासाठी, ते पेंटिंग बघण्यासाठी वेळ द्यावा लागतो. पेंटिंग समजण्याचा ध्यास असावा लागतो, खूप काही बघितलेले असावे लागते. चित्रकलेविषयी प्रेम असावे लागते. कलावंतांची चरित्रे वाचलेली असावी लागतात. आधुनिक दृश्यकलेचा इतिहास माहीत असावा लागतो.

अनुक्रमणिका

प्रभाकर कोलते – अल्प परिचय

प्रभाकर कोलते यांचा जन्म २७ जून १९४६ रोजी नेरूरपार, जिल्हा रत्नागिरी येथे झाला. सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथून त्यांनी पेंटिंगमधील पदविका प्राप्त केली आणि १९७२ ते १९९४ या काळात तिथेच अध्यापन केले. देशविदेशातील महत्त्वाच्या प्रदर्शनांमध्ये त्यांच्या चित्रांची एकल आणि समूह प्रदर्शने झाली आहेत. १९७० साली बॉम्बे आर्ट सोसायटीचे सुवर्णपदक, १९७१ आणि १९७२ साली महाराष्ट्र राज्य पुरस्कार, १९८६ साली ब्रिटिश कौन्सिलतर्फे इंग्लंड भेटीचे सन्माननीय निमंत्रण, २०१५ साली कला क्षेत्रातील योगदानासाठी ग्वाल्हेर विद्यापीठाची डी. लिट. पदवी, 'ललित कला अकादेमी', दिल्लीचे सल्लागार पद असे अनेक सन्मान त्यांना लाभले. चित्रकलेवर त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली आणि कलाविषयक महत्त्वाचे लेखनही केले. २०१० साली प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'आर्ट टू आर्ट' (कलेपासून कलेकडे) या पुस्तकाला दुर्गा भागवत पुरस्कार मिळाला. २०२१ साली त्यांच्या कलाविषयक लेखनाचे संकलन असलेला 'दृक्-चिंतन' हा ग्रंथ प्रकाशित झाला.

शंकर पळशीकर यांना गुरुस्थानी मानणारे प्रभाकर कोलते हे कला अभिव्यक्तीसोबतच सतत वाचन, मनन आणि चिंतनात गुंतलेले असतात. चित्रकलेतील दृक् संवेदनेचे स्वरूप समजावून सांगत आकार, रंग, रूप, पोत, अवकाश या घटकांचे आकलन कलेच्या निखळ आस्वादकांना सहज व्हावे या दृष्टीने ते कलाविषयक लेखन करतात. सर्वसामान्य दर्शकाला आणि जाणकारांनादेखील प्रथमदर्शनी अवघड वाटणाऱ्या अमूर्त कलेच्या आस्वादाच्या वाटा त्यांच्या लेखनातून सापडत जातात. कलानिर्मितीसोबतच कलासाक्षरतेकरिता प्रयत्न करणाऱ्या मोजक्या कलावंतांपैकी ते एक महत्त्वाचे भारतीय चित्रकार आहेत.

गाणे कानाला गोड लागते आणि आवडतेसुद्धा; परंतु तुम्ही संगीत शिकलेले असाल तर तो आनंद शतगुणित होतो. कारण तुम्हाला त्या गाण्यातले बारकावे समजलेले असतात, तसेच पेंटिंग्जचेही आहे. अर्थात संवेदनशीलता आणि सजगता जितकी तरल तेवढा जास्त आनंद.

ज्याप्रमाणे प्रार्थनास्थळामध्ये प्रवेश करण्यापूर्वी आपण जोडे काढून ठेवतो, तसेच कोलते सरांची चित्रे पाहण्यापूर्वी आपल्याला आपले पूर्वग्रह बाजूला ठेवायचे आहेत. निर्विचार आणि कोऱ्या मनानी प्रत्येक चित्र शांतपणे पाहायचे आहे आणि मग एक क्षण असा येतो की ते पेंटिंग स्वतःला विशद करायला लागते. प्रत्येक चित्रकाराची स्वतंत्र दृष्टी असते. प्रतिभावान चित्रकार त्याच्या प्रतिमांद्वारे स्वतःची एक नवी सृष्टी रचतो. त्याची सर्व जुनी-नवी-आगामी चित्रे या सृष्टीचे अंश असतात. ते अंश कधी महाकाव्याइतके विशाल तर कधी एखाद्या अर्थवाही हायकूसारखे संक्षिप्त पण प्रोफाउंड असतात. कोलते सरांच्या कल्पनाविभ्रमांचे वास्तव स्तिमित करणारे आहे. त्यांच्या विचारांच्या कन्व्हिक्शन्सचा एक सलग धागा, ओघ, त्यांच्या निर्मितीमध्ये आपण स्पष्टपणे बघू शकतो. या सर्व रचनांना कुठेही जडत्व नाही. विचाराची खोली, आकारांची विशालता, छटांचा गडदपणा-फिकेपणा, दिशादर्शक रेषांचा नेमकेपणा आणि एकूण रचनेची संयोजना पाहणाऱ्याच्या मनात तरळत राहते. या आविष्कारांच्या स्वतंत्रतेमागे एक नेमस्तपणाही आहे; परंतु तो कठोर-करडा नाही, मुक्त आहे. उत्स्फूर्त आहे. रससिद्ध आहे. कोलते सरांच्या पेंटिंग्जमध्ये रंगांचा ताजेपणा मोहून घेतो. चित्रातले रचना-लालित्य विशेषत्वाने सामोरे येते. हे लालित्य रेषांच्या, आकारांच्या वळणांमध्ये नाही. कोलत्यांच्या जन्मजात अभिरुचिसंपन्नतेत आहे. याचे ऋणानुबंध बौहाऊस स्कूलच्या ग्रिडबरोबर किंवा जपानी मिनिमलिझमशी आहेत. कोलते सरांची पेंटिंग्ज कालातीत, आशयसमृद्ध वैश्विक चित्रभाषा बोलतात. या भाषेच्या दृक्-उच्चारणात बोलीभाषेतला गोडवा आहे. जलद गतीने उमटत जाणाऱ्या हस्ताक्षराची अनिवार्यता आहे. प्रमाण नियमांच्या, संकेतांच्या अधिक्षेपाच्या शक्यतासुद्धा इथे वेगळ्या डौलात उभ्या आहेत.

स्वतःच्या चित्रांबद्दल सर फारसे बोलत नाहीत. मग आपणच आडाखे बांधायचे. मला असं वाटतं, तीस-चाळीस वर्षांपूर्वी कधीतरी सरांना कलेचे मर्म दाखवणारा खूप व्यापक आणि परिपूर्ण दृष्टांत झालेला आहे आणि त्या दृष्टांताच्या वेगवेगळ्या रूपछटांचे गुणवर्णन ते पेंटिंगद्वारा करत असतात. जणू त्या साक्षात्काराची जिवंत स्मृती त्यांच्या मनात आहे आणि खूप सहजतेने सरांच्या हातातून कॅनव्हासवर उमटते आहे. प्रयोगशीलतेतल्या सातत्यामुळे तसेच ऑरगॅनिक आणि स्ट्रक्चरल यांच्या संतुलित मिलाफामुळे या कलाकृतींना आस्तित्वभान लाभले आहे आणि त्यांचे भवतालाशी

नाते निश्चित झाले आहे. पाहणाऱ्यांचे त्या कलाकृतीबरोबर धागे जुळू लागतात. इतक्या साऱ्या वर्षांच्या रियाजामुळे हे सारे काही सहज होऊन जाते. आविष्कारातली ही सारी सहजता/अकृत्रिमता कलाकृतीला लोभस बनवते, जिवंत करते. रसिक, कलाप्रेमी, कलेचे विद्यार्थी या किमयेचे रहस्य शोधू लागतील तेव्हा तिथे दडलेले खूप मोठे विचारधन त्यांना दिसू शकेल. दृश्यकलेतल्या सनातन समीकरणांचे नवे अर्थ कळतील. ही कोलते सरांची खास परिभाषा आहे. सौम्य, आत्ममग्न, तृप्त आणि न खुपणारी. परमेश्वराचे रूपवर्णन, गुणवर्णन करताना संत थकत नाहीत. कितीही बोलले, सांगितले तरी सांगण्यासारखे काहीतरी राहिलेलेच असते. अगदी तसेच कोलते सरांना झालेल्या मूळ साक्षात्काराबद्दल म्हणता येईल. सततच्या ध्यासामुळे आणि कामात निमग्न राहिल्यामुळे त्या आनंदमय रूपब्रह्माच्या साक्षात्काराची नवनवी अधिष्ठाने त्यांना दिसत राहतात आणि किती किती, किती तऱ्हेने हे ऋणानुबंध सांगावेत असे होत असावे.

अमूर्त चित्रकला हे फार मोठे आव्हान आहे. कसलीही बंधने नाहीत. अंतःप्रेरणेशी संपूर्ण प्रामाणिकपणा ही एकमेव अट. आजपर्यंत जगाला न दिसलेला विचार, न घडलेला दृश्यमेळ यांना जन्माला घालायचे असते. कलासृष्टीचे सर्व संकेत ध्यानी ठेवून भावपटलावर वेगाने घडणाऱ्या हालचालींना मूर्त स्वरूप द्यायचे असते. भाबडेपणाला इथे अजिबात जागा नाही. प्रेरणा/इंट्युशन ही लख्खकन समोर येते आणि हरवून जाते. तिला पकडणे आणि तिचे आकलन होणे हे स्वप्न आठवण्यासारखे आहे. सरांना ही स्वप्ने आठवत असावीत आणि ते आपल्याला त्या प्रेरणा, त्यांचे रूपवर्ण चित्रांमधून विशद करून सांगताहेत असे वाटत राहते. सरांना मी म्हणेन 'अंतःप्रेरणेचे भाष्यकार'. शाहिराच्या तडफेने, अंतःस्फूर्ती जपत जपत, जाणिवा, संवेदना सांभाळत इतिहासाचे, वर्तमानाचे आकलन करत, भविष्याचा वेध घेत असताना, भावनांचा समतोल राखत कोलते सर रोज त्यांच्या चित्रकलेत दंग असतात. अमूर्त आणि शब्दातीत भावनांना पेंटिंगमधून दृश्यरूप देण्याची सिद्धी फार कमी कलावंतांना साधते. कोलते सर त्या श्रेणीतले दार्शनिक आहेत असे मला वाटते. त्यांचे गडद किंवा फिकट रंगांमधले मोठे कॅनव्हासेस असोत किंवा तुलनेने छोटी चित्रे असोत, कोलते सरांची पेंटिंग्ज पाहताना रचनेची सहजता आणि खेळकर भाव तुम्हाला दिसतोच; अधिक त्यांच्या मनात दडलेली एक असाधारण आध्यात्मिक बैठकही जाणवते.

मी जगातली उत्तमोत्तम अभिजात नॉन रिप्रेझेन्टेशनल पेंटिंग्ज प्रत्यक्ष पाहिलेली आहेत. प्रत्येक मोठ्या चित्रकाराचे या विषयाला भिडण्याचे धाडस आणि दृष्टी वेगळी आहे; परंतु कुठे तरी मनाला स्पर्श करतेच. कोलते सरांची पेंटिंग्ज या पातळीवरची आहेत हे मी खात्रीने सांगू शकतो. स्वतंत्र शैली आणि स्वानुभवातून जन्माला आलेली पेंटिंग्ज असणे हे मोठे परिमाण आहे. बाकी टेक्निकमधले सोफिस्टिकेशन ही क्वालिटी या अशा चित्रकारांच्या आविष्कारांमध्ये सहजच अवतरते आणि चित्रांमधला ताजेपणा वर्षानुवर्षे तशाच नव्हाळीचा दिसतो जेव्हा ती पेंटिंग्ज जन्मली.

या सर्व निर्मितीत त्यांची स्वतःची अशी स्वाभाविक शिस्त आहे, जिच्यामुळे त्यांच्या चित्रविचारांना एक नैसर्गिक लय आणि नादमयता लाभली आहे. हे सारे चित्रविभ्रम अतिशय आनंददायी आहेत. कोलते सरांची चित्रे, चित्रशैली ही आपल्याला लाभलेली रसपरिपोषाची चैतन्यमयी चित्रगाथा, हा आधुनिक भारतीय चित्रपरंपरेचा महत्त्वाचा ठेवा आहे. कलानुभवातली प्रगल्भता निर्मितीत उतरावी ही सरांची अपेक्षा आहे. उद्याची चित्रनिर्मिती हाच त्यांचा ध्यास आहे. त्यांच्या गुरुजनांबद्दलच्या आठवणी ते सांगतात, त्यांचे गुरू शंकर पळशीकर यांनी सरांना ज्ञानेश्वरी वाचायला सांगितली. पहिल्या वाचनात सरांना काहीही समजले नाही; परंतु पळशीकरांनी पुन्हा पुन्हा वाचायचा आग्रह केला आणि एक दिवस ज्ञानेश्वरीतल्या शब्दांचा अर्थ उमगू लागला आणि जे जाणवले त्यांची संवेदनशीलता अधिक तरल व समृद्ध होत गेली. ज्ञानेश्वरीचे ऋण ते मानतात. तसेच कलाविषयक अनेक महत्त्वाची इंग्रजी पुस्तकेही सर वाचत राहिले आणि या साऱ्याचे मर्म समजावून घेण्याची ओढ लागली. गायतोंडे यांना भेटायला सर दिल्लीत गेले होते. त्या आठवणीही त्यांनी जपल्या आहेत. गायतोंड्यांमुळे, त्यांच्या पेंटिंग्जमुळे चित्रकलेतले अनाम अवकाश अनुभवण्याचा प्रांत दिसला. सर म्हणतात, चित्र

काढणे म्हणजे फक्त ब्रश, रंग यांच्या साहाय्याने कागदावर किंवा कॅनव्हासवर जे दिसलंय ते सुंदरपणे चितारणे एवढेच मर्यादित नाही. त्यामुळे तुम्ही मोठे चित्रकार व्हाल असे अजिबात नाही. प्रतिभा कधी प्रसन्न होईल आणि कधी रुष्ट होईल हे सांगता येत नाही; परंतु कलावंत म्हणून तुम्ही सजग राहून कलाधर्माला जागले पाहिजे. दबून राहू नका. निर्भीडपणे व्यक्त व्हा. स्वतःच्या प्रेरणांशी प्रामाणिक असा. तरच एक दिवस असा येईल की तुमची चित्रे तुम्हाला मार्ग दाखवतील आणि तुमच्या चित्रांमधले चैतन्यसंगीत तुम्हाला सतत ताजे आणि उत्साही ठेवेल.

सर आज भारतातले अग्रगण्य चित्रकार आहेत. त्यांच्या कलाकृतींना जागतिक मान्यता आहे. आयुष्यातली बावीस वर्षे ते जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकवत होते. आजचे अनेक नामवंत चित्रकार त्यांचे विद्यार्थी आहेत. शिकवणे हे सरांना मनापासून आवडते. एखादी कलाकृती उत्तम का आणि आपल्याला का आवडली, याबद्दल ते स्वत:ला प्रश्न करतात. भारतीय आणि विशेषतः मुंबईच्या कला-इतिहासाचे ते अधिकारी साक्षीदार आहेत. नुकताच सरांनी 'दृक्-चिंतन' हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात सरांनी त्यांना आवडलेल्या श्रेष्ठ कलाकृतींबद्दल आणि त्या कलाकृतींच्या निर्मात्या-कलावंतांबद्दल लिहिले आहे. तसं म्हटलं तर एका अर्थानं हा सरांचा या निमित्तानं केलेल्या अभ्यासाचा आणि त्यातून झालेला त्यांच्या आत्मशोधाचा प्रवास आहे. या प्रवासातली ही काही महत्त्वाची टिपणे आहेत. कुठल्याही विषयाचे निदान किंवा वर्णन न करणाऱ्या प्रतिमांना साकार करणे हे मोठे आव्हान आहे. जे आपल्याला कळलेले असते ते सगुण आणि ज्याची जाणीव तर होते; पण ज्याच्या स्वरूपाची व्याख्या होत नाही ते ते निर्गुण म्हणजे अमूर्त, अशी माझी सोपी व्याख्या आहे. ज्या गोष्टी सहजी समजत नाहीत त्या ओढ लावतात. जाणिवेवर, प्रेरणेवर मन एकाग्र करण्याची सवय तुम्हाला या निर्गुण वास्तवाच्या रूप-विभ्रमांचा अनुभव देते आणि ही रूप-दर्शने चित्रातून व्यक्त करण्याची ऊर्मी आणि शक्ती देते. विकार गळून जातात. चित्तशुद्धी होते. मार्क रॉथको, गायतोंडे यासारखे कलावंतसुद्धा अशाच अर्थाचे काही सांगून गेले आहेत. कोलते सरांना पेंटिंग करताना असाच काही आध्यात्मिक अनुभव येत असावा आणि आनंद मिळत असावा असा माझा विश्वास आहे. हे आशा-निराशेपलीकडचे वास्तव आहे. चिं.त्र्यं. खानोलकरांच्या ओळी आठवतात. खानोलकरही कोकणातलेच. मला कोलते सरांच्या आणि खानोलकरांच्या प्रेरणांचा बंध जुळल्यासारखा वाटतो : निर्व्याज, सहज, विशेष तेज असलेला आणि पारदर्शक.

लाल माती पाउलांशी,
निळा ढग डोईवर
डहाळीचा काळा पक्षी,
स्वरांहून बोले खोल

पेंटिंग्ज, पेंटर्स, त्यांचे संघर्ष, त्यांच्या विविध चित्रशैली आणि त्या चित्रकारांना गवसलेले दृश्य-सिद्धांत यांच्या अभ्यासात सर रमून जातात. शब्दांच्या पलीकडचे जग चित्रभाषेतून व्यक्त करण्यासाठी साहित्य आणि काव्य यांचा व्यासंग असणे हेही आवश्यक आहे ही जाणीव सरांना विद्यार्थी दशेतच झाली होती. 'जे जे आपणास ठावे, ते ते इतरांना शिकवावे, शहाणे करून सोडावे सकळ जन' ही सरांची अंतरीची ऊर्मी आहे आणि याच तळमळीने गेल्या तीन दशकांपासून सर दृश्यकला आणि कलावंत याविषयी लिहीत गेले. दृश्यकलेबद्दल आपल्या आजूबाजूचे लोक अधिक संवेदनशील आणि सजग व्हावेत, त्यातला आनंद सर्वांना अनुभवता यावा हा त्यांचा उद्देश होता आणि आहे. एखादा दृष्टांत, विचार लेखाद्वारे लिहून झाला आणि प्रकाशित झाला की तो सांभाळून ठेवण्याच्या भानगडीत सर पडले नाहीत. पेंटिंग करीत राहणे ही नेहमीच त्यांची प्रायोरिटी राहिली आहे. पेंटिंग करणे हा त्यांचा देहधर्म आहे. पेंटिंग पाहताना, करताना सर स्वतःला विसरून जातात. चित्रांमधले काव्य, चित्रांमधले संगीत आणि चित्रांतले चैतन्य हा त्यांचा न संपणारा शोध-विषय आहे. दृश्यभाषेची सर्वसमावेशकता आणि तिच्या प्रगल्भतेचे कोलते सरांनी वेळोवेळी त्यांच्या पेंटिंग्जमधून आणि त्यांच्या शब्दांतून विशद केलेले महत्त्व सर्वांसाठी दिशादर्शक आहे. कोलते सरांच्या सकल स्वास्थ्यासाठी आणि आनंदमय जीवनासाठी माझ्या शुभकामना!


• • •

चित्रकार प्रभाकर कोलते विशेष

लेख

अमूर्तानुभवी चित्रकार, कवी, लेखक

अरविंद हाटे




ह्या व्यक्तीची आणि माझी गाठ पडली तीच मुळी पन्नास वर्षांपूर्वी, १९७२ साली सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या ऐतिहासिक सुवर्णभूमीत आणि ती गाठ आजही घट्ट बांधलेलीच राहिली अहे. त्या वेळी ते प्राध्यापक होते तर मी फाउंडेशनचा विद्यार्थी. तसं पाहिलं तर आज २०२२ साल उजाडलं, आम्ही जेजेचे विद्यार्थी असल्याचं सुवर्णोत्सव वर्ष.

आजही आठवते ती त्यांची शोधक नजर, भरभर चालणं, सतत विद्यार्थ्यांना नवनवे प्रयोग करायला प्रवृत्त करणारे. त्यांनी शिकवताना मळलेल्या वाटा सोडून नावीन्यपूर्ण नवनव्या वाटा शोधून प्रोत्साहित करीत, तेव्हाही आणि आताही. त्यांच्याशी संवाद साधताना त्यांच्यात असलेल्या एखाद्या गुरुत्वाकर्षणाने विद्यार्थ्यांना आपलेसे करणारे व ते आपल्यातलेच आहेत असे वाटू देणारे. त्यांच्यात कधी प्राध्यापकीय किंवा आपण शिक्षक असल्याचा आवेश दिसलाच नाही तर विद्यार्थ्यांसाठी नेहमीच मैत्रीचा हात पुढे केला व तो आजही तेवढ्याच आत्मीयतेने व प्रेमभावाने निभावत आहेत. शिक्षक म्हणून त्या वेळीही ते इतरांपेक्षा वेगळे होते व ते आजही तसेच आहेत. त्यांच्या चित्रात, कवितेत, लिखाणातही तो वेगळेपणा जाणवतो. चित्रकला ही शिकवायची अथवा शिकवता येत नाही, ती तुमच्या अंतर्मनात खोल रुजलेली, अंकुरलेली असावी लागते. ती एक प्रकारची साधना आहे स्वातंत्र अभिव्यक्ती आहे हा त्यांचा दृढ विश्वास. ती व्यक्ती म्हणजे प्रभाकर महादेव कोलते.

अहोभाग्य आम्हा विद्यार्थ्यांचं, अशी व्यक्ती आम्हाला शिक्षक म्हणून लाभली. त्यांनी आम्हाला कधीही शिक्षकी आवेशात शिकवलं नाही तर अनेक

अनुक्रमणिका




सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई

दिशा दाखवल्या, मार्गदर्शन केलं, त्यांनी आमच्या विचारांच्या व विचार करण्याच्या दिशा रुंदावल्या, कला आणि कलासक्त तत्त्वांच्या जाणिवा नेणिवा उलगडून सांगितल्या. वर्गाच्या चार भिंतींपलीकडे शोध घ्यायला व बघायला प्रवृत्त केलं. आपापल्या वाटा धुंडाळायला लावल्या. त्यांच्या मते कला-शिक्षक हा नुसताच शिक्षक असून चालत नाही तर चित्रकलेची साधना व रियाज करणारा आणि त्याचबरोबर वाचन व लेखनही करणारा असायला हवा. कोलते सर आवर्जून सांगतात, आजच्या ग्लोबलायजेशनच्या काळात जग खूप जवळ आलंय हे खरं पण माणसामाणसांमधला संवाद हरवलाय, तंत्रज्ञानं प्रगती झाली खरी; पण माणसं दुरावली, भावनिक बंधनं दुरावली आणि विचारही दुरावले.

मला अजूनही कोलते सरांबरोबर त्या भव्य जेजेच्या मातृवत्सल इमारतीच्या हिरवळीवर चंद्र, चांदण्यांच्या प्रकाशात जमलेल्या अनेक बैठकी आठवतात. कधी खलील जिब्रान, तर कधी स्वतःच्या कविता किंवा माधव आचवलांनी लिहिलेलं 'किमया' अथवा प्रभाकर बरवे ह्यांच्या 'कोरा कॅनव्हास'मधील भाग वाचून त्याचं रसग्रहण करून दाखवायचे, त्यातला आशय समजावून सांगत. तशी त्यांना गाण्याचीही आवड आहे आणि गातातही छान! मग कधी कधी गाण्याची मैफिलही जमायची, कधी पंडित भीमसेन जोशींनी गायलेली अभंगवाणी 'देव विठ्ठल देव पूजा...', अरुण दातेंची भावगीतं 'शुक्र तारा मंद वारा...', वसंतराव देशपांडे 'बगळ्यांची माळ दिसे अजुनी अंबरात... , मुकेशची 'आजा रे, अब मेरा दिल पुकारा, रो रो के गम भी हारा', तलतची विरहगीतं 'प्यार पर बस तो नहीं, लेकीन फिर भी ये बता दे के तुझे प्यार करू या ना करू...' अशी अनेक गाण्यांची मैफिल जमल्यावर रात्र कधी व्हायची तेही कळायचं नाही. ते गातात ते तन्मयतेने मग्न होऊन. तर कधी कधी ते विद्यार्थी असताना घडलेल्या गमतीजमती सांगत, मग मात्र हास्यकल्लोळ उडायचा. ते शाळेत असताना व नंतर जेजेमध्ये विद्यार्थी असताना किती व्रात्य व खोडकर होते त्या गमती सांगत हरवून जायचे. ते ऐकताना आम्हाला साक्षात्कार व्हायचा तो त्यांच्यातला खट्याळ, मस्तीखोर, अल्लड कुमारवयीन मुलाचा. त्या वेळी आमच्याबरोबर घडलेल्या विनोदाच्या फैरी उडायच्या, त्यांना हसायला आणि हसवायला खूप आवडत, 'हसण्यासाठी जन्म आपुला' हे वाक्य ते आजही सार्थ ठरवतात.

कोलते सरांनी तसे शिस्तीचे धडे मात्र प्राध्यापक पळशीकर, प्राध्यापक शिरगावकर ह्यासारख्या प्रतिभावंत शिक्षक व शिस्तप्रेमी प्राध्यापकांकडून घेतले असावेत. एका लेखात तर कोलते सर पळशीकरांबद्दल लिहितात, घड्याळानेही पळशीकरांकडून वक्तशीरपणा शिकावा इतके ते वक्तशीर होते आणि ते त्यांच्या बाबतीत खरंही होतं. तर शिरगावकर हेड ऑफ दी डीपार्टमेंट व कोलते विद्यार्थी असताना सांगितलेला किस्सा. जेजेच्या वार्षिक प्रदर्शनाची जय्यत तयारी सुरू झाली होती. कोलते व



सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई, वार्षिक प्रदर्शन

काही विद्यार्थ्यांनी मिळून प्रत्येक वर्षातील विद्यार्थ्यांची निवडक चित्रे प्रदर्शनात लावून पूर्ण झाली होती. इतक्यात शिरगावकर सर प्रदर्शनाच्या दालनात आले व सगळ्या प्रदर्शनावर एक जळजळीत कटाक्ष टाकून जरा चढ्या आवाजात विचारलं, 'कोणी लावली ही चित्रं?' कोलते सर मान खाली घालून पुढे येत म्हणाले, 'आम्ही लावली सर, काही चुकलं का?' आता शिस्तप्रिय शिरगावकर सरांचा पारा चढला होता. कोणाच्या परवानगीने ही लावलीत, आत्ताच्या आत्ता सगळं प्रदर्शन खाली उतरवा व रीतसर लेखी परवानगी घ्या आणि निघून गेले. निराश कोलते सरांच्या मनात खंत निर्माण झाली, आता एवढी केलेली मेहनत वाया जाणार; पण काही पर्याय नव्हता, अस्वस्थ होऊन सगळी चित्रं उतरवली. रीतसर लेखी परवानगीसाठी अर्ज केला. शिरगावकर सरांनी त्यावर सही केली आणि म्हणाले, आता प्रदर्शन लावायला हरकत नाही. संस्थेची काही शिस्त व नियम असतात, ते पाळावे लागतात. पुन्हा कोलते व बाकी विद्यार्थी कामाला लागले आणि पुन्हा प्रदर्शन त्याच आत्मविश्वासाने व जिद्दीने लावायला सुरुवात केली, शिस्त म्हणजे शिस्त!

पळशीकर सरांचं कोलतेंच्या कामावर नेहमीच बारीक लक्ष असायचं. कोलतेंना बाकी फिगरेटिव्ह पेंटिंग करण्यात रस नव्हता. ते नेहमी जेजेच्या लायब्ररीत पिकासो, पॉल क्ली, मिरो, कैडीनस्की ह्यासारख्या अनेक अमूर्त चित्रकारांची चित्रं पुस्तकात पाहून प्रभावित व्हायचे, आपणही असंच काही तरी करायला हवं असं वाटायचं. कोलतेंची चित्रं पाहून पळशीकर म्हणायचे, ह्या चित्रात तुम्ही कुठे आहात? त्या वैचारिक संवादातून मिसिंग सोल ह्या चित्राची निर्मिती झाली, ज्याला १९७० साली बॉम्बे आर्ट सोसायटीचं सुवर्णपदक मिळालं. आपण एखाद्या व्यक्तिमत्त्वाने भारावून जातो आणि ते व्यक्तिमत्त्वही तसंच असतं, आम्हा सगळयांचंच पळशीकर सरांच्या बाबतीत तसंच झालं होतं. त्यांचं अनुकरण करताना आपण आपली क्षमता, आपली जाण विसरून जातो, फक्त ती घटना आपल्याला मोहून टाकते. कोलते सरांच्या बाबतीतही तसंच झालं होतं, त्यांच्या पेंटिंगला बॉम्बे आर्ट सोसायटीचं सुवर्णपदक मिळाल्यावर, अर्थातच एवढा मोठा पुरस्कार मिळाल्याचा आनंद कुटुंबातील सर्वच सदस्यांना होणार ह्यात काहीच संदेह नाही. कोलतेंच्या बाबांनी ते सुवर्णपदक आपल्याजवळ बाळगत अभिमानाने व कौतुकाने ते सर्व मित्रमंडळींना व नातेवाइकांना दाखवायचे. एके दिवशी कोलते सरांनी आपल्या बाबांकडे ते सुवर्णपदक मागितलं, साहजिकच बाबांचा पहिला प्रश्न होता, ते कशासाठी? त्यावर कोलते सरांनी सांगितलं, ''पळशीकर सरांना सुवर्णपदक मिळाल्यावर ते वितळवून 'नियती'

आपल्या लाडक्या लेकीला त्याची चेन करून घातली होती, मलाही तसंच करायचं आहे.'' तसं पाहिलं तर ह्या महादेवाला (कोलतेंचे वडील) त्या शंकराचं (शंकर पळशीकर) कला क्षेत्रातलं योगदान, त्यांची ज्ञानोपासना, आध्यात्मिक व वैचारिक प्रगल्भता, त्यांची तपश्चर्या आणि चित्रकार म्हणून त्यांची ख्याती माहीत होती. बाबांनी एकाच वाक्यात कोलतेंना सांगितलं, ''प्रभाकर एक लक्षात घे, ते पळशीकर आहेत, आधी तू पळशीकर हो, मग त्यांचं अनुकरण कर.'' त्या क्षणाला कोलते हिरमुसले हे खरं, पण कालांतराने आपल्या वैचारिक क्षमतेतून त्या घटनेचं गहिरं मर्म त्यांना समजलं.

असंच एकदा पळशीकर सर बोलत असताना म्हणाले, "If you want to see your soul, look at the Sun." पळशीकरांनी सांगितल्याप्रमाणे कोलते नित्यनेमाने रोज गच्चीवर जाऊन सूर्याकडे एकटक पाहात आपला सोल दिसतो का ते पाहायचे. असे अनेक दिवस प्रयास करूनही सोल काही दिसला नाही; पण आज कोलतेंच्या आत्मचिंतनातून त्याचा अर्थ कळला. आपल्या अंतर्मनातल्या सूर्याकडे अंतर्मुख होऊन पाहायला हवं तेव्हाच तुम्हाला सोल दिसेल, हे जीवनतत्त्व आपल्या जाणिवा नेणिवांतून त्यांनी समजून घेत आपल्या अमूर्त चित्रांतून आपला सोल त्यांनी शोधून काढला.

कोलते सरांनी शिक्षकी वसा घेतला तो प्रकर्षाने प्राध्यापक शंकर पळशीकर, सोलापूरकर, संभाजी कदम, गजानन भागवत ह्यासारख्या दिग्गज व प्रतिभावंत शिक्षकांकडून; पण तरीही शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या मनात स्वतःचा वेगळा ठसा उमटवला. पळशीकर सर म्हणजे कोलते सरांचं आराध्य दैवत. खरं तर आम्हा सर्वांचंच. ती शिक्षकांची शृंखला त्यांनी आजतागायत कायम जपली. जेजेतील अंतर्गत राजकारण, चाकोरीबद्ध परीक्षा व शिक्षण पद्धती अशा व्यवस्थापन यंत्रणेला कंटाळून १९९४ साली स्वेच्छानिवृत्ती घेतली,

अभ्यासाची ऐशी तैशी : प्राथमिक





सगळयात आधी
गणिताच्या तंगडया मोडल्या
आणि दिल्या फेकून इलेक्ट्रॉनिक चुलीत
मग त्याची बहीण भूमिती
तिच्या पायाखालची
भूमीच घेतली काढून आणि म्हटलं,
''लोंबकळ इथंच मितीशिवाय अधांतरी''
बिचारे बीजगणित
भाऊबहिणीशिवाय दुबळेच
काढून घेतले त्याचे कंस सगळे
आणि बीजच केले आंधळे
नंतर घेतला इतिहास,
त्याला आधी हास्यास्पद केला
मग टाकला पुरुन
पुराणातल्याही पुराणात
आई पोळीत पुरण भरत असे
अगदी तसा आणि ठेवला
त्यावर गरमागरम मोठा तवा
भूगोल आपला फिरतच होता
केंद्रापासून स्वतःभोवती गरगर
धरले त्याच्या काखोटीला
आणि दिला भिरकावून आकाशात
त्याला त्याचाच भूगोल
आठवणार नाही इतक्या दूर
मग घेतली भाषा
ती मात्र कविता वगळून
तिच्या काना-मात्रा, वेलांटया
स्वल्प-विराम, अनुस्वार इ. इ.
भरले सारे एका भक्कम बाटलीत
केले तिला सीलबंद आणि
दिली फेकून समुद्राच्या लाटात
ग्रीक देशातल्या एका विद्यापीठाचा
त्या बाटलीवर पत्ता लिहून
म्हटलं, पत्यावर पोहोचली तर
विद्यापिठाचे हाल आणि
नाही पोहोचली तर तिचेच
दुसऱ्या दिवशी घडले काय
तर कोंबडीला तीन पाय
पोपटाचा रंग निळा आणि
चिमणी पांढरी, मोर काळा
चोचीत आलेला मासा
न गिळणारा वेंधळा बगळा
सशाला शिंगे चार आणि
जिराफ चालवतोय कार
माकड करताहेत लग्न
बांधून पानांची बाशिंग
फळावर झाड मोठाले तर
कासव इवलुसे झोपाळ्यावर
आता मास्तर हसताहेत मिशीत
आणि आम्ही पोरे खुशीत
मी हळूच घेतला ब्रश
घातला रंगांच्या बशीत
चितारली चित्रे त्या सर्वांचीच
जिवंत आणि रसरशीत

रेखाटन आणि कविता : प्रभाकर कोलते

स्वतःतल्या चित्रकार, लेखक-कवीला नवीन अवकाश शोधण्यासाठी वाटा मोकळ्या करून दिल्या; पण त्याही परिस्थितीत त्यांच्यातला शिक्षक काही गप्प राहिला नाही, तो आजपर्यंत. विद्यार्थ्यांशी साधलेल्या संवादात आजही कोलते सर रमतात व स्वतः हरवून जातात. मग त्या संवादातून विद्यार्थ्यांना त्यांच्यातला चित्रकार, लेखक व कवीची प्रचिती येते. त्यांनी पळशीकर सरांकडून घेतलेला शिक्षकाचा वसा आजही टाकलेला नाही. माझ्या मते आज भारतात एकही चित्रकला विद्यालय नसेल जिथे कोलते सरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला नाही. तसं पाहिलं तर प्रगत व आधुनिक विचारांच्या कोलतेंना वर्षानुवर्षे चार भिंतीत अडकलेल्या शिक्षण पद्धती व सिलॅबस मान्यच नाही. त्यांच्या मते बौहाउसचे मर्म आपल्याकडे खऱ्या अर्थाने कळलेच नाही. जुजबी अनुकरण करून कोणतीही कलाशिक्षणव्यवस्था राबवली जाऊ शकत नाही. आपल्याकडील मानसिकता व व्यवस्थांचा विचार करूनच शिक्षण पद्धतीचा विचार मांडला गेला पाहिजे. पाश्चात्त्य देशातील कला क्षेत्रात त्या काळी होत गेलेल्या उलथापालथीच्या अनुषंगाने आधुनिक विचारांचे वॉल्टर गृपियास, पॉल क्ली, वास्ली कैंडीनस्की असे प्रतिभावंत चित्रकार, वास्तुविशारद, शिक्षक, कवी, लेखक ह्यांनी, कला, वास्तुकला, ग्राफिक डिझाईन, इंटेरिअर डिझाईन, टायपोग्राफी अशा विषयांचा आधुनिक कलाप्रवाहांचा परिचय बौहाउसने जगाला करून दिला. त्याप्रमाणे आपल्याकडे शिक्षण पद्धतीचा विचार केला जात नाही. त्यासाठी वैचारिक संवाद व्हावा लागतो आणि तो आपल्या शासनव्यवस्थेत होत नाही. असे परिवर्तन तेव्हाच होईल जेव्हा कलात्मक गुणवत्तेप्रती आपल्यात सजगता निर्माण होईल.

एकंदरीत आपल्याकडील वैचारिक मानसिकता व शैक्षणिक व्यवस्था पाहता आयुष्यात एस.एस.सी. तरी उत्तीर्ण होणं महत्त्वाचं आहे; त्याशिवाय शैक्षणिक प्रवासात पुढे जाऊच शकत नाही, मग ते चित्रकार होण्यासाठी जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घ्यायचा असेल तरी. लौकिक अर्थाने ते मान्य जरी असलं तरी अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही. एस.एस.सी. उत्तीर्ण होणं हे शैक्षणिक मार्गक्रमणात क्रमप्राप्तच आहे. ह्या सामाजिक विचार धारणेवर व मानसिकतेवर आपले मनोगत




चित्रकार प्रभाकर कोलते आणि अरविंद हाटे

आपल्या कवितासंग्रहातून 'अभ्यासाची ऐशीतैशी' ह्यात अभ्यासात रस नसलेल्या एका विद्यार्थ्याच्या संवेदना मिस्कीलपणे मांडल्या आहेत.

कोलते सर विद्यार्थी असल्यापासून ते व्यक्तिचित्रणही (पोर्ट्रेट पेंटिंग) तेवढ्याच शिताफीने करायचे. प्राध्यापक झाल्यानंतर, त्यांचे मित्र रत्नाकर सोहनींचं केलेलं पोर्ट्रेट तर पळशीकर सरांच्या पॅलेटचीच आठवण करून देते. एकदा त्यांनी केलेल्या एका नेव्ही कमांडरचं पोर्ट्रेट केमोल्डमध्ये फ्रेम करायला दिलेलं असताना पळशीकर सरांनी तिथे ते पाहिलं. दुसऱ्या दिवशी कॉलेजमध्ये आल्यावर पळशीकर सरांनी कोलतेंना आपल्या केबिनमध्ये भेटायला बोलावलं. कोलतेंच्या मनात आलं, आता पळशीकर सरांनी एवढ्या तातडीने निरोप पाठवला आहे म्हणजे काही धडगत नाही. केबिनच्या बाहेर उभे राहून 'सर आत येऊ का?' दारात उभे असलेल्या कोलतेंकडे पाहात, पळशीकर सर उठून म्हणाले, ''या या कोलतेसाहेब, या बसा! तुम्ही काय आता मोठे पेंटर झालात.'' कोलते सर बावचळून ''नाही सर, तसं काही नाही,'' आणखी ताणून न धरता पळशीकर सर म्हणाले, ''केमोल्डमध्ये फ्रेम करायला दिलेलं पोर्ट्रेट मी पाहिलं, चांगलं केलंय, पोर्ट्रेट करत राहा.'' नंतर कालांतराने कॉलेजमध्ये अधूनमधून पळशीकर सर कोलतेंना विचारायचे, ''काय मग पोर्ट्रेट पेंटिंग चालू आहे ना?'' कोलते त्यावर ''हो सर, चालू आहे.'' म्हणत वेळ मारून न्यायचे; पण प्रत्यक्षात पोर्ट्रेट काही होत नव्हतं. कोलते सरांच्या मनात भीती होती, की जर पळशीकर सरांनी आपल्याला पोर्ट्रेट दाखवायला सांगितलं तर काही खरं नाही आणि मग एखाद्या साधनेला



जलरंगात माउंट बोर्ड (१९९०)



कॅनव्हासवर ॲक्रेलिक (२०२०)



जलरंगात माउंट बोर्ड (१९९०)


अथवा तपश्चर्येला बसावं तसं पंचेचाळीस दिवसांत पंचेचाळीस अप्रतिम पोर्ट्रेट केली, त्यात काही इम्प्रेशनिस्ट शैलीत केलेली आहेत तर काही पळशीकर सरांच्या पॅलेटची आठवण करून देणारी आहेत. त्यात त्यांनी केलेलं इम्प्रेशनिस्ट शैलीत अप्रतिम सेल्फ पोर्ट्रेटचाही समावेश आहे. त्या सर्व पोर्ट्रेट पेंटिंगजचं प्रदर्शन १९९७ साली जेजेच्या कला दालनात केलं; पण ते पाहायला पळशीकर सर हयात नव्हते; ती खंत आजही कोलते सरांच्या मनात खोल रुजली आहे.

सुरुवातीच्या काळात १९६०-७० च्या दरम्यान कोलते जलरंगात (वॉश टेक्निक) ह्या पद्धतीने पेंटिंग करायचे. एकदा रंग लावून तो सुकल्यावर पुन्हा पुन्हा पाण्याखाली धरून त्यातले काही रंग हळुवार धुऊन काढायचे, तर काही रंग ओघळलेल्या स्थितीत तसेच ठेवायचे. एकावर एक, असे अनेक रंगांचे पारदर्शक थर निर्माण व्हायचे आणि त्यातून मग एखादा कवडसा अथवा एखाद्या खिडकीचा भाग व त्यातून दिसणारं दूरवरचं अवकाश, अशा अनेक तरल छटांचा साक्षात्कार व्हायचा. त्यांचं प्रत्येक चित्र वेगळी एक तरल अनुभूती देणारं आहे; पण तरीही त्यांचा असा ठसा कायम दिसून येतो. स्वतःशीच स्वतःचा प्रवास करीत निखळ न्याहाळत अंतर्मनाला खोल स्पर्श करीत.

तसं पाहिलं तर आमच्या वेळेस जेजेमध्ये तसे अनेक प्रतिभावंत शिक्षक होते. गजानन भागवत, सोलापूरकर, कदम, साब्बणवार, सुखडवाला, मृगांक जोशी, पॉल कोळी, आवर्सेकर, शानबाग; पण कोलते आणि काशिनाथ साळवे ही जोडगोळी प्रकर्षाने विद्यार्थ्यांमध्ये खूप प्रिय होती; कारण ते आमच्यातले होऊन संवाद साधायचे, तसे ते दोघे जिवलग मित्रही आहेत. विद्यार्थ्यांना ते आपल्यातले वाटायचे. अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी घडवलं, तर अनेक विद्यार्थ्यांवर त्या दोघांचा प्रभाव होता. साळवे सर मात्र कधीही बघावं तर धावपळीतच असायचे, कोणत्या ना कोणत्या कामात व्यस्त असायचे. साळवे सरांवर पळशीकर, मोहन सामंत यांचा प्रभाव होता; ते नेहमीच वेगवेळ्या माध्यमांचा शोध घेत असायचे. फुटलेल्या पोर्सिलीनच्या मूर्ती, प्लास्टर ऑफ पॅरीस, अनेक टाकाऊ वस्तूंमधून ते अप्रतिम कलाकृती निर्माण करायचे, त्यांचं प्रिंटमेकिंग ह्या माध्यमातही प्रभुत्व होतं. तर कोलते सरांवर, पळशीकर, अंबादास, गायतोंडे यांच्या सहवासात आल्यामुळे त्यांच्यावर प्रभाव होता, पण पॉल क्लीच्या अभ्यासातून त्यांच्या जाणिवा विकसित होत गेल्या आणि ते बाह्य वास्तवापेक्षा अंतर्मनातले अबोध वास्तव्य शोधण्यात रमले आणि त्यातून विशुद्ध संवेदनांचे अमूर्त विश्व



प्रभाकर कोलते आणि जिवलग मित्र काशिनाथ साळवे




शंकर पळशीकर जन्मशताब्दी सोहळा, एन.जी.एम.ए., मुंबई (२४ डिसेंबर २०१६ - ३१ जानेवारी २०१७)

त्यांच्यासाठी उलगडत गेले; पण तरीही त्या दोघांनी स्वतंत्र शैलीच्या वाटा शोधून काढल्या.

तसे तर भागवत, कोलते, साळवे ह्या सरांबरोबर अनेक प्रदर्शनांचं आयोजन करण्याचं भाग्य मला लाभलं, ज्यामुळे पुढील व्यावसायिक जीवनात त्या अनुभवांचा लाभ झाला. प्रत्येक प्रदर्शनाच्या वेळी वेगळा विचार, वेगळी संकल्पना, ह्याचं मार्गदर्शन मिळत गेलं. २०१७ साल हे पळशीकर सरांचं जन्मशताब्दी वर्ष. पळशीकर सरांची थोरली कन्या, नियतीच्या मनात काही आप्तेष्ट मंडळींनं बरोबर सरांचं शताब्दी वर्ष निमित्त, त्यांच्या आठवणीत छोटेखानी कार्मक्रम करण्याचं ठरवलं होतं; पण कोलते सरांबरोबर कार्यक्रमाची चर्चा केल्यावर कार्मक्रमाची दिशा व आकारच बदलून गेला. कोलते सरांनी पळशीकर सरांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या चित्रांचं प्रदर्शन एन.जी.एम.ए., मुंबई (National Gallery of Modern Art, Mumbai) मध्ये करायचं ठरवलं. २४ डिसेंबर २०१६ ते ३१ जानेवारी २०१७, असे महिनाभर विविध कार्मक्रम आयोजित केले. शास्त्रीय संगीत, व्याख्यानमाला, कवितावाचन, नाट्यवाचन, चर्चासत्र असे अनेक भरगच्च कार्मक्रम यशस्वीरीत्या पार पाडले. त्याचं सूक्ष्म निरीक्षण, सजगता, अनेक छोटे छोटे बारकावे समजावून कालक्रमानुसार प्रदर्शनाची आखणी केली. कोलतेंमुळे अनेक कलाकारांचं व विद्यार्थ्यांचं पाठबळ मिळत गेलं. अगदी ललित कला अकादमी दिल्ली, अनेक खासगी संग्रहक, चित्रकला विद्यालय, खासगी संस्थांकडून पळशीकरांची चित्रं सहज मिळू शकली. कोलते व पळशीकर कुटुंबांनी प्रदर्शनाच्या डिझाईनची व कार्यक्रमाची आखणी करण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली आणि ती कोलते सरांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पूर्ण करण्याचं भाग्य मला लाभलं. ह्या प्रदर्शनाला अनेक ज्येष्ठ चित्रकार व मान्यवरांनी भेट देऊन प्रशंसाही केली.


कोलते सरांनी शालेय विद्यार्थ्यांबरोबरही वेगवेगळे प्रयोग केले. कोविडच्या काळात सगळं जग थांबलं होतं. तेव्हा सोलापूर जिल्ह्यातील के. पी. गायकवाड हायस्कूलचे चित्रकलेचे शिक्षक मयूर दंतकाळे ह्यांनी शाळेत चित्रकलेबरोबर, साहित्यिक वाचन, कविता, पत्रलेखन असे अनेक नवनवीन शैक्षणिक तत्त्वावर प्रयोग केले. त्यांनी ऑनलाईन विद्यार्थ्यांचा व कोलते सरांचा संवाद साधून विद्यार्थ्यांना कोलते सरांना पाठवण्यासाठी चित्ररूपात पत्रं लिहायला सांगितली. एखाद्या जादूने भारावल्यासारखे प्रेरित होऊन सहा ते दहा वयोगटातील ३५-४० विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयांवर चित्रं काढून पत्रं पाठवली. ती चित्रं पाहून कोलते भावुक झाले व त्या चित्रांवर त्या लहान मुलांसाठी कविता केल्या, कवितांची शीर्षकंही बालमनाला भुरळ घालतील अशीच आहेत.






पत्रलेखन, शाळा, अशी शाळा, विठ्ठल, कविता ह्या सगळ्या कविता ते बालकवी होऊन निरागस, निर्व्याज आनंदाने लिहिल्या, अक्षय आनंद देणाऱ्या. त्या कविता मुलांनी काढलेल्या चित्रांबरोबर पुस्तकरूपात छापल्या. कोलते सरांसारख्या प्रतिभावंत व प्रख्यात चित्रकार, कवी, लेखकाच्या कवितांबरोबर आपली चित्रं छापलेली पाहून त्या बालमनांचा आनंद त्यांच्या डोळ्यांत मी प्रकाशन सोहळ्याच्या प्रसंगी पाहिला. त्या भावुक क्षणांचा साक्षीदार होण्याचं भाग्य मला लाभलं.


दोन वर्षं कोविड साथीच्या काळात अख्खं जग जेव्हा स्तब्ध झालं होतं, त्या दोन वर्षांच्या काळात कोलते सर मात्र जगाशी काही संबंधच नसल्यासारखे अव्याहत पेंटिंग, वाचन, लेखन आणि कविता करण्यात मग्न राहिले. त्या काळात परेश मकवानासारख्या चित्रकलेवर आणि चित्रकारावर त्या अनुषंगाने कोलतेंवर प्रेम करणाऱ्या तरुण मित्राने सर्वार्थाने कोलते सरांसाठी सगळी व्यवस्था चोख बजावली होती. त्यानं फर्मानच काढलं, सर तुम्हाला कुठेही बाहेर जायची आवश्यकता नाही, जे काही हवं ते घरीच मिळेल, अगदी पेन्सिल, खोडरबरसुद्धा. त्या दोन वर्षांच्या काळात कोलते सरांनी जवळ जवळ अडीचशेहून अधिक चित्रांची निर्मिती केली. ह्या सर्व चित्रांचं प्रदर्शन परेश मकवानानेच नवीनच








कॅनव्हासवर ॲक्रेलिक रंगात २०२०



कॅनव्हासवर ॲक्रेलिक रंगात २०२०



बोर्डवर ॲक्रेलिक रगात २०२०

स्थापन केलेल्या नवी दिल्लीतील दोन मजली ट्रेझर आर्ट गॅलेरीमध्ये भरवलं. कोलतेंची पेंटिंग ट्रेजर आर्ट गॅलेरीत पाहणं म्हणजे एक अविस्मरणीय अनुभूती होती. गॅलेरीचा डिस्प्ले, लेआऊट, प्रकाशयोजना, ह्या सगळ्याच गोष्टीत इतर गॅलेरीपेक्षा वेगळेपणा जाणवतो. संपूर्ण भारतात सर्वार्थाने अप्रतिम अशी एकमेव गॅलेरी असावी.

चित्रकार किती सजग असू शकतो ह्याचं उदाहरण म्हणजे प्रभाकर कोलते. ते असेच एकदा रस्त्यानं जात असताना रस्त्यात पडलेलं जीर्ण पुस्तक दिसलं; त्यात काही छापलेली पेंटिंग्ज दिसली म्हणून त्यांचं लक्ष वेधलं गेलं. ते जीर्ण पुस्तक उचलून बघितलं तर त्यात अनेक पाश्चात्त्य व भारतीय चित्रकारांची पेंटिंग्ज छापलेली होती. त्या पुस्तकाची अवस्था पाहून ते विचलितच झाले. मग त्यांनी ते पुस्तक घरी आणलं. जरा स्वच्छ केलं. त्यातली काही चित्रं कापून काढली व ती एका ५ x ५ फुटाच्या कॅनव्हासवर चिकटवून एक अप्रतिम कोलाज तयार केलं. खरं तर ती कापून चिकटवलेली चित्रं अनेक चित्रकारांची होती खरी; पण तरीही तो संपूर्ण कॅनव्हास कोलतेमय झाला होता. ती कलाकृती म्हणजे एका संवेदनशील चित्रकाराने त्या पुस्तकातील चित्रकारांना अर्पण केलेली आदरांजलीच होती.

कोलते सरांच्या चित्रनिर्मितीवर अथवा चित्रांवर भाष्य करण्याएवढी प्रगलभता माझ्यात नाही; पण त्यांची चित्रं म्हणजे गूढ अनुभूती देणारी आहेत, तात्त्विक मर्मचा व भावभावनांचा शोध घ्यायला लावणारी, अगदी जी.ए. कुलकर्णींच्या कथेसारखी, वाचून खोल विचारात अंतर्मुख करणारी. तसेच कोलतेंची चित्रं म्हणजे आकार, अवकाश, ह्यांच्याशी साधलेला मुक्त संवाद. प्रकाशाच्या विविधतेतून निर्माण झालेल्या अनुभूतीतून सृजनात्मक संवेदनांचा तो आविष्कार आहे. बघणारा त्या अवकाशात कित्येक प्रकाशवर्षं दूर हरवून जातो; पण तेवढाच तो सजग, संवेदनशील असावा लागतो हे तेवढंच खरं. त्यांची चित्रं पाहताना त्यांचं रंगांशी व अवकाशाशी असलेलं नातं उलगडत जातं. कोलतेंनी त्यांच्या निर्मितीतून कोलते नावाची आपली एक वेगळी परिभाषा निर्माण केली, त्यांची चित्रं म्हणजे त्यांची रोजनिशीच असावी. त्यांची चित्रं पाहिली आणि समजली असं होत नाही तर ती समजण्यासाठी स्वयंसिद्धता असावी लागते. चित्र वाचायची नसतात, तर आकार आणि अवकाशाच्या परिघाबाहेर जाऊन त्याचा स्वानुभव घ्यावा लागतो, ती परिपक्वता तेव्हाच येईल जेव्हा तुम्ही स्वतः चित्र होऊ शकाल. तसे पळशीकर सरांनी अनेक विद्यार्थ्यांच्या रंगपेटीत प्रकाश टाकला तसाच कोलतेंच्या चित्रांतून त्या प्रकाशाच्या छटा व प्रतिमा दिसून येतात. आत्मपरीक्षण हे कोलतेंच्या कामाचं मर्म दिसून येतं. ते नेहमी म्हणतात, मी कधीच बघून चित्र काढत नाही, आधी मी चित्र काढतो आणि नंतर पाहतो. ह्याचाच अर्थ ते अंतर्मनाने अंतर्मुख होऊन चित्र काढतात. त्यांच्या

व्यक्तिगत प्रवासाबरोबर त्याचा वाचनप्रवासही चौफेर आहे. त्यांच्या बोलण्यातून अनेकदा अध्यात्म व तत्त्वज्ञानाचे प्रवाह वाहात असतात, अनेकविध जीवनानुभवाचा स्पर्श असतो. आकार, अवकाश, रंगवेध हे त्यांच्या चित्रांतून गुणविशेष दिसून येतात. त्यांचे लेखन म्हणजे त्यांच्यासाठी आहार असावा, तर कविता हे निर्मळ स्वच्छ पाणी आणि चित्र म्हणजे त्यांचा श्वास असावा; त्यात जीवनातील ऐहिक गोष्टींचं अस्तित्वच नसतं.

कोलतेंना लेखक, कवी व प्रख्यात अमूर्त चित्रकार म्हणून त्यांच्या असामान्य योगदानासाठी अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. एवढेच नाही तर त्यांच्या चित्रकलेतील योगदानासाठी ग्वाल्हेर युनिव्हर्सिटीने मानद डॉक्टरेट (डी.लिट.) देऊन सन्मानितही केलं; पण त्यांनी कधीही आपल्या नावापुढे डॉक्टर ही उपाधी लावली नाही. त्या अनेक सन्मानांचा व पुरस्कारांचा वर्ख आपल्या मनावर आपल्या वागणुकीवर चढू दिला नाही तर पळशीकरांच्या शिकवणीतून सतत आपले पाय जमिनीवर घट्ट रोवून ठेवले ते आजतागायत. ते अव्याहत रमतात ते विद्यार्थ्यांसमवेत संवादात, आपल्याकडे जे जे आहे ते ते सर्व विद्यार्थ्यांना निःस्वार्थीपणे देण्यात त्यांना आनंद मिळतो. हीच तर खऱ्या अर्थाने प्रतिभावंत शिक्षकाची ओळख.

कोलते सर एक विरळाच चित्रकार असेल ज्यांनी इतर पस्तीसहून अधिक भारतीय व पाश्चात्त्य चित्रकारांवर दिवाळी अंकांतून आणि वर्तमानपत्रांतून चिंतनात्मक लेख लिहिले. मौज दिवाळी अंकातील १९९८ पासून ते २०२१ पर्यंतचे लेख म्हणजे दृक्-कलेच्या विद्यार्थ्यांसाठी आणि कलासक्त प्रेक्षकांसाठी एक अनमोल ठेवा आहे. ते सर्व लेख रवींद्र जोशी यांनी एकत्र संकलित आणि संपादित केलेल्या 'दृक्-चिंतन' ह्या पुस्तकरूपात अनुनाद प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. त्या लेखांमधून वाचकांना उत्तम शब्दसंपत्तीची अनुभूती येते, ते लेख कोलतेंनी समीक्षक म्हणून लिहिले नाही तर त्या त्या चित्रकाराचं अभ्यासपूर्ण तंत्र व भावभावनांचा उमजणाऱ्या भाषेत आलेख उलगडून दाखवला आहे; ज्यामुळे विद्यार्थ्यांसाठी व वाचकांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरावे. लेखात शब्दांचं अवडंबर नाही की साहित्यिक शब्दालंकार नाही. सोप्या उमजत जाणाऱ्या भाषेत तो चित्रकार सखोल उलगडून दाखवला आहे. निर्मितिक्षम व संवेदनशील शिक्षक असे दोन्ही एकाच वेळी असलेले कोलते, पळशीकर सरांनी प्रकाशमान केलेल्या वाटेवर मार्गक्रमण करीत असल्याची प्रचिती त्यांच्या प्रत्येक निर्मितिगणिक दिसून येते; मग ते चित्र असोत किंवा लेख असोत अथवा कविता.

• • •

(भ्रमणभाष : ९८१९०४२६५६/arvindhate@yahoo.com)

एक चित्रकार तो
वेड्यासारखा रंग फेकतो
जसा पूर येतो कुठून कैसा
घडवतो मनातला कॅनवास तो
जिवंत सळसळत रक्त दर्शवितो.

तो एक मूर्तिकारही होतो
मनातल्या आकृतींचा साचा घडवतो
आणि माणसाच्या आत्म्याला
दीर्घ श्वास घ्यायला भाग पाडतो.
त्याच्या मनातील सर्व प्रेमळपणाचा
जुना काळ कधीही विरत नाही
तो व त्याची चित्रं माणसाला
अक्षय अनाद देऊन जातो.

– अरविंद हाटे

'युगवाणी'च्या वर्गणीबाबत आणि अंक नियमित मिळण्याबाबत संपर्क
श्रीमती सना पंडित, व्यवस्थापक, युगवाणी, द्वारा : विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
भ्रमणभाष/व्हाट्सॲप : ७७०९०४७९३३

अनुक्रमणिका

चित्रकार
प्रभाकर कोलते
विशेष

लेख

अमूर्त अवकाशातील शब्दबिंब

अर्चना दीक्षित आपटे

चित्रकला हा एक अत्यंत गंभीर विषय आहे. ती एक साधना आहे. ती छंद, विरंगुळा, करमणूक अशासारखी थिल्लर बाब नाही. अभ्यास आणि ध्यास यामधील अंतर मिटवण्यासारखी धाडसाची बाब आहे. होणे आणि असणे यामधील आंतरिक 'पीळ' सोडवण्याचा प्रयास आहे. चित्रकार होण्यासाठी चित्र काढणे आणि चित्र काढता काढता चित्रकार असण्याची जाणीव होणे यापैकी एका मार्गाची निवड करण्यासारखी आहे. मी 'असण्या'कडे झुकलेला चित्रकार आहे.

– प्रभाकर कोलते

चित्रकला या विषयावर विविध स्वरूपांचे लेखन झाले आहे. चित्रकारांची चरित्रे स्वतंत्रपणे लिहिणारे अथवा भाषांतरित करणारे, चित्रकारांच्या कलाकृतीवर आस्वादात्मक स्वरूपाचे लेखन करणारे आणि चित्रकलेची मीमांसा-सैद्धांतिक मांडणी करणारे, गोडसे, आचवल, कदम, परांजपे, बहुळकर, अवचट, पुरंदरे, घारे इत्यादी अनेक चित्रकार लेखक आहेत; परंतु स्वतःच्या चित्रकलानिर्मितीमागील प्रेरणा समजावून सांगणारे किंवा आपल्या कलेविषयी मराठी भाषेत लिहिणारे दोनच प्रभाकर-बरवे आणि कोलते. या दोघा प्रभाकरांची ग्रहणशक्ती, चिंतनात्मक धाटणी स्वतः कमावलेली व लेखनशैली उपरोक्त पूर्वसूरींचे संस्कार नसलेली आणि नंतरही कोणी अनुकरण करू न शकलेली अशी अस्सल वाणाची आहे. त्यातही 'बोली अरूपाचे रूप दाखवण्याचा' कोलते सरांचा एकूणच थाट निराळा आहे, हे ठळकपणे जाणवते. सर त्यांच्या लेखनाची स्वतंत्र दृक्-मुद्रा मराठी भाषेवर उमटवतात.

सातत्याने चित्रसाधनेत व्यग्र राहून, चित्रकलेसंबंधी अभ्यासपूर्ण आणि गंभीरपणे मराठी भाषेत नेमाने लेखन करणारे, साहित्य-संगीत-नाटक-चित्रपट आदी कलांचा व्यासंग असणारे, चिंतनाची कास धरणारे कोलते सर चित्राविषयी तळमळीने व आत्मीयतेने जे लिहितात, ते मला समजायलासुद्धा वेळ लागतो. कोलते सरांच्या लिखाणावर 'समीक्षात्मक लेखन' करण्याची माझी क्षमता नाही याची सजग जाणीव ठेवून त्यांच्या (फक्त गद्य-लेखनाकडे लक्ष केंद्रित करून) लेखन-वैशिष्ट्यांविषयी केवळ मला जाणवलेल्या काही नोंदी मांडत आहे.

१९६८ मध्ये सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट येथून पेंटिंग या विषयातील पदविका मिळवून, बावीस वर्षे अध्यापन करून कोलते सरांनी सेवानिवृत्ती स्वीकारली. आजही कोलते सर 'हाडाचे शिक्षक' आहेत. स्वतःची स्वतंत्र वाट शोधायला उत्सुक असलेल्या कलेच्या विद्यार्थांसाठी प्रेरणा देणारे एक सजीव (अ)मूर्त ऊर्जास्रोत आहेत!

विशिष्ट चित्रविषय न घेता चित्र काढताना चित्रप्रक्रियेला सर्वाधिक महत्त्व देणारे, चित्रविषयक दृश्य-विचार सातत्याने करणारे; परंतु चित्रनिर्मितीचा विचार चित्रातूनच आणि अमूर्ताचा विचार अमूर्तातूनच करणारे, चित्राद्वारेच चित्राची व्याख्या करणारे, 'चित्रकला ही एक भाषा आहे' असे ठामपणे सांगणारे कोलते सर त्या भाषेचे व्याकरणदेखील सांगतात. प्रेक्षकांना आणि वाचकांना 'सर्जनतेचे आनंदधाम' अगदी जवळून दाखवतात.

'कलेपासून कलेकडे' (२००८), 'दृक्-चिंतन' (२०२२) हे दोन संपादित लेखसंग्रह आणि 'मुलांसाठी लिहिलेल्या कविता' (२०२०) व 'अभ्यासाची ऐशीतैशी' हे दोन कवितासंग्रह हे त्यांचे प्रकाशित साहित्य आहे. याशिवाय वेळोवेळी मासिकांतून-वृत्तपत्रांतून केलेले

अनुक्रमणिका



लेखन, अप्रकाशित अनुवाद आणि कविता, प्रसंगी प्रदर्शनांच्या कॅटलॉग्जसाठी इंग्रजी भाषेतून केलेले लेखन असे खूप काही शिल्लक आहेच.

जन्म निसर्गरम्य कोकणात आणि बालपण मुंबई येथील वरळीतील बावनचाळीत ही भावसमृद्ध शिदोरी सोबत घेऊनच कोलते सरांचा प्रवास सुरू झाला. प्राथमिक शाळेतील जयंत दातार आणि बालमोहन माध्यमिक शाळेतील एम.एस. जोशी ह्या चित्रकलेच्या शिक्षकांनी कोलते सरांना चित्रकलेची गोडी लावली. पुढे जे. जे. स्कूल ऑफ आर्ट येथल्या शिक्षणाच्या काळात चित्रकलेचे 'आकर्षण' वाटून चित्राच्या सान्निध्यात राहण्यासाठी शंकर पळशीकर सरांचे 'गुरुत्व' पुरेसे होते.

'अभ्यासाची ऐशीतैशी...' मध्ये कोलते सरांनी स्वतःच्या जडणघडणीचा लेखाजोखा मांडला आहे.

''टर्नरकडून रंगाचा पोतवारा घेतला,
रेम्ब्राकडून प्रकाश
इम्प्रेशिनिष्टांकडून विचार...
व्हानगॉगचा न्यारा आत्मविश्वास तर
गोग्याची हद्द नसलेली जिद्द
इथे महासागराच्या अलीकडे
चित्रातून आधी रवी वर्मा भेटले...
मग पंडित, मुळगावकर, दलाल
त्यांचे त्यांचे मार्ग दिसले
हुसेनमधला पिकासो दिसला
त्याने चित्राचे पीक काढले
गायतोंडेची जगावेगळी चित्रसमाधी भावली,
तर रोथकोचे निःशब्द नीरव अभंग अनंतत्व
मनात उतरले
पळशीकर सरांनी या सगळ्यांची मोट बांधून ठेवली
माझ्या खांद्यावर, म्हणाले,
'सोड किंवा शोध आपली वाट'

शंकर पळशीकर, सोलापूरकर, कदम, असे दृष्टी देणारे शिक्षक कोलते सरांना लाभले. 'पाहून रंगवू नकोस, रंगवून पाहा' आणि 'काय रंगवायचे यापेक्षा काय पाहायचे अन् कसे पाहायचे' हे दोन्ही कानमंत्र देणारे पळशीकर हे कोलते सरांच्या एकूण जडणघडणीतील महत्त्वाचे कलावंत! सरांच्या चिंतनशीलवृत्तीने अभिव्यक्त होण्यात शंकर पळशीकर यांचा मोठा वाटा आहे, असे कोलते सांगतात. पळशीकरांनी सरांसाठी शब्दभांडार उघडताना ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, अमृतानुभव, उपनिषदे ते 'The Tao of Physics' इत्यादी अनेक पुस्तके त्यांना भेट म्हणून दिली. 'आश्चर्याची बाब म्हणजे सरांनी चित्रकलेविषयी एकही पुस्तक दिले नाही' असे कोलते सर 'चित्रनिर्मितीचा वसा' या लेखात लिहितात.

या साऱ्या उभ्या, आडव्यातिडव्या वाचनातून संवेदनशील मनाच्या कोलते सरांना मराठी भाषेची लय, नादमधुरता जाणवली. मराठी भाषेच्या घाट-वळणांचा आणि भाषिक अभिव्यक्तीतील थेटपणाचा गहिरा संस्कार कोलते सरांच्या भाषिक आकलनावर झाला. या साऱ्याला सत्यकथा, आलोचना, युगवाणी यासारखी नियतकालिके आणि छंद, असो, वाचा यांसारख्या अनियतकालिकांची पोषक सोबत होती. भागवत, पटवर्धनादी एका बाजूला आणि पाध्ये, नेमाडे, चित्रे, शहाणे, ढसाळ, कोलटकर, नगरकर, हे दुसऱ्या बाजूला अशी स्वतःची मशागत करून घ्यायची सोय होती. या 'सारस्वत'पूजेसोबत Albert Camus, Jean-Paul Sartre, Pablo Neruda, Guy de Maupassant,

Khalil (Kahlil) Gibran, जे. कृष्णमूर्तीदेखील सोबत होतेच.

बेंद्रे, हेब्बर, पद्‌मसी, तय्यब मेहता, साबावाला, रझा, आरा, बरवे, गायतोंडे, अशा तत्कालीन ज्येष्ठ चित्रकारांशी कोलते सरांचा सादर संवाद होता आणि त्यांचा कोलते सरांवर हार्दिक स्नेह होता. स्वतंत्र विचार करण्याची उपजत क्षमता आणि आध्यात्मिक पिंड असलेल्या बहुश्रुत कोलते सरांच्या भाषेतले सौष्ठव गजानन भागवतांना जाणवले आणि त्यांनी सरांना सत्यकथेसाठी लिहायला सांगितले. हा आपल्या समग्र वाचकांच्या कुंडलीतला एक घाऊक भाग्ययोग होता हे नक्कीच.

आपल्या जगण्याला आत्मसाक्षीभावाने भिडून, स्वानुभवाच्या कसोटीवर घासून, ग्रहण केलेले मर्म चित्रात रेखाटण्याचे आणि शब्दात रूपांतरित करून मग उलगडून दाखवण्याचे सामर्थ्य सरांमध्ये होते. त्याच वैचारिक क्षमतेच्या बळावर त्यांनी सत्यकथेतून लेखनाची सुरुवात केली. 'उतणार नाही मातणार नाही म्हणत घेतलेला हा वसा' त्यांनी आजतागायत टाकलेला नाही.

चित्रकारांच्या जगण्याविषयी लिहिताना त्या चित्रकाराची मानसिकता, त्याची जीवनमूल्ये, त्याने केलेली निवड व त्यामुळे भोगावे लागलेले बरे-वाईट परिणाम याविषयी सर एखाद्या मनोविश्लेषणतज्ज्ञासारखा विचार करून त्या चित्रकाराच्या मनाची उकल अतिशय ममत्वाने करतात व चित्रकाराच्या मनातील दुःख व समाजव्यवहार यामधील द्वंद्वाला आरेखतात. स्त्री-पुरुष नातेसंबंधातील गुंतागुंत व त्याचे चित्रकारांच्या कलाजीवनावरील होणारे परिणाम रंगवतात. कोलते सरांनी याविषयी केलेली भाष्ये, नोंदवलेली निरीक्षणे आणि दाखवलेले आयाम त्यांच्या प्रगल्भ जाणिवांचे प्रत्यय देतात.

''स्त्री-पुरुष संबंधात, शारीरिक, मानसिक व बौद्धिक पातळीवर परस्परांचे 'गुंतणे', परस्परांमधील अजागृत गरजा आणि पूरक क्षमता यांना जाग आणते. ती जाग त्यांचे लौकिक नाते तर दृढ करतेच; परंतु त्या पलीकडेही पाहायला साहाय्य करते.''

(चित्रकलेतला सेंट फ्रान्सिस, दृक्-चिंतन/७८)

चित्रकार सुझाच्या हे लक्षात आले असल्याचे निरीक्षण कोलते सर मनोविश्लेषणात्मक दृष्टीने नोंदवतात, तेव्हा त्यांची भाषा हळुवार, मृदु आणि अधिक उत्कट होते. प्रगल्भ अशा स्त्री-पुरुष नात्यातील एकमेकांत मिसळलेल्या 'रंगराशी' दाखवताना वासिली कॅन्डिन्स्की या चित्रकारावरील लेखात कॅन्डिन्स्कीची जातकुळी आणि त्याच्या आंतरिक गरजा, सर मोकळेपणाने सांगतात. कॅन्डिन्स्की-गाब्रिएल यांना एकमेकांच्या सहवासातून कलाव्यासंगात आवश्यक असणारा वैचारिक अवकाश, भावनिक ओलावा आणि आत्मिक बळ मिळत गेल्याने त्याचा त्यांच्या सर्जनशीलतेवर झालेला पोषक परिणाम सर आवर्जून दाखवून देतात.

चित्रकाराच्या आंतरिक प्रेरणा, त्याचा ध्यास, त्याने नाकारलेले मार्ग व त्यावर दृढ असण्याची त्याची ताकद आणि शेवटी एकाग्रतेने चित्राद्वारे अभिव्यक्त होताना त्याची माध्यमाशी भिडण्याची क्षमता या साऱ्याचे उभे-आडवे छेद घेऊनही एकसंध रूपात चित्रकाराचे व्यक्तित्व त्याच्या चित्रवैशिष्ट्यांसह सर शब्दात रेखाटतात.

एकसुरीपणात विविधता आणण्यापेक्षा प्राणतत्त्वात शुद्धता आणि पारदर्शकता बिंबवणे हे गायतोंडे यांना महत्त्वाचे वाटत होते. या विधानातून गायतोंडे यांचा अभिजाततेचा पिंड कोलते सर अधोरेखित करतात. वाचकाची चित्रग्रहण क्षमता अधिक सकस होईल असा विश्वास कोलते सरांच्या या भाषेत जाणवतो.

सरांच्या लेखनात येणारे त्या-त्या चित्रकाराच्या तत्कालीन सामाजिक, राजकीय स्थितीचे नेमके आणि यथोचित संदर्भ हे केवळ काळाचे भान यावे म्हणून येत नाहीत. तत्कालीन समाज-संस्कृती, राजकीय घटना आणि मानवतेच्या हितासाठी व्यक्तिस्वातंत्र्यासह अभिव्यक्ति-स्वातंत्र्याची केलेली पाठराखण-या सगळ्यांचा चित्रकाराच्या निर्मितिप्रेरणेशी असलेला अतूट संबंध सर सुस्पष्ट करतात.

'गेर्निका' (Guernica) या पिकासोच्या प्रसिद्ध चित्राची कोलते सरांनी केलेली आलोचना आपण प्रत्यक्षच वाचली तर कोलते सरांनी त्या घटनेची आणि तत्कालीन परिस्थितीची पुरेशी माहिती गोळा केली होती हे आपल्या लक्षात येईल. नुसती संपूर्ण माहिती गोळा करून वा अभ्यास करून तर्कसुसंगत मत मांडता येतेच; परंतु पिकासोने चित्रातून दाखवलेले त्याच्या मनाला

जाणवलेले दूषित वर्तमान आणि दूरदृष्टीला आकळलेले त्याचे भविष्यातील परिणाम समजण्यासाठी, पिकासोच्या मनोवेदनेला भिडणारी कोलते सरांची संवेदनशील वृत्ती आणि सूक्ष्म दृष्टीच कामी येते.

''त्याने वेदनेला गोंजारले नाही, तर तिला बोलका आकार दिला तो ह्या चित्रात... क्रौर्य व्यक्त करायला लागते त्याहून कितीतरी अधिक धारिष्ट्य पिकासोने हे चित्र रंगवताना दाखवले होते! त्याने एकप्रकारे स्पेनच्या शासनावरती अत्यंत आक्रमकरीत्या चित्रास्त्रच टाकले! अर्थात हे चित्र निषेधाचा चेहरा म्हणत जसे प्रभावी ठरले तसे ते त्यातील चित्रमूल्यांचा कस दर्शवत मानवी संवेदनशीलतेलाही स्पर्श करणारे ठरले होते हे विशेष!''


(दृश्यकलेतला मिडास राजा-दृक्-चिंतन/२४२)

चित्रास्त्र, निषेधाचा चेहरा, चित्रमूल्यांचा कस यासारख्या अर्थगर्भ शब्दसंहिता वाचकावरील होणाऱ्या गंभीर-अस्वस्थतेच्या परिणामाची तीव्रता वाढवतात.

''माझी चित्रे कृती आहेत-प्रतिकृती नव्हेत'' हे लिहून कोलते सर स्वतःच्या चित्रनिर्मितीमागील प्रेरणांचा शोध घेण्याच्या निमित्ताने चित्रकलेविषयीचे चिंतनात्मक विचार पारिभाषिक संज्ञेसह अभिव्यक्त करतात व आपल्या दृष्टीची अनके कवाडे खुली करतात. त्यांच्या मते, चित्रसाधना करणे म्हणजे दररोज केवळ चित्र रंगवणे नव्हे, तर चित्राविषयीचे चिंतन, मनन, प्रयोग, वाचन, लेखन करणे आणि कधी स्टुडिओत काही न करता केवळ बसून राहणे असते. सर अतिशय सुस्पष्ट आणि नेमके लिहितात. ते लेखन अधांतरी नसून पायाभूत असते.

गणेश हलोई यांना प्रत्यक्ष चित्र काढताना कोलते सरांनी पाहिलेले आहे. तो प्रत्यक्ष अनुभव व्यक्त करताना, सरांचे चिंतनशील मन सतत दक्ष असल्याचा प्रत्यय, सरांचे लेखन वाचताना येतो.

''त्यांच्या पुढ्यात मोठाला कागद, सभोवताली रंगांच्या बश्या आणि अंतर्मनाशी बांधलेली त्यांची शांत नजर असे त्यांचे डोळस असणे कुणालाही भावेल असेच. कधी विविध रंगांना वेगवेगळ्या बाजूंनी कागदावर स्वैर वाहू देऊन त्यांच्या विविध छटांना एकमेकांत हळुवारपणे मिसळून नेत्रदीपक आशय वाहत्या रंगांच्या काठांवर मुक्त सोडून देऊन, तर कधी त्या रंगछटांना कागदावर पसरवत



प्रभाकर कोलते आणि अर्चना दीक्षित-आपटे (छायाचित्र श्रीराम पन्की)

आशयाला अस्तित्वाशी बांधून नेत्रदीपक अवकाशाचे आकर्षक क्षेत्र कागदातच निर्माण करावे असा त्यांचा चित्रनिर्मितीचा प्रवास असे.''

(अबोल, उत्स्फूर्त चित्रप्रवास, दृक्-चिंतन/१६७)

''त्या रंगछटांना कागदावर पसरवत आशयाला अस्तित्वाशी बांधून नेत्रदीपक अवकाशाचे आकर्षक क्षेत्र कागदातच निर्माण करावे.'' खरे पाहता ही सारी चित्रनिर्मितीची क्रिया आहे आणि त्याच वेळी चित्रकाराने साधलेल्या परिणामाचे ते वर्णन आहे. एखाद्या नाटककाराने कंसात दिलेली एखादी सूक्ष्म रंगसूचना नाटकात जे कार्य साधते, त्या स्वरूपाचे कार्य हे वर्णन साधते, ज्यामुळे प्रेक्षकांना चित्रकाराच्या अभिव्यक्तीच्या निकट पोहचता येते.

चित्रात आपल्याला परिचित आकार शोधून, त्यातून शाब्दिक अर्थ काढून चित्रातून आनंद मिळवणाऱ्या आणि तसे नाही जमले तर त्याकडे पाठ फिरवणाऱ्या, चित्रकलेचे शिक्षण न घेतलेल्या सामान्य रसिक प्रेक्षकांसाठी सर महत्त्वाची 'चित्रसूत्रे' सोपी करून सांगतात. ''शब्दांना अर्थ असतो तसा रंगांना अर्थ नव्हे तर अंग असते आणि तेच न्याहाळायचे असते.''

किंवा ''चित्रकलेचा प्रांत असेल तर, बघत बघत, निरखत निरखत, डोळ्यांनी विचार करत करत चित्रकाराच्या कल्पना विश्वात पोहचायचे असते.'' पाहू

शकणाऱ्यांनी डोळसपणे विचार करावा आणि न्याहाळायला शिकावे यासाठी सरांनी 'चित्रांसाठी' केलेली ही अक्षरांची अटाअटी म्हणजे आपले (गैर)समज तपासून घेऊन ते प्रगल्भ जाणिवेत रूपांतरित करण्याची एक नामी संधी आहे. ''अभिजात कलेत 'असणे' जितके महत्त्वाचे तितकेच नियोजित कलेत 'दिसणे' महत्त्वाचे असते.'' असे चित्र समजून घेण्यासाठीचे अनेक कायदे कोलते सरांनी जागोजागी दिले आहेत.

एखाद्या दृक् अनुभवाचे ग्रहण करून, त्यातून उमगलेल्या अमूर्त चित्रविचाराचे सार अथवा मर्म आधी जाणून घेऊन, नंतर शब्दात उलगडून दाखवताना त्या चित्रकाराच्या अनुभवाशी तादात्म्य पावल्याची अनुभूती सर आपल्याला देऊ शकतात. चित्रातील अमूर्तता कशी अनुभवायची ते कोलते सर शब्दांतून उलगडून सांगतात. कृष्णा रेड्डी यांचे 'जेली फिश' हे मुद्राचित्र (Intaglio) वाचकांनी समोर ठेवून त्याविषयीचे सरांनी केलेले भाष्य वाचावे.

'''जेली फिश' ह्या चित्रात रेषांचे एक-दुसऱ्याला भिडणारे, छेदणारे, ओलांडणारे, थांबून परतणारे किंवा दूर जात अदृश्य होत जाणारे विलोभनीय विलास पाहताना, आपण नकळतपणे ठहराव आणि गती यांच्या कंपनात स्वतःला गुंतवून घेऊ अशी दाट शक्यता आहे. स्फोटक वाटणाऱ्या एकूणच कृतीचे कण अन् कण डोळ्यांनी टिपत आपण आभाळातून आभाळातच पडत राहू. असे पडत असताना पडण्याचा अनुभव नाही, चालण्याचा प्रयास नाही, उचलण्याचा यत्न नाही, दिशांचे भान नाही आणि आपल्या अस्तित्वालाही सीमा नाही अशा एकमेव तारांगणात मुक्तपणे तरंगत राहू. त्या तरंगण्यात इच्छेला, आशेला, रागाला आणि द्वेषाला कणाएवढीही जागा नसेल. असेल केवळ तृप्तीतील अतृप्ती आणि आपल्याजवळचे आपलेपण.''

(कृष्णा रेड्डी - दृक्-चिंतन/१५७)

एकाच वेळी स्वतःला भिडून जागरूकपणे स्वतःच्या चित्राविषयी विचार करण्याची व स्वतःपासून लांब जाऊन अलिप्तपणे पाहू शकण्याची ताकद सरांमध्ये आहे, तसेच सतर्कपणे इतर चित्रकारांच्या चित्राविषयी चिंतनात्मक विधाने करण्याची व वाचकाला अंतर्दृष्टी देण्याची क्षमताही त्यांच्यामध्ये आहे. म्हणूनच ''रिक्त असणे म्हणजे कोणत्याही क्षणी काहीही करण्याचे सकल संपूर्ण भान असणे.'' किंवा ''चुकलो अधिक आणि कळले फार थोडे. आशा आहे की चुकलेल्या वाटेलाच ज्ञानाचा फाटा फुटेल.'' असे अनेक दृष्टांत सरांमधील सर्जनशील चित्रकार, सजग शिक्षक आणि सुजाण लेखक एकाच वेळी कार्यमग्न असण्याचा पुरावाच आहे.

अल्पावधीत प्रसिद्ध होण्यासाठी नैतिकता-मूल्य-निष्ठा-संवेदनशीलता यांना सहजरीत्या खुंटीला टांगून, वेळ पडेल तेव्हा मुखवटा चढवून 'अहो रूपं अहो ध्वनी' म्हणत नैसर्गिक कृत्रिमपणे तोंड फाटेस्तोवर बेमालूमपणे एकमेकांचे कौतुक करत कळपाने जगण्याच्या या भवतालात प्रभाकर कोलते कुठल्याही कळपात नाहीत; कधीच नव्हते. म्हणूनच आत्मीयता असणाऱ्या अभिजात चित्रकारांच्या चित्रांवर ते परखडपणे कारणमीमांसेसह टीका करतात. ही मीमांसा ते चित्रातील घटकांच्या आधारे, वस्तुनिष्ठपणे, रोखठोक भाषेत करतात. प्रसंगी दोन टोकांचे पिंड असणाऱ्या चित्रकारांच्या जीवन-संवेदनांचा तौलनिक अभ्यास करून 'हुसेन आणि गायतोंडे : दोन ध्रुव' ह्या लेखात त्यांचे म्हणणे ते स्पष्टही करतात.

''हुसेन यांच्या चित्रांमुळे पेंटिंग करणाऱ्या चित्रकाराने शब्दचित्रे (illustration) करणे आणि शब्दचित्रे करणाऱ्याने पेंटिंग करणे यातला भेद स्पष्ट झाला. परंतु त्याच वेळी शब्दचित्रे करणाऱ्या पोटभरू चित्रकारांना ते स्वतः अभिजात चित्रकार असल्याचे चुकीचे संकेतही मिळाले.''

(हुसेन आणि गायतोंडे दोन ध्रुव, दृक् - चिंतन/१०७)

१९६८- ६९ या काळात कोलते सरांनी महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रासाठी चित्रकला समीक्षक या नात्याने झालेल्या प्रदर्शनांचे वृत्तलेखन केले होते. त्यातील 'हुसेन यांच्या चित्रांचे प्रदर्शन; मोहक तशीच विकृत चित्रे' व 'आरांची वस्तुचित्रे; जुना जोम ओसरला?' हे मथळे जरी पहिले तरी सरांची वस्तुनिष्ठ टीका आणि त्यांच्यातील निर्भीड वृत्तीच निदर्शनास येते. केवळ दीड कॉलम जागा व्यापलेल्या या वृत्तातदेखील हुसेन यांच्या चित्रातील मोहकता आणि सरांना जाणवणारी विकृतता सर

अनुक्रमणिका

चित्रांच्या आधारे विशद करतात. तसेच आरांच्या चित्रातील रेषेचे बहुगुणी सामर्थ्य कमी होत असल्याची खंत त्याच्या परिणामांची तमा न बाळगता ते स्पष्टपणे मांडतात.

कोलते सरांची भाषा काव्यात्म, अलंकृत, दृश्यात्मक (वाचकाच्या दृक्-संवेदना जागृत करणारी) आणि थेट आहे.

निष्ठा डगमगली की व्यासंगाचा व्यवसाय व्हायला वेळ लागत नाही आणि एकदा व्यवसायात अडकलात की व्यासंग तुमच्याकडे पाठ फिरवतो, अशा छोट्या छोट्या अर्थपूर्ण वाक्यातून सर कधी चित्रकाराविषयी, कधी त्याच्या चित्राविषयी, तर कधी चित्रतत्त्वाविषयी नेमकी निरीक्षणे नोंदवितात. कमीत कमी शब्दांत अधिक आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य सरांच्या भाषेतच रुजलेले असावे. वासुदेव गायतोंडे यांच्याविषयी सर लिहितात,

''ते एकटे होते, पण एकाकी नव्हते. चार भिंतींच्या आतले त्यांचे जग मोजता येईल इतके लहान होते; परंतु त्यात साकारणाऱ्या कॅनव्हासवरल्या आणि त्यांच्या अवतीभवतीच्या वस्तू-अवस्तूंनी व्यापलेल्या जागा 'अनंतीय' होत चालल्या होत्या.''

(हुसेन आणि गायतोंडे : दोन ध्रुव, दृक्-चिंतन पृ.१०८)

'अनंत' ह्या शब्दाचे 'अनंतीय' असे रूप निर्माण करून कोलते सर गायतोंडे यांच्या चित्रावकाशातील त्या अमर्याद अगोचर अनंततेला (infinity) अधोरेखित करतात. याच लेखात ते हुसेनविषयी म्हणतात,

''स्वच्छंदीपणे जगत असताना ते हळूहळू सार्वजनिक होत गेले.''

(हुसेन आणि गायतोंडे दोन ध्रुव, दृक्-चिंतन/१०८)

स्वच्छंदीपणे जगण्याला सार्वजनिक होण्याचा शाप असतो हे सत्य कोलते सर सांगतात.

चित्राविषयी केलेल्या विवेचनात सर पारिभाषिक संज्ञा मोजतात. भौमितिक रचना, आरेखन, ठळक रेखांकन, परस्पर विरोधी रंगछटा या सर्व चित्रघटकांच्या अपरिहार्य योजनेतून पॉल क्ले या चित्रकाराने 'सेनेशिओ' या चित्रात काय साधले आहे, याकडे सर आपले लक्ष वेधतात. त्यांचे काव्यात्म लिखाण त्यातील परिचित शब्दांच्या अर्थामुळे सहजच कळले असे वाटते आणि ते प्रथमदर्शनी तसे सोपेच वाटते; परंतु त्या एका छोट्या वाक्यात चित्रकलेतील मूलतत्त्वाचा साक्षात्कार होण्याच्या असंख्य शक्यता दडलेल्या असतात, ज्या पुन्हा पुन्हा वेगळेपणाने सामोऱ्या येत राहतात.

रोथकोच्या चित्राविषयी लिहिताना सर ''शब्दांशिवायच्या रसनिष्पत्तीची संयमाने वाट पाहणे हेच रोथकोच्या चित्रांचे स्वागत करणे ठरते.'' हे लिहितात तेव्हा चित्र कसे पाहायचे असते याचा एक वस्तुपाठच ते आपल्यासमोर ठेवतात.

सरांच्या लेखनात वाचकाला एकाच वेळी काव्यात्मकता आणि वैचारिकता याचा एकात्म प्रत्यय येतो. चित्रदर्शी, प्रतिमांकित आणि विविध संवेदना सूचक असा ललितबंधाच्या भाषेचा पोत हे सरांच्या लेखनाचे अजून एक ठळक वैशिष्ट्य आहे.

''घर असो की शाळा, मन नेहमी बाहेरच धावायचे. खिडक्यादारे त्या मनालाच येण्या-जाण्यासाठी केल्या असाव्यात असा आपला माझा समज... शाळा म्हणजे घंटा ठेवायची राखीव जागा वाटू लागली.''

(मागे वळून शाळा आठवताना, कलेपासून कलेकडे/१३५)

चित्रातील दृश्यात्म विचार समजावून देताना, वाचकांच्या दृक्-जाणिवा धारदार आणि साहित्य नजर तीक्ष्ण व्हावी या हेतूने कोलते लक्षणीय दृश्यरूपात्मक प्रतिमा मोजतात. चित्राचे गुणविशेष समजावून सांगताना सर दृश्यानुभवाचाच आधार घेतात.

''त्याच्या अधिकांश व्यक्तिचित्रणातील डोळे, त्यातल्या बुबुळांविना नग्नच वाटतात. जणू चंद्रबिंबाविना रिक्त अवकाशाचे तुकडेच.''

(एक विलक्षण झंझावात, दृक्-चिंतन/२१७)

'बुबुळांविना रेखाटलेले डोळे दृष्टिहीन माणसासारखे दिसतात किंवा भावविरहित वाटतात' असे निवेदनात्मक न लिहिता 'ते नग्न वाटतात' असे कोलते सर दृश्यात्मक लिहितात. पुढे 'जणू चंद्रबिंबाविना रिक्त अवकाशाचे तुकडेच' अशी एक चपखल प्रतिमा ते पुन्हा वाचकाच्या अनुभवविश्वातून सहज त्याच्या मनाच्या पृष्ठभागावर आणून ठेवतात. सरांनी वर्णिलेले चंद्राविना असलेले रिक्त काळेशार अवकाश आपल्या मनःचक्षूवर

तरळते ते सरांनी योजलेल्या प्रतिमेमुळेच! या प्रतिमेद्वारे मॉदिलियानीच्या चित्रातील सरांना भावलेले काव्य आपल्याला उमगते त्या डोळ्यातील 'गूढ परंतु सुजाण अंधारासकट.'

कोलते सर अनेकदा नवीन शब्द जन्माला घालतात. गुणावत, डोळोसा, मातीचा लिपचिपता ध्वनी, रंगराशी, रंगकामाठी यांसारखे किती तरी आशयघन, नादयुक्त आणि अगोचराला भिडून गोचर करणारे शब्द सहजपणे निर्माण करतात.

अनेकदा ते एखाद्या शब्दसंहितेचे सहजपणे भाववाचक नामात रूपांतर करतात. उदा.- 'पाणीयता'. सरांनी अशी नवीन शब्दांची रूपे निर्मिली आहेत. ती आशय चपखलपणे अभिव्यक्त करण्यासाठी अत्यावश्यक आहेत म्हणून. त्यात कुठलाही अभिनिवेश नाही.

अनेकदा नेहमीच्या वापरात असलेल्या, आपल्याला माहीत असलेल्या शब्दाचे एक वेगळेच रूप 'निर्माणून' नेमक्या जागी वापरून सर अभिप्रेत अर्थाच्या निकट पोहचतात. शब्द केवळ माध्यम उरते. शब्दाचा सोस राहात नाही.

''निद्रिस्त रंगांना कुंचल्याच्या हळुवार स्पर्शांनी तर कधी बेधुंद फटकाऱ्यांनी कॅनव्हासवर जागं करत मी चित्रांत जागा होत आलो''... असे कोलते सहजपणे लिहून जातात तेव्हा जागा 'मा' शब्दाचे जागृती, अवकाश आणि स्थान असे तीन प्रच्छन्न अर्थ आपल्या मनात खूप नंतर कधी तरी उमटतात आणि मग सरांनी सजगतेने चित्रावकाशातली कमावलेली 'जागा' आपल्याला दिसते. आधी मर्म अथवा सत्त्व जाणणे, ते पाहणे, ते समजणे मग ते उलगडून दाखवणे आणि ते दाखवण्यासाठी शब्दांचा आधार घेणे असा सहज प्रवास कोलते आपल्याला घडवतात.

''भाषेला उगवत्या आकारासोबत आणि स्थिरावलेल्या पाण्याच्या आधाराने', 'पोहता पोहता पोहणेच होणे', 'गर्भवती रेषेच्या प्रसूतिकळा', 'झाडाला संगोपणारा', 'स्वरमधूळ वातावरण', 'सरणधर्मी एकांतवास', दृश्य-कोश'- 'दृश्य-कोष', 'खिडकीच्या गजांना पारदर्शक करीत' यांसारख्या शब्दरचना वाचकाला तरल काव्यानुभव देतात.

म्युंतरच्या प्रेमभंगाबाबत लिहिताना कोलते सर 'उपडी केली' हे क्रियापद वापरून त्यांची मोहर उमटवतात. 'आपले मन दैनंदिनीच्या पानांवर मोकळे केले' असे क्रियापद इतर कुणीही सर्रास वापरले असते. 'उपडे' करण्यात जे जाणवते ते 'मोकळे' करण्यात नाही. 'उपडे' केल्यावर तळाशी साठलेले सारे काही एका क्षणात बाहेर सांडते... आणि खऱ्या अर्थाने मोकळे वाटते. शाईची दौत किंवा रंगाची बाटली उपडी करण्याचा अनुभव कोलते सरांना कायमचाच आहे. त्यांच्या दैनंदिन जगण्यातल्या अनुभूतीचे हे असे प्रकटन हे त्यांच्या लिखाणाचे एक प्राक्तन आहे.

सरांनी योजलेल्या-विश्वसनीय आरेखन, ओघवते रंगलेपन, ठोस रेखांकन, लयबद्ध रेषांची परस्परपूरक आवर्तने, रंगाची पारदर्शकता, लगडत येणाऱ्या मृदु रेषा, त्रोटक रेषा, कंपन क्रिया - यासारख्या किती तरी पारिभाषिक संज्ञा विशेषणांसह येतात. त्या विशेषणांमुळे आपले लक्ष चित्रातील रूपाकडे वेधून घेऊन चित्राचे रूप शब्दांद्वारा विवरण करण्याचा सरांचा हेतू साध्य होतो.

सर अनेकदा विरुद्ध अर्थाचे शब्द नेमके परिणामकारक ठरतील असे योजतात. उदा. ''परिस्थितीने तो कंगाल होत होता; परंतु चित्र-साधनेच्या विश्वात अजोड श्रीमंतीत लोळत होता.''

कधी परिचित वाक्प्रचार वापरून कोलते सर वेगळेच परिदर्शन घडवतात. उदा. 'अरे' म्हणणाऱ्या समाजाला 'का रे' म्हणण्याची त्यांची संस्कृती नसल्यामुळे त्यांनी 'बरे' म्हटले आणि वेगळी वाट चोखाळत ते दूर निघून गेले.

क्वचित शब्दांचा gimmicky वापर करून स्वतःतील भाषिक चातुर्य अनेक विशेषणे योजून उगाचच आजमावण्याचा मोह अनेक लेखकांप्रमाणे कोलते सरांना झाला असल्याचे प्रत्ययास येते. अद्भुत कल्पना रंगवणाऱ्या दालीविषयी प्रत्यक्षाला प्रतिमेत इतक्या चपखलपणे प्रस्थापित करणारा अकल्पिताच स्वामी दाली हा एकमेवाद्वितीय जगावेगळा चित्रकार होता अशी 'प्र'ची पुनरुक्ती असणारी शब्दरचना सर वापरतात किंवा चित्रकारांबद्दल वाटणारी आत्मीयता उत्कट व्यक्तिपूजकाने केलेल्या अतिशयोक्त विधानातून अभिव्यक्त होते.

''पिकासो हे नाव जगत्स्मृतीवरच नव्हे तर चक्क

काळाच्या कपाळावर इतके खोलवर लिहिले गेले आहे की यदाकदाचित भविष्यात ते पुसले जाण्याची शक्यता निर्माण झालीच तर काळ स्वत:च ते पुसू देणार नाही!.. काळानेच पिकासो होऊन मानवी संस्कृतीत नवचैतन्य निर्माण करण्यासाठी सृजनात्मक पावले उचलली होती... असणार!''

(दृश्यकलेतला मिडास राजा, दृक्-चिंतन/२४४)

अर्थात याकडे दुर्लक्ष करून बाकी इतर मूलभूत, सकस लेखनाचे गंभीर आणि सखोल परिणाम वाचकावर होतात आणि त्याची दृक्-संवेदना अधिक सजग करण्यात सर सफल होतात असे म्हणता येते.

आकर्षक आणि चपखल नामकरण हा सरांच्या लेखनाचा अजून एक गुणविशेष. 'एक अनाघ्रात बेट', 'विशुद्ध कलेचा स्वामी', 'चित्रकलेतील ध्यासपर्व', 'अकल्पिताचा स्वामी', 'आकाशाला आधार देणारा शिल्पात्मा' अशी चित्रकारांवर लिहिलेल्या लेखांची काही शीर्षके जरी पहिली तरी लक्षात येते की त्या-त्या चित्रकाराच्या चित्राचे मर्म, त्याची जातकुळी (निःशब्द शांतता रंगवणारा', 'चित्रांतून स्वप्नांना भिडणारा चित्रकार', 'एका अभिजात श्वासाचा प्रवास') त्याचे चित्रकलाविश्वातील स्थान किंवा योगदानच ('दृश्यकलेतला मिडास राजा', 'क्युबिझमचा जहागीरदार') या शीर्षकांमधून सरांनी सहजपणे अधोरेखित केले आहे. वाचकाची उत्सुकता शीर्षकापासूनच वाढीस लागते ती सरांच्या या मनोवेधक आणि काव्यात्म शीर्षकांमुळेच! लयबद्ध, मिताक्षरी, नादनिर्मिती करणारी शब्दयोजना हे या शीर्षकांचे भाषिक वैशिष्ट्य आहे.

''माझ्यासाठी चित्रनिर्मिती, लेखन आणि शिकविणे या 'एकाच नाण्याच्या तीन' बाजू आहेत. चित्रनिर्मिती ही पहिली अत्यंत महत्त्वाची बाजू, लेखन-वाचन ही दुसरी, तर शिकविणे ही नाण्याची कडा म्हणजे तिसरी बाजू. ही तिसरी बाजू गुळगुळीत होणार नाही याची काळजी, लेखन-वाचन आणि चित्रनिर्मिती सातत्याने करूनच घेता येते हे मला ही तीनही कार्ये नित्यनेमाने केल्यामुळेच कळले.''

(चित्रनिर्मितीचा वसा, दृक्-चिंतन/२९५)









कोलते सरांच्या जगण्याची चित्राशी घट्ट जोडलेली नाळ हीच त्यांच्या जिवंतपणाचे, प्रगल्भतेचे आणि त्यांच्या अस्तित्वाचे मूर्त रूप सिद्ध करते. अनंत अवकाशांतील अलख, अगोचर, अमूर्त असे काही रेषा, आकार, रंग, पोत आणि अनेक सूक्ष्म घटकांच्या आधारे दृग्गोचर करण्याची उत्कट तहान कोलते सरांना लागली. ही तहान भागवण्यासाठी मृगजळामागे धावण्याचे व्यर्थ परिश्रम न करण्याचा डोळस निर्णय वेळीच घेतल्यामुळे कोलते सरांना आपला 'निसर्गदत्त घाट' अथक साधनेच्या बळावर सापडला. चित्रकलेच्या विश्वातील जमिनीची सकसता टिकून राहावी म्हणून चित्रकार कोलते प्रामाणिकपणे 'शिक्षकी'वृत्तीने 'अक्षरांचे श्रम' करत राहिले... अमूर्त अवकाशातील शब्दबिंब होऊन !

• • •

(भ्रमणभाष : ९४२३२१४४३६
इ-मेल : archanadixitapte@gmail.com)

अनुक्रमणिका

रेखाटने : प्रभाकर कोलते


सोने त्यांच्या देहाचे

द गोल्ड ऑफ देअर बॉडीज : चार्ल्स गोऱ्हाम

अनुवाद : प्रभाकर कोलते

मनोगत : प्रभाकर कोलते

१९७२ साली सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले. पहिल्याच आठवड्यात प्रा. गजानन भागवत यांनी 'The Gold of Their Bodies' ही Charls Gorhyam यांनी फ्रेंच भाषेतून इंग्रजीत भाषांतरित केलेली कादंबरी मला वाचायला दिली. पॉल गोग्यां हा ऐश्वर्यी जीवनशैलीचा त्याग करून अत्यंत खडतर, वादळी आयुष्य जगलेला चित्रकार. त्याची चित्रे ओळखीची होती; परंतु जीवनपट माहीत नव्हता. तो चार्ल्स गोऱ्हाम यांनी आपल्या सहज ओघवत्या शब्दसृष्टीतून केवळ डोळ्यांसमोरच नव्हे तर माझ्या जीवनासमोर उभा केला. आपणही गोग्यांसारखेच जगावे असे प्रकर्षाने जाणवत राहिले. मी अंतर्बाह्य झपाटला गेलो; परंतु मी त्याच्यासारखा जगू शकलो नाही. कालांतराने मला माझ्याचसारखे जगायला हवे हेही तितक्याच प्रकर्षाने जाणवले आणि गोग्यांचे भूत मानेवरून उतरले; परंतु मनातून त्याच्याविषयीचे ममत्व मर्मबंध होऊन कायम प्रेरित करीत राहिले.



कादंबरी वाचून संपवताच ती मराठीत भाषांतरित करण्याचा मनोदय मी स्वतःपाशीच व्यक्त केला. परंतु तो प्रत्यक्ष कृतीत उतरू शकलो ते जे.जे.मधून स्वेच्छानिवृत्ती पत्करल्यानंतर जवळ जवळ आठ वर्षांनी आणि कादंबरीवाचनानंतर तब्बल तीस वर्षांनी भाषांतराचे काम करीत असताना मनोमन गोग्यां होण्याचा आनंदही उपभोगला. अर्थात हे सर्व श्रेय चार्ल्स गोऱ्हामचं, त्याच्या भावसमृद्ध भाषेचं, त्याचं गोग्यांच्या भूमिकेशी एकजीव होण्याचं.

त्यानंतर आठ वर्षे उलटली आणि एका संध्याकाळी कथा-लेखिका प्रा. कमल देसाई यांच्यासोबतच्या गप्पांमध्ये पॉल गोग्यांचा विषय निघाला. तो त्यांचा आवडता चित्रकार आणि त्यांनी गोऱ्हामची 'द गोल्ड ऑफ देअर बॉडीज' वाचली असल्याचे मला सांगितले. तेव्हा मीही तिचे भाषांतर केले असल्याचे त्यांना सांगितले. त्यांनी ते वाचण्यासाठी आवर्जून मागून घेतले. देताना मी म्हटले की, 'भाषांतर आवडले तर तुम्ही प्रस्तावना लिहावी.' स्पष्टवक्त्या कमलताई म्हणाल्या, 'आवडली तरच लिहीन बरं.' त्यांची प्रस्तावना माझ्या ह्या पुस्तकाला लाभली ही त्यांच्यासारख्या सिद्धहस्त लेखिकेने माझ्या पाठीवर दिलेली प्रेम, ऊर्जा आणि प्रशंसा यांनी मारलेली शाबासकीची थाप आहे असे मी मानतो.

कमलताईंनी तोंडी सांगितलेली प्रस्तावना शब्दबद्ध करण्याचे काम करणाऱ्या शर्मिला फडके यांच्यापासून ते मौज प्रकाशनात माझ्या भाषांतराला पुस्तकाचे रूप देण्याचे संस्कार करणाऱ्या भागवतांपर्यंत अनेकांच्या सहकार्याचे हात ह्या कृतीला लागले त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो आणि 'सोने त्यांच्या देहाचे' वाचकांच्या पारखी नजरेसमोर ठेवतो.

• • •

(प्रभाकर कोलते यांच्याकडून प्राप्त झालेला प्रस्तुत अनुवाद मौज प्रकाशन गृह यांच्यातर्फे प्रकाशनार्थ प्रस्तावित आहे.)

चित्रकार प्रभाकर कोलते विशेष

अनुवाद

सोने त्यांच्या देहाचे

द गोल्ड ऑफ देअर बॉडीज : चार्ल्स गोऱ्हाम

अनुवाद : प्रभाकर कोलते

प्रस्तावना : कमल देसाई

'द गोल्ड ऑफ देअर बॉडीज' हे चार्ल्स गोऱ्हामचं गोग्यां या फ्रेंच चित्रकाराच्या जीवनावर लिहिलेलं पुस्तक मी अहमदाबादला असताना पहिल्यांदा वाचलं. माझं वय तेव्हा पंचवीस-सव्वीस असेल. पुस्तक त्याच सुमारास आलं होतं आणि लगेचच ते माझ्या हातात पडलं. आमच्या गुजरात कॉलेजची लायब्ररी अत्यंत सुरेख. पटेल म्हणून इंग्रजीचे आमचे एक प्राध्यापक होते. त्यांना लायब्ररीबद्दल खूप जवळीक होती. अगदी चोखंदळपणे ते पुस्तकं निवडून आणत. त्यांच्यामुळेच मला हे पुस्तक अगदी नवीन असूनही पटकन वाचायला मिळून गेलं. मला स्पष्टपणे आठवतंय की पुस्तक वाचल्यावर नव्हे, ते वाचत असतानाच मी प्रचंड भारावून गेले होते. गोग्यांचं मनस्वी आयुष्य, कलेसाठी कोणत्याही तडजोडी न करता जगलेलं आयुष्य, त्याचा प्रवास, ताहिती बेटावरचं राहणं हे सगळंच फार भारावून टाकणारं होतं. तरुण असताना हे पुस्तक वाचलं होत तेव्हा बघण्याची दृष्टीच मुळी वेगळी होती. तशी ती असतेच. परवा 'आउटसायडर' वाचलं. आता आवडलं नाही. वाटलं, अरेच्या! आता कामू आवडेनासा झाला की काय! पोटात खड्डा पाडून जाणाऱ्या काही अनुभूती वयानुसार आपल्याला येत जातात; पण तशा त्या येतात त्याच वेळी आता आपल्याला मर्मापर्यंत पोहचणं जमू लागलंय बरं का, असंही समजून जातं. ते सुखाचं असतं.



चार्ल्स गोऱ्हाम

आता इतक्या वर्षांनी प्रभाकर कोलतेंनी या पुस्तकाचा केलेला अनुवाद वाचण्याच्या आधी मी पुन्हा एकदा मूळ पुस्तक वाचून काढलं. इतकी वर्षं आता मधे लोटल्यावर पुन्हा हे पुस्तक वाचताना आणि पुस्तकाचा कोलतेंनी केलेला मराठी अनुवाद वाचताना मला काही विलक्षण अनुभूती आल्या, त्या नमूद करायलाच हव्यात अशा आहेत.

गोग्यांच्या आयुष्यावर लिहिलेलं हे पुस्तक पहिल्यांदा वाचलं त्या वेळी गोग्यांबद्दल मला फार थोडी माहिती होती. जी माहिती होती ती कोणत्या संदर्भात ते आता नीटसं आठवत नाही; पण त्याच्यावरचं हे पुस्तक वाचल्यावर मात्र या चित्रकाराची सगळी चित्रं बघायला हवीत, समजावून घ्यायला हवीत अशी एक आसच मनाला लागली. भारावून गेले होते मी. त्यातल्या गोग्यांच्या भव्य प्रतिमेमुळे.

आणि गंमत म्हणजे हेच पुस्तक जेव्हा मी दुसऱ्यांदा वाचले तेव्हा मला ते खूप क्रुएल वाटलं. त्या पुस्तकात कुठं गोग्यांच्या आयुष्याबद्दल जिव्हाळाच नाही असे वाटलं. पहिल्यांदा पुस्तक वाचताना मला जो भारावून टाकणारा अनुभव आला होता तसा दुसऱ्यांदा पुस्तक वाचताना आला नाही. कुठे तरी दूर गेलो आहोत या पुस्तकापासून असं वाटलं. हा अनुभव नाही म्हटलं तरी तसा खिन्न करणाराच. सतराव्या शतकात हा चित्रकार होऊन गेला. त्याच्या चित्रांची मोहिनी आजही ताजी, टवटवीत आहे. त्याच्या जगण्याबद्दलचा अचंबा अजूनही मनात आहे. त्याच्यावर लिहिलेलं आजही जाणून घ्यावंसं

वाटतं. अभिजाततेचे सारे निकष गोग्यांला लागू पडतात. गोग्यांमधल्या चित्रकाराचा हा भव्यपणा अजूनही मनात तसाच्या तसाच आहे. मग आता अचानक त्याच्यातली क्रुएल्टी का जाणवावी? ती तेव्हा का जाणवली नव्हती? मूळ इंग्रजी पुस्तकातला गोग्यां इतका क्रुएल का उतरला आहे यावर मग मी खूप विचार केला तेव्हा लक्षात आलं की, हा जो त्याचा स्वभाव मला नव्याने जाणवतोय तो मुळात त्याचा नाहीच आहे. लेखकाने स्वीकारलेल्या तटस्थतेच्या धोरणामुळे त्याच्यावर तो भाव थोपला गेलाय. गोग्यांच्या व्यक्तिमत्त्वात आलेली क्रुएल्टी लेखकाची आहे. चरित्रकाराने एक तटस्थ भाव ठेवून चरित्रनायकाचं आयुष्य चितारायला हवं, हे एका मर्यादेपर्यंत ठीकच असतं; पण या पुस्तकात त्याचा जरासा अतिरेक झाल्याची भावना मनात आली. मग मला प्रश्न पडला की, लेखकाने अलिप्ततावाद स्वीकारायलाच हवा का? त्यापेक्षा अलिप्त राहूनही एका पातळीवर गुंतणंही हवं. थोडंही गुंतणं नसेल तर कलावंताविषयी, त्याच्या जीवनाविषयी प्रेम कसं वाटणार तुम्हाला? गुंतणं असलं तरच शब्दांमध्ये जिव्हाळा उतरू शकतो. इंग्रजीत तसा प्रयत्न का नव्हता हे कळलं नाही या पुस्तकाच्या बाबतीत. पहिल्यांदा पुस्तक वाचलं तेव्हा मुळात गोग्यांच्या व्यक्तिमत्त्वानेच इतकी भारावलेली होते की त्यातल्या भाषेची क्रुएल्टी (निर्ममता) जाणवलीच नाही. आता जाणवली. आपण प्रौढ, प्रगल्भ होत जातो तसतशी आपली अभिरुचीही प्रौढ, प्रगल्भ होत जाते. आपल्याला शब्दांपलीकडचं काही सखोल जाणवायला लागतं. त्यामुळे हे झालं हे एक आणि दुसरं म्हणजे त्यानंतरच्या काळात मी गोग्यांला त्याच्या चित्रांमधून जाणून घ्यायचाही प्रयत्न केला होता. त्यातून जो गोग्यां मला दिसला तो पुस्तकातल्यापेक्षा नक्कीच जास्त सहृदय होता.

आयुष्य गोग्यांशी सहृदयतेनं नाही वागलं. गोग्यांनंही त्याच्या आयुष्यात आलेल्या व्यक्तींसोबत आयुष्यासोबत केलेला व्यवहार सहृदयतेचा नव्हता; पण गोग्यां खरंच इतका निर्मम होता का? भावनाविहीन होता का? नव्हता! जगण्याच्या धडपडीतून चित्रकार म्हणून कलेशी कोणतीही तडजोड मी करणार नाही या अट्टहासातून त्याच्यात आलेला तो आविर्भाव होता जो पुढे चरित्रकाराने त्याचा मूळ स्वभावच करून टाकला. गोग्यांच्या स्वभावात काठिण्य आहे. आयुष्याकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन हळवा नाही. स्वतःच्या मनाचं वर्तुळ भेदून जीवनाला भिडणं गोग्यांला जमलं नव्हतं. गोग्यां असा कोरडा आधीपासून नव्हता. तो कोरडेपणा त्याच्यात येत गेला. बायकोनं त्याच्या कलेच्या प्रवासात सहभागी व्हायचं नाकारलं तेव्हापासून. त्यानंतर इतरांच्या आलेल्या कटु अनुभवांनंतर ही शुष्क भावना त्याचा स्थायिभाव झाली. पण तरीही शेवटपर्यंत गोग्यांच्या हृदयात अगदी आतमध्ये जीवनाबद्दलच्या प्रेमाचा, सहृदयतेचा झरा झुळझुळत होता. आता दुसऱ्यांदा इंग्रजी पुस्तक वाचताना मला त्याच्या आतला हा ओलेपणा कुठे दिसला नाही. मला जाणवला तो गोग्यांचा निर्मम, कोरडा स्वभाव.

'द गोल्ड ऑफ देअर बॉडीज' हे पुस्तक पुन्हा वाचत असताना मनात उमटलेल्या या भावनांना गाठीशी धरून मग मी कोलतेंनी केलेला 'सोने त्यांच्या देहाचे' हा अनुवाद वाचला... आणि तेव्हा मला एक गोष्ट अत्यंत ठळकपणे जाणवून गेली ती म्हणजे मराठी अनुवादात गोग्यां अजिबातच निर्मम किंवा क्रुएल वाटत नाही. उलट एक कोवळेपणा, उबदारपणा त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वातून उमलून आलेला आहे; त्याचा मूळ पुस्तकात अभाव आहे. मला त्यामुळे फार सुख झालं. मला दिसलेला गोग्यां आणि कोलतेंना दिसलेला गोग्यां हा एकाच स्वभावाचा आहे हे जाणवल्यावर माझ्या मनाची तगमग कमी झाली.

कोलतेंनी अनुवाद करत असताना त्याच्या व्यक्तिमत्त्वातला आत लपलेला उबदारपणा जणू त्याच्या आत्म्याला हात घालून ओढून बाहेर काढला आहे असं मला वाटलं. गोग्यांमधली कुटुंबवत्सलता कोलतेंनी नेमकी पकडली आहे. गोग्यांच्या व्यक्तिमत्त्वातली कोवळीक त्यात जाणवते. कोलतेंचं स्वतःचं व्यक्तिमत्त्व कुटुंबवत्सलतेकडे झुकणारं आहे आणि त्यांच्या लेखणीतून ते आपोआप अनुवादात उतरलं. मूळ इंग्रजी पुस्तकामध्ये कुटुंबवत्सलतेमधून येणारा हा जिव्हाळा आणि उबदारपणा नाही. हा फरक मुळात संस्कृतीतल्या फरकामुळे अथवा भाषेमुळेही असावा का? मूळ पुस्तकातल्या इंग्रजी भाषेत क्रूरता, अलिप्तता, कोरडेपणा इतका की जीवाला निपटून काढून टाकणारा. मराठी भाषा

ही इतर कोणत्याही भाषांप्रमाणेच कधी उबदार, ओली तर कधी थंड, कोरडी वाटू शकते. तो नेमकी कशी वापरली यावर खूप काही अवलंबून असतं. कोलतेंनी पुस्तकाचा अनुवाद खूप आत्मीयतेनं केला आहे. कोलतेंमधल्या चित्रकाराला गोग्यांमधल्या चित्रकाराची सहवेदना अचूक भिडली असणार! त्यामुळेही हे झालं असावं.

इतका चांगला केलेला अनुवाद मला वाचायला मिळाला याबद्दल मग मला धन्यता वाटली. मी कोलतेंना हे सांगणार त्याआधीच ते म्हणाले की, 'तुम्ही या अनुवादाला प्रस्तावना लिहावी अशी माझी इच्छा आहे.' खरं तर ते असा कुणाला आग्रह करणाऱ्यांतले नाहीत; पण त्यांनी माझ्याजवळ तसा आग्रहच धरला. त्यामुळे मला तो माझा सन्मान वाटला. जरा कचरायला झालं. कारण पुस्तक एका थोर चित्रकारावर आहे. मी आयुष्यभर लेखिका म्हणून वावरले. मला चित्रकलेतलं काय कळतं? चित्रकला हा काही अधिक जाणून घ्यायचा विषय आहे हे मला उमगलं कोलतेमुळे. चित्रं मला आधीपासून आवडायची. 'कळायची' असं म्हणत नाही; पण आवडायची. चित्र खऱ्या अर्थाने आपल्याला नीट समजू शकतील असा आत्मविश्वास आधीच्या काळात नव्हता, आताही फारसा नाही; पण प्रयत्न चालू असतो चित्रांवरच्या प्रेमापोटी चित्रकलेतली माझी अपुरी समज प्रस्तावना लिहिताना उघडी पडणार. मला काय अधिकार आहे प्रस्तावना लिहायचा, असं वाटून गेलं.

पण मग आपण इतक्या वर्षांपूर्वी हे पुस्तक वाचून किती भारावून गेलो होतो ते मला आठवलं. त्या वेळी वाटलं होतं की, मराठीत कुणाला असं भव्यदिव्य अनुभव देणारं का लिहिता येत नाही? आता कोलतेंनी हा अनुवाद करून मराठी वाचकांवर उपकार केले आहेत. त्यामुळे इतका मोठा चित्रकार त्यांच्यापर्यंत पोहचू शकतोय; शिवाय हा अनुवाद इतका प्रचंड आकर्षक असा केलेला आहे. किती सांगू किती नको असं वाटावं, असा हा अनुवाद आहे.

मूळ लेखक चार्ल्स गोऱ्हामची ढब निर्लेप, भाषेच्या अंगाने अनेकदा निर्मम वाटणारी अशी अलिप्त, पण ती जिथे जिथे तशी झाली आहे त्या प्रत्येक ठिकाणी कोलतेंनी मराठी भाषेच्या लवचीकतेचं ऐश्वर्य, सामर्थ्य नव्यानं उलगडावं; मराठी भाषेचं प्रेम त्यामुळे नव्यानं जाणवावं इतकी मोठी कलात्मकता अनुवादात आणली. निदान मला तरी ती जाणवली. अनुवादात योग्य ठिकाणी, योग्य वेळी त्यांनी लेखन-जिव्हाळा आणला आहे. अलिप्तता सोडून ते गुंतले आहेत. जेव्हा हवी तेव्हा भाषा तटस्थ राहते. या सर्व गोष्टी कोलते सामर्थ्याने करतात. कोलतेंचं मराठी मृदु आणि स्वच्छ आहे. भाषेवर हुकमतही छान आहे. योग्य ठिकाणी योग्य शब्द वापरला आहे. कोलतेंमधून हे खूप सहज येतं. विनासायास येतं. म्हणजे कष्ट पडले असतीलच त्यांना, पण ते कुठे जाणवत नाहीत. भाषेशी झटापट चालतेय असं वाटत नाही.

इंग्रजी पुस्तकाचा मराठीत अनुवाद करणं ही वाटते तशी सोपी कला नाही. इंग्रजी भाषेची ढब वैशिष्ट्य मराठीत उतरवणं ही कठीण गोष्ट आहे. मूळ भाषेचा डौल, मर्मस्थळ दुसऱ्या भाषेत आणणं हे कलावंताचे काम, 'सरस' शब्दही कमी पडावा असा हा अनुवाद झाला आहे. मूळ पुस्तक कोणतं, अनुवाद कोणता हा प्रश्न पडावा इतकी एकरूपता यात साधली गेली आहे. मग त्यावर तर नक्कीच लिहायला हवंय आपल्याला, असं जाणवून गेलं अगदी आतून आपलं कर्तव्यच आहे ते असं वाटलं. पॉल गोग्यां या भव्य चित्रकाराच्या आयुष्यातल्या थरारक घटना ज्या पुस्तकातून आपल्याला समजल्या ज्या पुस्तकाने आपण इतके भारावून गेलो, त्या पुस्तकावर लिहायची संधी मिळते आहे तर तो गमावण्याचा करंटेपणा तरी मी का करावा?

गोग्यांचं आयुष्य सोपं नव्हतं. त्यानं चित्रकार म्हणून आयुष्य जगायला मुळात सुरुवात उशिरानेच केली. आपलं बँकर म्हणून यशस्वी, पैसा देणारं, सुस्थितीतलं आयुष्य लाथाडून पूर्ण वेळेचा चित्रकार होण्याचा घेतलेला निर्णय आणि तेही विकाऊ चित्रे न काढता स्वतःला पटेल तेच रंगवण्याचा त्याचा हट्ट यांपैकी काहीच त्याच्या प्रतिष्ठित कुटुंबातून आलेल्या बायकोला, मेत्ला, रुचलेलं नव्हतं. तिने त्याच्या पुढच्या आयुष्यातील झगडण्यात त्याची साथ द्यायची नाकारलं. आपल्या मुलांसकट ती माहेरी राहायला गेली. सुरुवातीला तडजोड म्हणून, बायकोवर प्रेम म्हणून, कुटुंबापासून दूर राहणं शक्य होणार नाही म्हणून गोग्यांही तिच्याबरोबर गेला पण तिथे तो गुदमरला, मग त्याने पॅरिसला पुन्हा परतायचा निर्णय घेतला.

प्रोव्हिन्शियलिझम (प्रांतीयवाद) आपल्याला वाटतं आपल्याकडेच आहे; पण तिकडेही खूप आहे. पुस्तकाच्या सुरुवातीला हे खूप जाणवतं. डेन्मार्कबद्दल त्याच्या मनात आकस आहे. गोग्यांला डेन्मार्क आवडत नाही. मेत्सुद्धा डॅनिशच असते. त्याच्या मनातल्या नंतरच्या काळातल्या पत्नीबद्दलच्या आकसाला कदाचित हे कारणीभूत ठरलं असावं का?

पॅरिसला परतताना तो आपल्या लाडक्या मुलाला हट्टाने सोबत घेऊन गेला आणि मग पराकोटीच्या दारिद्र्यात राहात असताना त्या मुलाला सुखात ठेवायचा त्याने केलेला जीवापाड प्रयत्न, ते जमत नसल्यामुळे त्याच्या मनाची होणारी तडफड. किती केविलवाणेपणा आहे ह्या सगळ्यात!

गोग्यांवर त्याच्या समकालिनांकडून आणि नंतरही अनैतिक चारित्र्याचा आरोप झाला. गोग्यांमध्ये पॅशन होती. कलाकारामध्ये ती असावीच लागते. पण आपण समजतो तसा गोग्यां पॅशनेटली बायकांवर झोकून देणारा नाही. त्यानं स्वतःच्या बायकोवर जेवढं प्रेम केलं तेवढं कुणावरच केलं नाही. गोग्यां बायकोच्या विरहानं व्याकूळ होतो. कोलतेंच्या अनुवादातून ही व्याकुळता जास्त ठळकपणे जाणवते.

पुस्तकात एक प्रसंग आहे. वयाने लहान असलेल्या एका वेश्येजवळ तो आहे. तिचा हात त्याच्या हातात आहे. गाढ झोपेत असताना 'मेत्, मेत्' अशी बायकोच्या नावाने तिला तो हाका मारत राहतो. या वेळी पहिल्यांदा वेश्येकडे तो गेला आहे. ते बायकोने धुत्कारल्याच्या चिडीतून. पण तो खरा नीतिमान होता असं वाटतं. कलेवर विशुद्ध प्रेम करणारे कलाकार नीतिमान असतातच; पण माणूस म्हणूनही गोग्यां नीतिमानच होता.

गोग्यां देहाकडे कसा बघतो हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे. नुसत्या देहाचं आत्माविरहित देहाचं आकर्षण त्याला नाही. वेश्येकडे जायला तो खूप उत्सुक नसतो. पत्नीचा राग आला की त्या भरात तो जातोही; पण हे सर्व त्या विशिष्ट रागातून तो करतो, जे आत्यंतिक प्रेमातून येते. बायको त्याला म्हणते, 'तू पैसे मिळवून आण आणि मगच माझ्या जवळ ये.' हे त्याला वेश्येपेक्षा घृणास्पद वाटतं. आणि आपल्यालाही वाटतं; कारण आपण गोग्यांच्या चित्रकार म्हणून जगण्याच्या धडपडीचा आदर करत असतो. गोग्यांचं कुटुंबवत्सल असणं, त्याचं मुलावर जीवापाड प्रेम करणं; अभावातही त्याला पोटभर खाणं, ऊब मिळवून देण्याचा सतत विचार करणं; त्याच्यासाठी पडेल ते काम करणं या सर्वांमधून गोग्यांच्या काळजातलं दडलेलं जे प्रेम आपल्याला जाणवतं ते कोलतेंच्या अनुवादामुळे. त्यांच्यातलं बापाचं नातं फार कोवळेपणाने येते. इंग्रजी पुस्तक वाचताना हे कुठे मनावर बिंबलंच नव्हतं. ते खूप कोरडं, शुष्क वाटलं. नात्यांमधला संबंध आणि त्यातून येणारं प्रेम, जिव्हाळा इंग्रजीमध्ये नीट उमटलेलाच नाही.

गोग्यांचं जीवनचरित्र वाचताना मेत्, त्याची बायको त्याच्याशी असं का वागली असा विचार येतो. का नाकारावं तिनं त्याला असं वाटलं. भारतीय स्त्री कशी वागली असती मेत्च्या जागी? बंगाली स्त्री मिळायला हवी होती त्याला सहचरी म्हणून. बंगाली स्त्रिया कलाकारांना जास्त समजून घेतात असं आपलं मला वाटतं. महाराष्ट्रीय स्त्री कदाचित मेत्सारखीच वागली असती.

मेत्नं गोग्यांमधल्या चित्रकाराला समजून घेतलं नाही. तिचं वागणं निर्दय वाटतं. हे झालं आपण जेव्हा चित्रकार गोग्यांच्या प्रेमातून तिच्याकडे पाहतो तेव्हा. एक स्त्री म्हणून मेत्ला समजून घेता येऊ शकतं. एकदा गोग्यां त्याच्या विक्रेत्याकडे येतो. 'एक तरी चित्र वीक रे, आजच मला एक मुलगा झाला आहे.' अशी विनवणी करतो. आता त्याला सात मुलं असतात. आजच्या कलाकाराच्या सुगीच्या काळातही सात मुलं पोसण्याच्या दृष्टीनं परवडणारी नाहीत. कसं पोसावं मेत्नं त्या काळी? गोग्यांनं झुगारून दिलं संसाराचं जूं. पण अशी जबाबदारी नाकारणं हे बरोबर आहे का? बायकोने एकटीने का स्वीकारावी संसाराची सगळी जबाबदारी? जे मेत्नं केलं तेच कुठल्याही स्वतंत्र बुद्धीच्या स्त्रीनं केलं असतं. तिला तिच्या कामाचे काही तुटपुंजे पैसे मिळत असतात, तेही ती डेन्मार्कला गेल्यावर मिळतात, त्यात घर चालवायचं हे तिला खूप कठीण गेलं. त्याच्यासारखा मनात येईल तेच खरं करणारा नवरा. त्यानं आपली चांगला पैसा देणारी करिअर सोडून मुळात चित्रकाराचा भिकारडा धंदा स्वीकारावाच का, हे तिला कळलं नाही. मेत् त्याला सोडून जाते. एकमेकांचा हात सोडून चुंबनही न घेता ते

अनुक्रमणिका

विलग होतात. तो प्रसंग करुण आहे. नवऱ्याचे आणि तिचे संबंध एकाच वेळी प्रेमाचे आणि तिरस्काराचे आहेत. त्या नात्याचे विभ्रम कोलते आपल्या अनुवादात सुंदरतेने पकडतात. कोलतेची मुळातली कुटुंबवत्सलता अनुवादात ठायी ठायी जाणवते. भाषेत सहजता, सुबोधपणा आहे. कृत्रिम अलंकारांची जोड नाही हे फार छान वाटतं वाचताना लेखन बोजड किंवा प्राध्यापकी थाटाचं नाही. भाषेचा ओघ, नेमकेपणाने शब्द वापरण्याची किमया हे मला खूप कौतुकाचं वाटलं. कोलतेंनी केलेला अनुवाद हा चित्रकलेच्या चित्रकाराच्या प्रेमापोटी केलेला आहे आणि अनुवादाचा तो एक प्लस पॉइंट आहे. प्रेमाचा एक झपाटा आहे या अनुवादात.

गोग्यांवर लिहिलेलं हे पुस्तक वाचलं तेव्हा कोलते झपाटले गेले. त्या झपाटलेपणात त्यांनी केलेलं हे भाषांतर आहे. त्यांना झपाटलेल्या अवस्थेत जो गोग्यां सापडला, त्यात त्याचा आत्मा सापडला. जणू ते गोग्यां झाले होते. लेखनाच्या पलीकडे जाऊन बघितलं की हे झपाटलेपण जाणवतं.

कोलतेंच्या लेखनातला सहजपणा हा त्या आत्म्याच्या गवसण्यातून आला आहे. त्यांच्या वागण्याबोलण्यातही मला तो प्रभाव जाणवतो. ते जणू बदलून गेले या पुस्तकानंतर. गोग्यांचं आकर्षण जबरदस्त. कोलतेंमध्ये उतरलेल्या गोग्यांचा अंश त्यांना झपाटून टाकायला पुरेसा होता. गोग्यां आणि कोलतेचं जे नातं आहे ते इथे दिसतं. जेव्हा एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तिमत्त्वाला आपल्यात रुजवून घेऊन नंतर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचाच एक भाग होऊन जाते, एक तिसरंच व्यक्तिमत्त्व त्यातून तयार होतं तेव्हा त्या रसायनात एक विलक्षण गोडवा उतरतो. कोलतेंच्या बाबतीत हा आविष्कार त्यांच्या लेखनातच काय, एरवीच्या वागण्याबोलण्यातही आविष्कृत झाला, यात मला नवल वाटत नाही.

गोग्यांमध्ये हे असं झपाटून टाकणारं वेड आहेच; त्याच्या सगळ्या व्यक्तिमत्त्वातच ते आहे. त्यामुळे भारावून जाणं हे घडतंच. आपल्याही बाबतीत घडतं. त्या वेळी आपणही गोग्यां होतो. आपल्यालाही त्याचा आत्मा गवसत जातो. आपण पुस्तक वाचतो, गोग्यांने झपाटले जातो; पण पुस्तक संपले की गोग्यां आपल्यातून उतरतो.

कलाकारांना गोग्यांच्या काळात दिवस चांगले नव्हते. खडतरपणा, हलाखी होती. एकही चित्र विकलं जायचं नाही. मेत्चं आणि त्याचं भांडण विकोपाला जायचं हेच कारण. कला सोडून संसारात रमणं त्याला जमलं नाही. एकेका दिवसात झपाटून जाऊन तो पंधरा चित्रं काढायचा. ती विकली जायची नाहीत. तळघरात धूळ खात पडायची. कोणी विचारत नाही. ज्या गुलाबी नग्नतेविषयी त्याला तिरस्कार, त्या चित्रांना खप होता. हे द्वंद्व काही त्याला सोडवता आलं नाही. मेत् सोडून गेली ही खंत मात्र त्याला कायम राहिली. मुलेही दुरावली. मेत्नं पद्धतशीरपणे त्याला दूर केलं. मुलांनी त्याला नाकारलं तेव्हा आपलं कौटुंबिक जीवन संपलं याची विदारक जाणीव त्याला होती. ताहितीला गेल्यावर मग मात्र तो पुन्हा कधी मेत्चं नाव काढत नाही.

आपण अशा अवस्थेत फक्त कला उराशी धरून, कलेकरिताच फक्त जगू शकलो असतो का? हा प्रश्न मी मला विचारला आणि त्याच्यासारखं कलेसाठी झोकून देणं जमणार नाही; अशा आयुष्याला आपण नसतो तोंड देऊ शकलो असं मला वाटलं. म्हटलं असतं, जाऊ दे ही कलाबिला!

चित्रकलेवर असं आयुष्य उधळता नाही येणार आपल्याला! कारण गोग्यांचा कणखरपणा आपल्यात नाही. लेचेपेचे आपण. पण कोलते करताहेत कलेवर तसंच प्रेम. तर त्यांनाही कलेवर असं प्रेम करणं नक्कीच शक्य आहे.

गोग्यांसोबत प्रवास करणारा लावेल एकदा म्हणाला त्याला खडतर दिवसांत की, 'मी काही हे सूप खाऊ शकणार नाही. ओकारीसारखं आहे.' गोग्यां म्हणाला, 'काही नाही होत, खा. दणकट होतो आपण.' कामाचा तो पूजक होता. हाताला घट्टे पडले तरी तो काम करत राहायचा. रस्ता खणण्याचं, खडी फोडण्याचं कामही तो करायचा. कामाचं आकर्षण होतं त्याला, श्रमात तो रमायचा. अतिशय खडतर जिणं. पैसे नसणं, कपडे नसणं, अन्न नसणं या दारिद्र्यातून जगत असताना कलेशी तो कधीही झगडला नाही. समाजाशी झगडला. शरण नाही गेला. दणकटपणाने वागला. खडतर जीवनाला तो शरण गेला नाही. 'काय ही परिस्थिती!' असे दीन उद्गार काढले नाहीत. त्याच्या स्वभावातही हा आडदांडपणा आहे. तो

कुणाचं काही ऐकणार नाही. आपल्या वागण्यानं कोण किती दुखावलं याचा विचार करणार नाही. रासवटपणा, मनमानीपणा त्याच्या व्यक्तिमत्त्वातच आहे. गोग्यांचं व्यक्तिमत्त्व प्रचंड प्रभावी, दणकट, पहिलवानासारखा दिसणारा गोग्यां.

गोग्यां कधीही शहरात रमला नाही. गावाबाहेर, आपल्याला आवडलेल्या खेडेगावात जाण्यासाठी तो सदैव तयार असे. त्यात त्याचं निसर्गप्रेम फार नाही. असलं तर तसा उल्लेख कुठे कादंबरीत फारसा आलेला नाही. त्याला सतत शोध होता मोकळेपणाचा. मुक्तपणाचा. सोबत कधी साथीदार असे किंवा नसे. बऱ्याचदा एकटाच फिरायचा तो.

सगळा शोध संपल्यावर अगदी शेवटी तो ताहिती बेटावर गेला. बायकोवरचं प्रेम विसरण्याचा निकराचा प्रयत्न त्यानं तिथं केला. त्यातून त्याचा काही वेश्यांशी संबंध आला. पुढच्या काळात तो आजारी होतो, त्याचा घोटा दुखावतो, हृदयाच्या तक्रारी सुरू होतात, त्याने तो तितका खचून जात नाही; पण त्याला जेव्हा कळतं त्याला सिफिलिस झाला आहे तेव्हा तो सैरभर होतो, खूप चकित होतो. असं कसं झालं आपल्या बाबतीत असं वाटतं त्याला; कारण मुळातला त्याचा स्वभाव नीतिमान, बायकोवर प्रेम करणारा, आपल्या हातून हे घडलं याची त्याला खंत वाटते.

ताहिती बेटावरही सगळ्या ताहिती स्त्रिया काही त्याला आवडत नाहीत, त्यांचा त्याला राग येतो. स्त्रियांबद्दलचा त्याचा दृष्टिकोन सहानुभूतिपूर्ण नाही. जी स्त्री त्याच्यासोबत राहात होती तिच्याशीही तो मृदूपणाने वागला नाही. रासवट, क्रौर्यतादर्शक वागणूक तो अनेकदा करतो, पण तरीही तो रोज सूर्य बुडायच्या आत घरी परततो. आपल्यासोबत राहणारी अजाण, निरागस मुलगी अंधाराला, भुताखेतांच्या कल्पनेला घाबरते याची जाणीव ठेवून तो अंधार व्हायच्या आत घरी येत असतो. ताहितीवर राहात असताना तो रानावनात रमायचा; तिथल्या स्थानिकांसोबत मिळून मिसळून राहायचा, त्यांच्यासारखाच वागायचा. तिथला पोशाख करायचा. उगीच आपण उच्च, गोरे आहोत तेव्हा फटकून वागायचं हे त्याच्यात कधीच नव्हतं. उलट चर्चचे लोक, गोरे पोलीस लोक स्थानिकांचा छळ करतात, त्यांच्या गरिबीचा, अज्ञानाचा, भाषा येत नसल्याचा गैरफायदा घेतात त्याविरुद्ध गोग्यां निर्भयपणे उभा ठाकतो. हे त्याच्यात होतं. त्याला इतर इंग्लिश, फ्रेंच काय म्हणतील याची पर्वा नाही. मुक्तपणे, निर्भयपणे अन्यायाविरुद्ध उभं राहायचं आकर्षण होतं. व्हिन्सेंटला त्रास देणाऱ्या, त्याला 'वेडा वेडा' चिडवणाऱ्या बारमधल्या लोकांविरुद्धही तो असाच उभा राहिलेला असतो.

फ्रेंच असण्याचा अभिमान असूनही त्याला अनेकदा आपली ती ओळख विसरावी असं वाटायचं. तो पॅरिसवर प्रेम करायचा पण त्याला उबग यायचा त्या शहराचा. काम आहे इथे? खोटेपणा, कृत्रिमपणा गुदमरायला होतं असं म्हणून मग तो खेड्यात फिरायला जायचा; पण पुन्हा परतावंसं वाटायचं. पॅरिसचा वास यायचा त्याला. अगदी शेवटीही त्याला पॅरिसमध्ये एकदा परतायचं होतं. ताहितीच्या उष्ण उबदार, प्रखर सूर्याच्या प्रकाशात असताना त्याला शेवटी बर्फाखाली बुडालेल्या फ्रान्समधल्या घरांची आठवण आली.

एकटं असण्याची त्याला भीती नव्हती. मी 'मी' आहे ना. मी चित्रकार आहे. माझ्याइतका मोठा चित्रकार फ्रान्समधे नाही असं तो म्हणायचा. ते खरंच होतं. नंतरच्या काळात गोग्यांचं वैशिष्ट्यपूर्ण स्थान कायम अबाधित राहिलं.

ताहिती बेट वादळानं उद्ध्वस्त झाल्यावर तो दुसऱ्या बेटावर जातो. त्याला प्रवास संपल्याची आतून जाणीव असते, तिथे तो फार जगत नाही. आजारी पडून मरून जातो. पण तो मनसोक्त चित्र रंगवतो; शेवटपर्यंत सगळा जीव एकवटून चित्र रंगवतो. जगण्यासाठीचा त्याचा झगडा शेवटपर्यंत चालूच असतो. पैशांचा अभाव, कष्ट या सगळ्यावरही मात करून जाते त्याच्यातली चित्र रंगवण्याची आसक्ती. तीच त्याच्या जगण्याचं कारण असते.

गोग्यांचं व्यक्तिमत्त्व काही वेगळंच होतं. कलावंत मृदु स्वभावाचे, संवेदनशील असतात या गृहीतकाला छेद दिल्यासारखा वागायचा तो. मनाच्या गाभ्यातून स्वतःच्या बायकोपोरांवर प्रेम करणाऱ्या गोग्यांला रानटी, रासवटपणाचं आकर्षण होतं. आपला सगळा आडदांडपणा, रासवटपणा, भलंदांडगं शरीर आणि आपल्यातलं कलावंतपण या साऱ्या अभिमानासकट तो

कायम जगला. सर्वांत महत्त्वाचा असतो तो अभिमान! एका कलाकाराला आयुष्यात बळ पुरवणारा, त्याला पुन्हा पुन्हा उभं राहायची ताकद देणारा अभिमान!

गोग्यां म्हणतो, मी चित्रकार आहे. चित्रकारच राहणार. दुसरं काही करणार नाही. मी चित्रकारांचा चित्रकार. माझ्यासारखी चित्रं दुसरं कोणीच काढू शकणार नाही याचा त्याला अभिमान. आयुष्यात त्याला असुरक्षितता वाटली, हेवा वाटला तो फक्त व्हिन्सेंट समोर असताना. मला याच्यासारखं चित्र काढता येणार नाही असं तो म्हणायचा. इतर सर्वांबद्दल त्याच्या मनात हेटाळणी असायची; पण व्हिन्सेंटचा त्याला हेवा वाटायचा. मात्र त्याचं त्याच्यावर प्रेम होतं. त्यात कोवळीकता होती. काळजी वाटायची त्याला त्याची. गोग्यांच्या नावाच्या उल्लेखानेही त्याच्या शब्दांत ती काळजी, कोवळीकता उमटायची. त्याच्या मनातलं हे प्रेम शेवटपर्यंत टिकलं. व्हिन्सेंट त्याच्यावर प्राणघातक हल्ला करतो तरीही तो त्याच्याबद्दल कटु बोलत नाही. त्याच्या मृत्यूच्या बातमीने तो मुळापासून हलून जातो. मात्र इथेही त्याच्या मनातल्या प्रेमाला द्वेषाची एक किनार असतेच. एकाच वेळी आत्मीयता, प्रेम, कौतुक आणि दुसरीकडे खूप रागही. हेवा, मत्सरही वाटायचा त्याला व्हिन्सेंटचा. आर्लसला असताना त्याला गोग्यांचा सहवास अनेकदा नको वाटायचा. गोग्यांच्या थोड्या वेडसरपणामुळे, फिट येण्यामुळे त्याला सांभाळून घेण्यासाठी जी कसोटी बघणारी प्रचंड मानसिक क्षमता लागते त्याचा ताण येत असणार त्याला.

मी पहिल्यांदा पुस्तक वाचलं तेव्हा गोग्यांच्या वागण्यात जे क्रौर्य जाणवलं, त्यात त्याचं व्हिन्सेंट व्हॅन गॉगबरोबरचं वागणंसुद्धा होतं. त्यानं गॉगशी चांगलं वर्तन नाही केलं ही माझी त्या वेळची प्रतिक्रिया. गोग्यांवर लिहिलेलं हे पुस्तक आणि व्हिन्सेंट व्हॅन गॉगवर लिहिलेलं 'लस्ट फॉर लाइफ' ही पुस्तकं मी एकदमच वाचली होती. आयर्व्हिंग स्टोननं गोग्यांवर आरोप केला होता की व्हॅन गॉगला नीट नाही वागवलं त्यानं. पण आता वाचताना विचार केला की, आपण कसे वागलो असतो? काही वेळा माणूस इरिटेट होतो. गॉग इरिटेट करणारा होता. कदाचित गोग्यां वागला तसंच आपणही वागलो असतो. गोग्यांसारखी आत्यंतिक कणखर मनोवृत्ती असणारा प्रतिक्रिया देत असतानाही काही वेळा कठोरपणाच्या प्रतिक्रिया देतो. तसा गोग्यां अनेकदा कठोर वागला. गोग्यां चक्रम स्वभावाचा होता. त्याचं व्यक्तिमत्त्व विक्षिप्त होतं. हा विक्षिप्तपणा त्याला नडला. लोकांनी फक्त तेच लक्षात ठेवलं. अनुवादामध्ये योग्य वेळी जिव्हाळा, गुंतवणूक आणल्याने, भाषेतल्या गोडव्यामुळे त्यांच्या संबंधाला उठाव मिळाला आहे असं मला जाणवलं. मूळ कादंबरीत गोग्यांवर 'तू व्हॅन गॉगला मारलंस' असा आरोप एका मित्राकडून तीव्रतेनं झाला आहे. अनुवादात या आरोपाला खतपाणी नाही. त्याला फारसं महत्त्व दिलेलं नाही हे मला योग्य वाटलं.

कादंबरीत गोग्यांचे जे समकालीन आहेत त्यांचे उल्लेख आणि संदर्भ फार महत्त्वाचे आहेत. गोग्यां आणि व्हिन्सेंट गॉगचे संबंध नेमके कसे होते; शुफे आणि गोग्यांचे संबंध कसे होते हे लक्षात घेऊन कादंबरी समजून घ्यायला हवी. अनुवाद वाचत असताना मला जाणवलं की, मूळ लेखक त्याच्या कादंबरीतल्या पात्रांशी कसा वागतो आणि कोलते कादंबरीतल्या पात्रांशी कसे वागतात यात एक मूलभूत फरक आहे. कोलते आणि गोग्यांचं एक नातं आहे. कोलते आणि वाचकांचं एक नातं आहे. वाचक आणि गोग्यांचंही एक नातं आहे. कादंबरीतल्या पात्रांचं एकमेकांशी एक नातं आहे. मेत्, कोलते आणि गोग्यांचंही एक नातं आहे. नात्यांचे हे तरल आणि गुंतागुंतीचे पदर, माणसाच्या वागणुकीचे स्तर मूळ पुस्तकातही आहेत; पण ते मला प्रकर्षाने जाणवले ते कोलतेंच्या अनुवादामुळे. मातृभाषा काही वेळा आत्मीयतेचं नातं जोडण्याकरिता जास्त मदतशील ठरते, ती ही अशी.

एक गोष्ट उत्कटतेने जाणवते ती म्हणजे गोग्यांला एक चित्रकार म्हणून देहाच्या सौंदर्याचं आत्यंतिक आकर्षण, कुतूहल होतं. काय आहे हा देह? त्याच्यात काय सौंदर्य साठवलं आहे ते समजून घेण्याचं कुतूहल चित्रकार म्हणून त्याला आयुष्यभर वाटलं. दुसऱ्या कोणा चित्रकारानं असं केलं नाही. इतक्या बारकाईने कातडीकडे पाहणं, कातडीला समजून घेणं हे मला खूप विलक्षण वाटलं.

पुस्तकात एक प्रसंग आहे. गोग्यां जेव्हा ताहिती बेटांवर राहात असतो तेव्हा त्याचा एक जवळचा स्थानिक

मित्र असतो. ते दोघेजण रोझवूडच्या जंगलात एकदा लाकडं गोळा करायला जातात. तेव्हा तो मित्र वर चढत असताना हा त्याच्याकडे बघत राहतो. त्याची डौलदार चाल, प्रमाणबद्ध देह पाहिल्यावर त्याला त्या देहाचं आकर्षण वाटतं. मोह वाटतो. देहाचं निखळ सौंदर्य त्याला भारावून टाकते. त्यात पॅशन आहे पण विकार नाही. आपल्याला वाचतानाही ती मोहिनी जागवावी असा तो संपूर्ण प्रसंग. गोग्यांला त्या दुसऱ्या पुरुषाचं काही क्षण आकर्षण वाटतं. जवळीकही वाटते; पण तरी तो त्या भावनेत वाहवत नाही. त्या भावनेत एक दूरत्व आहे. चित्रकारानं तटस्थतेनं आपल्या शारीरिक विकारांकडे कुतूहलानं पाहणं आहे. गोग्यांचं देहाच्या सौंदर्याचं आकर्षण, कुतूहल, त्यांचा त्या मोहाच्या क्षणातही कातडीच्या पलीकडे जाऊन बघण्याचा प्रयत्न हे सगळं एकदम आपल्या अंगावर येतं आणि आपल्याला समजतं की गोग्यांला देहसौंदर्याचं वैभव आपल्या कुंचल्यात, रंगांत कसं पकडता येईल आपल्या चित्रात ते कसं उतरवता येईल याचाच खरा ध्यास होता. आणि तोच सर्वांत वरचढ, प्रभावी होता, ताहिती बेटावर त्यानं नुसत्या स्त्रिया रंगवल्या नाहीत, पुरुषाचंही देहसौंदर्य त्यानं कॅनव्हासवर उतरवलं. तिथल्या अनोख्या उष्ण प्रकाशात कातडीचा मुलायमपणा, त्यावर चढलेली सोन्याची कांतिमान झळाळी त्याच्या कलावंत, रसिक नजरेने अचूक टिपली. त्या मोहात तो पडला. ताहितीकडे त्याची पावलं पुन्हा पुन्हा वळत राहिली ती या सोन्याच्या आकर्षणातून 'कातडीचं सौंदर्य वरवरचं नाही, ते केवळ ताहिती स्त्रियांकडेच नसतं. ते आपल्यातही आहे. ते आतून उमलून येतं. ते असं काही तरी ज्यामुळे आपण चकित होतो, आपलं कधी लक्ष गेलं नव्हतं आधी असं वाटून जातं. आपण जेव्हा आपल्याच देहाकडे बघतो तेव्हाही ते एका क्षणाला जागवून जातं आणि वाटतं, 'असतं बरं का असं त्वचेवर सोनं. ते उमलत जात असताना आपल्याला काही तरी सांगून जातं, बोलतं आपल्याशी आणि ते आपल्याला जाणवते.' माणसाला माणसाच्या कातडीबद्दल असं वाटणं हे गोग्यांला देहसौंदर्याच्या बाबतीत जे जाणवलं, त्या जातकुळीचं आहे.

गोग्यांनं ताहितीवरच्या स्त्रियांची नग्नता आपल्या कॅनव्हासवर उतरवली. तिथल्या आदिवासींच्या अर्धनग्नतेमुळे केवळ त्याला ते सहज शक्य होतं म्हणून त्यानं ते केलं नाही. नग्नता, कातडीचं सौंदर्य हे नुसतं त्वचेचं नाही, त्यात आतून काही तरी तेजस्वीपणा असतो. तो देहाला सौभाग्य देऊन जातो हे त्याला तिथे आल्यावर उमगलं. गोग्यां त्यालाच 'गोल्ड' म्हणतो. कातडीविषयीची गोग्यांची समज, त्यानं कातडीला सोनं म्हणणं हे खूप विलक्षण आहे.

ताहिती स्त्रियांपैकी एकीवर त्यानं प्रेम केलं. त्याच्यासोबत ती राहात होती. त्याची देखभाल, जेवण, शय्यासोबत ती करायची. तिचा समजूतदारपणा, तो चित्र काढत असताना तिचं अबोलपणे आसपास वावरणं त्याला मोलाचं वाटे. तिनं त्याच्या मुलाला जन्म दिला. त्याच्या परीनं त्यानं तिच्यावर प्रेम केलं. पैशांअभावी नाइलाजाने त्याला तिला सोडून पुन्हा पॅरिसला परतावं लागतं. पण तो पुन्हा परततो. हाच गोग्यां बायकांबद्दल बोलताना अनेकदा खूप क्रूरही होतो. खालच्या पातळीवर उतरतो, त्याच्यावर लिहिलेली दोन-तीन पुस्तकं मी वाचली आहेत. कोणत्या तरी एकामध्ये गोग्यांच्या तोंडी 'वुमन इज अ फिल्दी क्रिचर' असे उद्गार आहेत. मला त्या वेळी त्याचा खूप राग आला. असं का बोलला असेल हा बायकांबद्दल? मेंदूचा मनात खोलवर रुतलेला राग, पैशांअभावी तिनं त्याला पुन्हा पुन्हा धुत्कारणं त्याच्या मानी स्वभावाला, चित्रकार असण्याच्या अभिमानाला खूप दुखावून गेलेलं असणार. ताहिती स्त्रियांनी त्याला दिलेलं प्रेमही ती जखम भरून काढू शकलं नाही. कदाचित ते प्रेम हे कातडीपर्यंतचंच असू शकेल. चित्रांच्या माध्यमातून तो जरी देहापलीकडचं सौंदर्य बघू शकला तरी एक पुरुष म्हणून तो तसा नसेल.

मन, शरीर दगडाचं असलेला हा माणूस कणखरपणाची, काहीही पचवायची, कुठेही राहायची ताकद असणारा. खेडेगाव बघत जायचा. भटकायची ओढ नव्या जमिनीची ओढ होती त्याला. कसली जमीन हवी होती त्याला? काय हवं होतं त्याला असं मला नेहमी वाटे. बसल्या जागी चित्रं काढायला लागायचा. लोकांचे शिव्याशाप खाऊन आल्यावर कॅनव्हास ताणून इझलवर लावायचा आणि चित्र काढायला लागायचा. उर्मट होता तो. एकदा माकड आणि स्त्री असं चित्र काढलं होतं

त्यानं. ते प्रदर्शनात होतं. माकडाची दोरी स्त्रीच्या हातात असते. एक उच्चभ्रू बाई खिदळते. तेव्हा 'तुझ्याबरोबर माकडच आहे की' असं तो बिनदिक्कत तिला म्हणतो. तो घाबरायचाच नाही. झोकून देऊन धडाकेबाज जगला. त्याच्यात विनोदबुद्धीही होती. आलेल्या प्रसंगांना विनोदानं तोंड देणं हे त्याला जमे.

रानावनात हिंडत होता म्हणून त्यानं पशुपक्ष्यांशी, झाडांशी मैत्री केली असं मात्र कुठेही नाही. मी बाहेर पडले की झाडाफुलांशी हात लावून बोलते. मला चैन पडत नाही. वाचताना मनात विचार येई, याला ताहितीला वेढून असणारा समुद्रही कधी दिसला नाही. नदी, झाडंही दिसलीच नाहीत का? पुस्तकात तो निसर्गाशी एकरूप झाला हे कुठे दिसलंच नाही. वर्णनही करत नाही तो. त्याच्या चित्रात निसर्ग आहे, तो कुठून आला मग? निसर्गचित्रं आहेत. त्यानं निसर्ग बघितला, पण व्यक्ती म्हणून तो निसर्गाशी कधी तादात्म्य पावला नाही. कलाकार म्हणून त्यानं निसर्ग पाहिला.

विरोधाभासानं भरलेलं रासवट, आडदांड व्यक्तिमत्त्व होतं गोग्यांचं. आपण गोग्यांच्या प्रेमात पडतो. किती रुक्ष जीवन जगला हा, असं वाटतानाच जीवनाचा आनंदही भरभरून घेतला त्यानं. हा विरोधाभास आपल्याला आकर्षित करतो. त्याचं चित्राकरिता झपाटलेपण मोहात पाडतं. त्याचं कशातही झोकून देणं आकर्षक वाटतं. झपाटल्यासारखं असणं आवडतं.

एकदा गोग्यां ताठपणे आकाशाखाली उभा राहिला आणि म्हणाला, 'मी' 'मी आहे.' हा जो मीपणा आहे त्यात गोग्यांचं सार आहे. हा 'मी'पणा मराठीतच छान वाटतो किती. ते दृश्य दिसतं मला डोळ्यांपुढे भवती काही नाही; दगड, झुडपंही नाहीत. भव्य गोग्यां आकाशाखाली उभा आहे. भव्य, कणखर तरीही कोवळेपणा, मृदुपणा हृदयात असणारा गोग्यां हे सारं एकाच व्यक्तीत कसं असू शकतं एकत्र?

आपल्याला गोग्यां का आवडतो? कारण आपल्यातली कलाकार वृत्ती गोग्यांसारखं जगायला मागत असते आणि आपण त्या वृत्तीला सतत दडपून टाकण्यात आपलं आयुष्य खर्च करून टाकत असतो. गोग्यांप्रमाणे आयुष्य उधळून टाकणं आपल्याला जमलेलं नसतं. जमणार नाही हे माहीत असतं. आपण आपल्यातला गोग्यां दडपून, चिरडून टाकण्यात मग्न असतो.

आपण कितीही बोललो गोग्यांवर तरी तो अजून शिल्लक आहे, सापडतच नाही असं वाटतं.

विचार करताना वाटतं की यातून या सगळ्या पैलूंसहित जो उभा राहतो, जो शिल्लक राहतो तो गोग्यां आणि हा गोग्यां फक्त चित्रकार आहे.

गोग्यां निसटून जातोय का असं वाटलं या विश्लेषणात. पण कितीही विश्लेषण केलं, विचार केला तरी या सगळ्या पैलूंमधून जो गोग्यां एकत्रितपणे उभा राहतो, आकाशाखाली उभा असतो, तो भव्य गोग्यां फक्त चित्रकार आहे. तो माणूसही नाही. फक्त चित्रकार. भव्यतेची व्याख्या काय? सगळी जबाबदारी झटकून देणं? पटत नाही, पण तरी चालतं आपल्याला. मग त्याच्या दोषांसकट आपण त्याला स्वीकारतो. आपल्याला विश्लेषण करणं आवश्यकच असतं म्हणून करतो; पण माणूस व्यक्तिमत्त्वाने किती वेगवेगळ्या पातळ्यांवर समृद्ध असतो हे भान विश्लेषण करताना नसतं. विश्लेषण थांबवल्यावरच आपल्याला ते व्यक्तिमत्त्व खऱ्या अर्थानं कळतं. मग गुणदोषांसकट स्वीकारतो आपण ते व्यक्तिमत्त्व. आणि आपण माणसाला स्वीकारत नाही आहोत तर एका चित्रकाराला स्वीकारतो आहोत हे भान आपल्यात उरतं.

चित्रकाराला आपण समजून घेणार आहोत हे भान कधीच सुटता नये आणि हे सगळं विश्लेषण केल्याशिवाय कसं समजून घेणार?

कादंबरीतल्या वेगवेगळ्या पात्रांशी गोग्यां कसा वागला? त्यांची अंतर्गत नाती. यावर वाचकाची प्रतिक्रिया कशी होऊ शकते माहीत नाही. कोलतेंची प्रतिक्रिया कशी झाली हे अनुवादातून दिसलं. कोलते चित्रकार आहेत; पण त्याआधी ते एक संवेदनशील व्यक्ती म्हणून जास्त आहेत. चित्रकार म्हणून त्यांची जी काही प्रतिक्रिया आहे ती आपल्या जागी; पण एक संवेदनशील माणूस म्हणून ते जसे आहेत त्याची प्रतिक्रिया जिव्हाळ्याची, आपुलकीची, नातेसंबंध जपणारी वाटली. कोलतेंनी पात्रांची एकमेकांशी असलेली नाती जिव्हाळ्यानं जपलेली आहेत हे फार मोठं वैशिष्ट्य.

• • •

अनुक्रमणिका

सोने त्यांच्या देहाचे

द गोल्ड ऑफ देअर बॉडीज : चार्ल्स गोऱ्हाम

अनुवाद : प्रभाकर कोलते

सोने त्यांच्या देहाचे : प्रभाकर कोलते यांनी केलेला अनुवाद

भाग १

''जे माझी निंदा करतात त्यांना चित्रकारांच्या स्वभावातलं सगळंच काही कळत नसतं, शिवाय त्यांनी काय म्हणून स्वत:सारखी बंधनं आमच्यावर लादावीत? आणि तेही आम्ही आमची बंधनं त्यांच्यावर लादत नसताना!''

– गोग्यां (पत्नीला उद्देशून)

प्रकरण पहिले

कला–व्यापारी पिअेर मारश्याँ आपल्या जुन्या गिऱ्हाइकाकडे पाहून हसला, ''अर्थातच, मी म्हणालो होतो की तू प्रतिभावंत आहेस.'' त्यानं कबुली दिली. ''एक नवशिका म्हणून तुझं काम खरंच आश्चर्य करण्यासारखंच होतं, पण मला तुझं चित्र विकायला सांगणं म्हणजे, मला वाटतं गोग्यां, जरा जादाच होतंय.''

''तू जर कलेचा धंदा करतोयस तर तुला चित्र विकायला सांगण्यात काही गैर आहे असं मला वाटत नाही.'' गोग्यां म्हणाला. भलामोठा देह, वर्ण गडद, थोडासा स्पॅनिश माणसासारखा चेहरा, देखणा नव्हे. परंतु उमदा, उबदार प्रशुत्वाची डूब असलेला. त्यानं कॉड्रॉयचा चुरगळलेला सूट घातला होता, रंगाने ठिकठिकाणी माखलेला. मारश्याँ त्याच्याकडे पाहून हसला. त्याला आठवलं, कधीकाळी ह्याच गृहस्थाला त्यानं पट्ट्यापट्ट्यांच्या विजारीत आणि उच्चभ्रू शैलीच्या खास कोटात पाहिलं होतं.

''मला सांग गोग्यां, तुला स्टॉक एक्सचेंज सोडून किती काळ झाला?'' त्यानं विचारलं.

''जवळ जवळ दोन वर्षं.'' गोग्यां म्हणाला. ''आणि मी दररोज काम करत होतो. इथे पॅरिसमध्ये एक वर्ष, मग नॉर्मंडीला, नंतर रोवला.'' त्यानं आपलं एक चित्र उचलून मारश्याँच्या फेल्टनं मढवलेल्या इझलवर ठेवलं. ते एक निसर्गचित्र होतं. चार महिन्यांपूर्वी रोवँला असताना रंगवलेलं. गोग्यां इझलपासून दूर उभा राहून चित्र पाहू लागला. मग त्यानं खांदे उडवले.

''मला वाटतं, हा निसर्गचित्रात काही प्रमाणात तरी नक्कीच कलात्मक गुण दिसताहेत.'' तो बिनधास्तपणे म्हणाला.

''होय, ते नेत्रसुखद चित्र आहे.'' व्यापाऱ्यानंही कबुली दिली. अगदी माझ्या तळघरातल्या पिसारोच्या अनेक चित्रांप्रमाणेच पण पिसारो खपत नाही.

''पिसारो हा गोग्यांचा पहिला शिक्षक. त्या वेळी तो एक बँकर होता आणि केवळ रविवारच्या दिवशी चित्र रंगवत असे. त्या वेळच्या त्या चित्रात बराच पिसारो होता. पण गोग्यांला ते कबूल करणं जीवावर येत होतं. आपली नापसंती दर्शवण्यासाठी तो आपलं तोंड उघडणार इतक्यात गॅलरीचा दरवाजा उघडला आणि दरवाजा उघडल्याने कुणी तरी आल्याची सूचना देणारी घंटी वाजली.

''माफ कर हं गोग्यां.'' व्यापारी म्हणाला आणि तो भारी किमतीचा रशियन लोकरीचा पेहराव केलेल्या खप्पड बाईला भेटायला म्हणून वळला. तिच्यापेक्षा निदान वीस वर्षांनी लहान असलेला एक बावळट तरुण तिच्यासोबत होता.

''मादाम कॉन्तेस्'' मारश्याँ म्हणाला, ''मॉसीयूर.''

गोग्यां हसला. हे १८८४ साल होतं. ह्या असल्या उपाध्या वापरण्याची पद्धत इतिहासात जमा झाल्याला पंधरा वर्षं झाली होती; पण तरीदेखील असल्या काही ठिकाणी ती अजूनही वापरात होती; म्हणजे त्यासाठी आवश्यक असलेली सघन प्रतिष्ठा असणाऱ्यांमध्ये!

अनुक्रमणिका



चित्र पॉल गोग्यां

व्यापाऱ्याचा धंदेवाईकपणा गोग्यां न्याहाळत होता. मारश्याँ एक आकर्षक, चकचकीत कॅनव्हॉस दाखवत होता. किमान ३०० फ्रँक्स किमतीची नक्षीदार, सोनेरी पानांची फ्रेम असलेले चित्र! त्या चित्रात ढोबळपणे तीन अजस्र गुलाबी रंगाच्या, वेश्यावृत्तीच्या वाटाव्यात अशा नग्न स्त्रिया एका बेगडी उपवनात पहुडलेल्या आहेत आणि केकवरच्या नक्षीकामासारखा दिसणारा बाल-देवदूतांचा एक गट कौतुकाने न्याहाळतो आहे, असं.

गोग्यांनं स्वतःसोबत रोवँहून आणलेल्या आपल्या चित्राकडे पुन्हा एकदा पाहिलं. त्याच्या चित्रामध्ये आणि त्या गुलाबी कपट्यामध्ये कसलंही नातं नव्हतं. ज्यामध्ये चित्रकारांनी स्टुडिओतील कामाचा उबग आल्यामुळे खुल्या वातावणात जाऊन काम करणं पसंत केलं होतं, अशा आधुनिक स्कूलशी गोग्यांचा संबंध होता. तो आणि त्याचे चित्रकार मित्र त्या स्कूलचे मूळ मार्गदर्शक होते आणि असं काही नवं शोधणाऱ्यांना समाजाकडून मिळणाऱ्या ज्या उपहासाला तोंड द्यावं लागतं त्यात ते चांगलेच पोळून निघाले होते.

जेव्हा मारश्याँनं ते गुलाबी चित्र विकलं आणि ती कॉन्तेस् गॅलरीतून बाहेर पडली तेव्हा गोग्यां म्हणाला, ''काय रे मारश्याँ, तो कचरा तू मीटरच्या भावाने की फ्रेमसकट किलोच्या भावाने विकतोस?''

ज्यानं नुकतीच पैशाची कमाई केली आहे त्याचं संतुलन बिघडवणं जरा कठीणच असतं. मारश्याँ हसला. त्याने आपले हात एकमेकांवर चोळले.

''मीटरने असेल किंवा किलोने असेल, पण ते विकलं जातं गोग्यां!'' तो म्हणाला, ''मी मॉडर्न आर्टचा पूर्णपणे पाठीराखा आहे, परंतु मला जर पोटासाठी काही मिळवायचं असेल तर लोकांना जे पाहिजे ते मी द्यायला हवं.''

पट्टेरी विजार आणि उच्चभ्रू पद्धतीचा काळा फ्रॉक-कोट घातलेल्या व्यापाऱ्याकडे गोग्यांनं पाहिलं आणि तो तिरस्काराने म्हणाला, ''लोक... जर असले लोक असतील, तर फ्रान्सला आता देवच तारो.''

तो मारश्याँच्या दुकानाच्या मागल्या बाजूला गेला आणि त्या गुलाबी चित्रांकडे एकटक पाहू लागला.

अनुक्रमणिका

फ्रान्समधल्या धनवान चित्रकारांपैकी एक असलेल्या बुजरोचं ते चित्र होतं. ''बुजरो, एकेदिवशी ही चित्रं तुला बारडेलॉस् सुळीवर चढवतील.'' तो म्हणाला. ''एक मेहरबानी करशील मारश्याँ! ते भिंतीकडे तोंड करून ठेव.''

मारश्याँ हसला आणि त्यानं ते चित्र भिंतीकडे तोंड करून ठेवलं. ''खरं म्हणजे तुझं भाकीत खरं ठरणार असेल तर त्या भाकिताशी मिळत्याजुळत्या अशाच एका ठिकाणी हे चित्र लटकावलं जाणार आहे.'' तो म्हणाला.

गोग्यांनं होकारार्थी मान हलवली.

''सर्वसाधारणपणे सर्वच वेश्या प्रामाणिक असतात.'' तो म्हणाला. ''पण त्या तशा प्रकारच्या बाईकडून तुला तुझ्या पैशाचं पूर्ण मूल्य कधीच मिळणार नाही.''

त्यानं त्याच्या चित्राकडे पुन्हा एकदा पाहिलं. आता मात्र तो थोडासा निराश झाला. पण त्या चित्रात कसा होता, अगदी एखाद्या मूर्खालाही दिसावा असा.

''हे बघ, मारश्याँ, मला काहीतरी विकायलाच हवं!'' तो म्हणाला, ''मी फार आर्थिक संकटात सापडलोय मेत्ला आणखी एक मूल झालंय. आता आम्ही एकूण सातजण खाणारी झालोय, माझं पुरतं दिवाळं वाजलंय. मला उद्याच्या जेवणासाठी पैसे हवेत.''

मारश्याँ आश्चर्याने दिङ्मूढ झाला. त्याला गोग्यां एक चित्र-संग्राहक म्हणून ओळखीचा होता, महत्त्वाचा दांडपट्टा खेळणारा. एक स्टॉक-ब्रोकर जो एक प्रसिद्ध म्हणून त्याला परिचित होता, जो कॉर्ड्रॉयचा सूट एक कलात्मक आवड म्हणून वापरायचा.

''छे, मला नाही वाटत, तू हे गांभीर्याने बोलतो आहेस असं. मला असं व्यक्तिगत बोलायचं नाहीय, पण तू एक यशस्वी व्यक्ती होतास आणि तू नक्की काही तरी राखून ठेवलं असशीलच.''

''होतो मी यशस्वी!'' तो म्हणाला. ''मी वर्षाला चाळीस हजार फ्रँक्स मिळवायचो आणि त्याची मला सारखी आठवण करून देण्यात माझी बायको आणि बहीण धन्यता मानतात आणि मी काही राखूनही ठेवले होते. पण ते गेलं. अगदी सगळंच्या सगळं. घाण आणणारी प्रत्येक गोष्ट.'' गोग्यां.

''ते कसं? अगदी पै न् पै घालवलीस?'' मारश्याँनं विचारलं.

त्याला आठवला दोन वर्षांपूर्वीचा गोग्यां. पॅरिसमधल्या उत्कृष्ट शिंप्याकडून आपले कपडे शिवून घेणारा, माने आणि सेझाँ विकत घेणारा. स्टॉक एक्स्चेंजच्या हॉटेलात खर्चीक पार्ट्या देणारा.''

''सहजच!'' गोग्यां म्हणाला. ''पहिलं वर्ष आम्ही इथे पॅरिसमध्ये राहिलो, नेहमी राहायचो. तसेच दोन दोन नोकर आणि तो अधोगतीला नेणारा खर्च आणि जेव्हा सगळ्याच बाबतीत पंचाईत व्हायला लागली तेव्हा मी कुटुंब रोवँला हलवलं. तिथे काही गोष्टी थोड्या स्वस्त आहेत.''

''खरंच वाटत नाही!'' मारश्याँ पुटपुटला.

''मी सांगतो तुला, मी अगदी गांजून गेलोय.'' गोग्यां म्हणाला. ''मला काही तरी विकायलाच हवं.''

''तुला ही विकता येणार नाहीत!'' रोवँहून त्यानं आणलेल्या त्याच्या चित्रांकडे बोट दाखवत मारश्याँनं स्पष्टपणे सांगितलं.

''गोग्यां, मी तुला सांगतो, बाजारात मॉडर्न आर्ट म्हणजे एखादं न विकलं जाणारं औषधच आहे बघ. इतरांचं सोड, अगदी मोठी नावंसुद्धा विकली जात नाहीत.''

''लोक घेतात विकत चित्रं!'' गोग्यां ठामपणे म्हणाला. ''असं कसं शक्य आहे की सगळ्यांना ती घाणेरडी 'बुजरो'चीच चित्रं हवी आहेत?''

''पैसेवाल्या लोकांना सुखद चित्रं हवी असतात.'' मारश्याँ म्हणाला. ''ह्या घटकेला. सध्या फॅशनमध्ये असलेल्या चौथ्या लुईसकालीन फर्निचरसोबत जाणाऱ्या गोष्टी त्यांना हव्यात. तुला जर काही विकायचं असेल तर मी तुला एक सूचना देईन. लुव्रला जा आणि कशाची तरी नक्कल कर. राफेल किंवा बूचर, एक मस्तपैकी नजाकतदार काम कर आणि मग कदाचित तुझ्यासाठी मी एखादं गिऱ्हाईक शोधू शकेन.''

''मी चित्रकार आहे!'' गोग्यां म्हणाला. ''मी मेलेल्यांना उठवून उभं करण्याचा धंदा करीत नाही.''

त्याची चित्रं काही आठवड्यांसाठी सांभाळून ठेवावीत अशी मारश्याँची मनधरणी करून तो गॅलरीतून बाहेर पडला आणि रुएलफित ह्या आर्ट गॅलरीच्या आणि बँकांची कार्यालयं असलेल्या चिंचोळ्या गल्लीत गेला.

मारश्याँच्या गॅलरीपासून काही दरवाजे ओलांडून 'बर्टिन अँडसिइ'ची इमारत होती, तिथे गोग्यांनं ब्रोकर म्हणून काम केलं होतं. बर्टिनच्या नावाची पितळेची पाटी पाहात तो क्षणभर थांबला, मग पुढे गेला.

मारश्याँ हा त्याचा शेवटचा आधार होता. इतर व्यापाऱ्यांनी म्हणजे लेवी, ड्युराँ, गिपिल आणि इतर सर्वांनी एकच तुणतुणं वाजवलं होतं.


''माझ्याकडे तळघर भरून सेझाँन आहे.'' ड्युराँ त्याला म्हणाला होता. ''जुन्या कॅनव्हासच्या बदल्यातही त्याची चित्रं मी विकू शकलो नाही.''

''माझं तळघर पिसारोनं भरलेलं आहे!'' लेवी म्हणाला होता. ''मासे बांधण्याचा कागद म्हणूनही ती मी विकू शकलो नाही.''

''लोकांना मॉडर्न आर्ट अगदी सरळ सरळ नकोशी वाटते.'' गुपिलमधल्यांनी त्याला सुनावलं होतं.

गोग्यां मनाशी पक्कं समजून होता लोक चुकताहेत. शेवटी मॉडर्न आर्टच गुलाबी नग्नता संपूर्णपणे दृष्टिआड करील. अर्थात हे सगळं भविष्यात घडणार होते. दरम्यान त्याला काही पैसे मिळणं आवश्यक होतं. कारण त्यामुळे त्याच्या बायकोच्या कपाळावरच्या आठ्या नष्ट होणार होत्या. मग ती स्पर्शसुखाच्या वेळी चांगली वागेल का? गोग्यांच्या मनात प्रश्न उभा राहिला. गेल्या महिन्यात त्यानं त्याच्या बहिणीकडून शंभर फ्रँक्स तिची मिनतवारी करून आणले होते आणि तेही देताना तिनं त्याच्या निरागस बायको-मुलाखातर देत आहोत, असं त्याला सुनावलं होतं. मेरीकडे खूप पैसे आहेत. त्यानं विनवलं तर तो त्याला आणखीन देईलही; पण तिची मनधरणी करण्याच्या मनःस्थितीत तो सध्या तरी नव्हता. त्यानं मोमात्रला जायचा विचार केला. तिथे त्याचे बरेचसे मित्र राहायचे आणि काम करायचे. शक्यता होती की एखाद्याने चित्र विकलं असावं आणि त्यातून त्याच्यासाठी पन्नास फ्रँक्स काढून द्यायला.

मॉडर्न चित्रकारांचा दारू पिण्याचा आणि वाद घालण्याचा अड्डा म्हणजे 'कैफे द ला नोविल अथेन्स' हा जणू एक क्लब इथे पैशाला इतकं महत्त्व नव्हतं, जितके कलेची कदर करण्याला होत. गोग्यां त्या कॅफेत दाखल झाला तो डिसेंबरचा महिना होता आणि बरीच थंडी होती. नोविल कॅफेत कोळशाचा आणि 'VIN CHAUD'चा



चित्र पॉल गोग्यां

वास दाटून राहिला होता. तावदानांवर वाफेमुळे बाष्प जमलं होतं. मॉडर्न चित्रकारांसाठी राखून ठेवलेल्या टेबलाभोवती कपिल पिसारो, देगा, तरुण तुलूझ लात्रेक बसले होते. गोग्यां आपली वाट काढत टेबलापाशी आला आणि पिसारोच्या शेजारच्या खुर्चीत बसला.

''ॲबसिन्थ!'' त्यानं वेटरला फर्मावलं. त्यानं समोर बसलेल्या लात्रेककडे पाहिलं आणि म्हटलं, म्हणजे जर आमच्या तरुण मित्राने सगळीच संपवली नसेल तर.'' कारण लात्रेकच्या कोपराजवळ रिकाम्या बश्यांचा मनोराच उभा होता.

गोग्यांला ॲबसिन्थ फार आवडत असे. पण पिसारोला आवडणाऱ्या स्वस्त रेड वाईनऐवजी महागडी ॲबसिन्थ पिताना त्याला अपराधीपणाचं वाटत होतं. म्हणून तो ती सावकाश पीत होता. त्यानं मारश्याँला 'उद्यासाठी जेवणालाही पैसे नाहीत' असं फार नाही, पण थोडं फुगवूनच सांगितलं होत. मेरीकडून घेतलेल्या शंभर फ्रँक्सपैकी थोडेफार उरले होते. त्यातले खरं म्हणजे त्याने ॲबसिन्थवर खर्च करायला नको होते, एवढंच काय पण 'नोविल'मध्ये बसायलाही नको होतं त्यानं. ह्या क्षणी

बसून राहिला.

"माझ्याबरोबर घरी चल पॉल, स्टुडिओत कोच आहे त्यावर झोप." शुफनेकरनं त्याला सुचवलं.

शुफ एक लहानखुऱ्या अंगयष्टीचा डोळ्यांवर चष्मा असलेला माणूस होता आणि आपल्या अशक्त दिसणाऱ्या पत्नीसमवेत पॅरिसलगतच असलेल्या मान्ट्रोग येथे भाड्याच्या घरात राहात होता.

ॲबसिन्थमुळे गोग्यांचा आवाज घोगरा झाला होता. तो त्याला म्हणाला, "तू खरंच चांगला माणूस आहेस आणि माझ्यापेक्षा पुष्कळच हुशारदेखील. निदान बायकोनं कधी तक्रार करू नये म्हणून आवश्यक तेवढे पैसे बाँडमध्ये गुंतवून ठेवले."

शुफनेकरनं खांदे उडवले. तो स्पष्ट आल्सेशन सुरात म्हणाला, "पॉल, माझ्याकडे तुझ्याइतकी बुद्धिमत्ता असती तर मला तुझ्या वाट्याला आलेल्या संधीही मिळाल्या असत्या." असं म्हणत त्यानं आपल्या खिशातून शंभर फ्रँकची नोट काढून ती गोग्यांच्या हातात कोंबली आणि हळुवारपणे म्हणाला, "पैशांची काळजी करू नकोस. माझ्याकडे फार नाहीत परंतु जेवढे देऊ शकतो तेवढे तू घे."

दिवे मालवून शुफ आपल्या स्टुडिओत गेला. जीवनात अपयश झेलण्याची गोग्यांची तयारी झाली नव्हती. धंदा असो, प्रेमप्रकरण असो किंवा युद्ध, सगळ्या गोष्टी सहज होत होत्या. अगदी दोन वर्षांपूर्वी, जणू काही यशाचा वरच त्याला मिळाला होता आणि आता त्याला आपल्या गरिबीची लाज वाटत होती. मित्रांकडून उपकार करून घेण्याची शरम वाटत होती आणि उद्या घरी जाऊन आपल्या बायकोकडे अपयशाचा पाढा वाचणं त्याला शरमिंदेपणाचं वाटत होतं; आणि अशा प्रकारच्या अपयशातून पुढे वाढून ठेवलेल्या निर्वाणीच्या प्रसंगाला तोंड देण्याचीही त्याला लाज वाटत होती.

३

दुसऱ्या दिवशी दुपारी गोग्यां ट्रेनमधून आला. उतरला आणि त्याला त्या शहराची किळस वाटली. एक वर्षापूर्वी फार मोठी उमेद घेऊन तो इथे आला होता आणि आता त्याला ते ठिकाण मुळीच आवडत नव्हतं. एकंदरीत उच्चभ्रूंचं जगच त्याला नकोसं झालं होतं.

नशेचा हँगओव्हर आणि अशा परिस्थितीत कालच्या कृत्याबद्दल त्याच्या मनालाच लाज वाटत होती. कदाचित त्यावरचं प्रायश्चित्त म्हणून की काय त्यानं रेल्वे स्टेशनपासून घरापर्यंत पायीच चालत येऊन टांग्याचे पैसे वाचवले. भाड्याने घेतलेल्या त्याच्या घरासमोर त्याची मुलगी एलिना पलिता घेऊन थंडीत एकटीच खेळत बसली होती. तिनं निळ्या रंगाचा, तीन हिवाळे काढलेला, खांद्यापाशी घट्ट झालेला स्वेटर घातला होता. थोड्याच आठवड्यांनी नाताळच्या दिवशी तिला आठ वर्षे पूर्ण होणार होती.

तिला उचलून तिच्या गालाचे मुके घेत तो म्हणाला, "माझ्या सोनुले, तू इथं थंडीत गारठशील. आत स्वयंपाकघरात का नाही राहिलीस इतरांसोबत?" त्याच्या मनात आलं की, कदाचित मेत्ने खडूसपणे तिला बाहेर हाकलून दिलं असावं. नाही तरी ती इतर मुलांच्या तुलनेत एलिनाला जरा जास्तच कठोरपणेच वागवते. कारण तिला माहित्येय, एलिना त्याची आवडती आहे.

ते दोघं सोबतच स्वयंपाकघरात गेले. एलिनानं त्याचा हात धरला होता. इतर मुलं टेबलापाशी बसली होती. मोठा एमिल पुस्तक वाचत होता. क्लोविस आणि ज्याँ बुद्धिबळाच्या उरलेल्या सोंगट्यांनी स्वतःची करमणूक करीत होते. गोग्यां आत येताच धाकटी मुलं उठून उभी राहिली आणि तो त्यांचे मुके घ्यायला खाली वाकला. एमिल मात्र जागेवरच बसून होता.

"तुझी आई कुठाय?" गोग्यांनं सरळ मोठ्या मुलालाच विचारले.

"वरती, बाळासोबत! तो पुन्हा नेहमीसारखा आजारी झालाय." एमिलनं खिन्नपणे उत्तर दिलं.

एमिलनं पुन्हा पुस्तकात डोकं खुपसलं. क्षणभर गोग्यांला वाटलं, त्याला मोठ्यांशी आदराने कसं वागावं याची आठवण करून द्यावी; पण मग त्यानं विचार बदलला. एमिल आता दहा वर्षांचा झाला होता. म्हणजे बापाला दूषणं देण्याइतपत शहाणपण त्याला नक्कीच आलं होतं. खरंच पॅरिसमधले दिवस किती मजेचे होते आणि बापाने ह्या इथं खेडेगावात आणून काय मिळवलं? उलट पॉकेटमनी मिळायचा. तो गेलाच वर अख्ख्या कुटुंबाचं नशीबच बदलून टाकलं त्यानं. तो आणि एमिल दोस्तच होते जणू. त्यानं मुलाला मुष्टियुद्ध शिकवलं. बोट वल्हवायला शिकवलं आणि आता एमिल त्याचा

तिरस्कार करू लागलाय. हे सगळं आठवून हताशपणे डोके हलवत गोग्यां चिंचोळ्या जिन्याने वर गेला. त्यानं हलकेच बाळाच्या खोलीचा दरवाजा उघडला. त्याची बायको बाळाच्या पॉलच्या बिछान्याशेजारी बसली होती आणि समोरून येणाऱ्या प्रकाशात तिचं डोकं ठळकपणे दिसत होते. त्यांच्या लग्नाला आता अकरा वर्षे झाली होती; परंतु आजही तिच्या सौंदर्याने त्याला चेतवलं! तो पाहता क्षणीच तिच्या प्रेमात पडला होता त्या वेळेसारखं.

''मेत्, कसा आहे तो?'' त्यानं हळूच हाक मारून चौकशी केली. ती मागे वळली. ओठांवर बोट ठेवून शांत राहण्याची खूण करत अलगद पावलांनी ती बाळाच्या बिछान्यापासून दूर झाली आणि खालच्या आवाजात पुटपुटली, ''आताच त्याला झोप लागलीय आणि उठेल तेव्हा मला वाटतं, बरं वाटेल त्याला. पण पॉल, तो सशक्त नाहीय. हे दुष्काळी जुनं घर त्याच्या तब्येतीसाठी चांगलं नाहीय.''

ते त्यांच्या शयनगृहात गेले आणि गोग्यां थकून खाली बसला. तो दमलेला होता आणि शिळ्या ॲबसिन्थमुळे त्याचं डोकं ठणकत होतं. पुढचा अर्धा तास तरी नक्कीच सुखावह नसणार, याची त्याला खात्री झाली.

''हे बघ, रडगाण्यात काही तथ्य नाही, त्या सगळ्यांनी म्हणजे लेवी, ड्युराँ, मारश्याँ यांनी मला परतून लावलंय. ह्या व्यापाऱ्यांकडून खात्री एकच; ती म्हणजे आपण उपाशी राहून स्वतःलाच दोष देत राहायचं.'' मेत् एका सरळ खुर्चीत बसली. त्याच्या मनात आलं, ती सुंदर स्त्री आहे; पण तिच्या चेहऱ्यावर कष्टाच्या छटा दिसायला लागल्यात. तारुण्य आता तकलादू झालंय. उबदार वातावरणातली रोपं रखरखीत वातावरणात वाढत नाहीत.

''सबंध वर्षभरातल्या कामामधून एकही काम तुला विकता आलं नाही?'' तिनं विचारलं.

''काही नाही, अगदी चिंधीसुद्धा.'' तो म्हणाला.

''मग आता काय ठरवलंयस तू?''

''मला माहीत नाही, मला विचार करायला थोडा वेळ हवा.'' तो म्हणाला.

''त्यांनी तुझी बँकेतली जागा राखून ठेवण्याचं वचन दिलंय, पण ते ती काही कायमची राखून ठेवणार नाहीत.'' वर्षभरापूर्वी पॅरिस सोडून हूआँला येताना तिनं तशी काही तरी तजवीज केली होती, याची तिनं त आठवण करून दिली.

''मी आता परत बँकेत जाणार नाही.'' म्हणाला, ''मी आता एक चित्रकार आहे मेत्, ३ भलंबुरं काही होवो, पण राहणार कलावंतच.''

''आपण काही यावर जगू शकत नाही.' म्हणताना तिचा आवाज चिरका झाला. '' जगण्यासाठी पैसे मिळवता येत नसतील तर तू ते : मागून आण.''

''उधार मागण्यासाठीसुद्धा कोणी शिल्लक ना मेरी देईल लहानसं कर्ज पण त्याहून अधिक काही : माझ्या काकांकडे मला जायचं नाहीय. त्यांन आवडणार नाही आणि मला चांगलं माहित्येय ते मेर त्यांची सगळी संपत्ती मलाच मिळणार आहे.'' : म्हणाला.

''तुझे झीझी काका मरण्याची वाट पाहात ३ इथे स्वस्थ बसून राहू शकत नाही. पॉल, आपल खायला तर हवंच ना?'' ती म्हणाली.

''मी शुफकडून शंभर फ्रँक्स उधार आणले पुरतील आपल्याला थोडेफार!'' तो म्हणाला.

''फक्त शंभर फ्रँक्स!'' ती म्हणाली खोलीतल्या कोपऱ्यात असलेल्या आपल्या मेज गेली. ड्रॉवरमधून बिलांचा गठ्ठा तिनं काढला म्हणाली, ''पॉल, ह्या बिलांकडे बघ, घराचं मुलांचे कपडे, वाणी, मटणवाला, बेकरी, दूधवाल असं नाही चालू शकत आपलं. तू तुझी नोकरी सोडलीस तेव्हा तू मला वचन दिलं होतंस आणि म्ह होतास की आपण शुफ, पिसारो आणि मंडळीसारखं जगणार. उलट त्यांच्यापेक्षा थोडं चांगलंच असेल स पण आता पिसारोपेक्षाही वाईट परिस्थिती आहे आप आपण भिकारी आहोत पॉल, भिकारडे.''

''बरोबर आहे तुझं, बरोबर आहे.'' तो म्हणाल

''माझं बरोबर आहे असं म्हणतोस, पण मग करणार आहेस तू? तू स्वतःला तुझ्या स्टुडिओत ब घेशील आणि कोणालाही नको असलेली चित्रं रं बसशील आणि इथं तुझी पोरं मात्र उपाशी असती रागासोबत तिचा आवाजही वाढला. तिचे डॅनिश उ अधिक स्पष्ट झाले. ''काय झालंय काय तुला प

जेव्हा आपण लग्न केलं तेव्हा किती जबाबदारीने वागायचास. आणि आता तुझी जगण्याची उमेदच नाहीशी झाल्यासारखा वागतोयस.''

तो उठून खिडकीपाशी गेला आणि निसर्गाचं हिवाळ्यातलं रूप न्याहाळत राहिला. ''मी तुला दोष देत नाही मेत्.'' तो म्हणाला. त्याची तिच्याकडे पाठ होती. ''आपण जेव्हा लग्न केलं तेव्हा, माणसं जशी अधिकाधिक लठ्ठ लठ्ठ होत जातात, तसा मीही अधिकाधिक श्रीमंत होणारच नाही, असं तुला तेव्हा वाटण्याचं कारणच नव्हतं. पण मी तुला सांगतो, हा माझाही दोष नाहीय, मी चित्रकार आहे आणि जगणसाठी मला चित्र रंगवायलाच हवीत; जसा इतरांना श्वासोच्छ्वास करावा लागतो तसं. तू वाटल्यास हा शाप समज पण हीच वस्तुस्थिती आहे. एकदा का माणूस कलेशी वचनबद्ध झाला, खऱ्या अर्थाने वचनबद्ध, की मग त्यातून त्याची सुटका नसते.''

बराच वेळ शांतता पसरली. मग मेत् शांतपणे म्हणाली, ''पॉल, आपण काही तरी करायला हवं. हे असं जगणं असह्य झालंय. तुला बँकेत परत जायचं नसेल तर आपण दुसरीकडे कुठं तरी जायला हवं.''

''कुठे?'' खिडकीतून न हलता त्यानं विचारलं.

''कोपेनहेगनला. माझ्या माहेरी!'' ती ठामपणे म्हणाली. ''निदान मुलांची खाण्यापिण्याची सोय होईल आणि त्यांना चांगल्या तऱ्हेने वाढवता येईल.''

''कोपेनहेगन?'' तो म्हणाला. ''ते चणचणीचं इटुकलं कोपेनहेगन? अरे, मी तर फ्रेंच माणूस फ्रेंचातला फ्रेंच. मी काय करणार कोपेनहेगनला?''

मेत्नं उसळून वर पाहिलं. तो आतून स्वभावाने पक्की 'डेन' होती. उत्तर युरोपीय फ्रान्समधल्या बारा वर्षांच्या आयुष्यात तिच्या युरोपीय वृत्तीचा फक्त वरवरचा पापुद्राच काय तो वितळलेला होता.

''तू इथे रंगवतोस तसं तिथे रंगवू शकशील.'' ती म्हणाली आणि ''निदान लोकांना दाखवण्यासाठी काही तरी धंदा करू शकशील. त्यामुळे तुझ्या कलाकार्यात काही अडथळा येणार नाही.''

तिच्या आवाजात एक प्रकारचा धारदार तिरस्कार होता; तशीच एक नवी आणि धोकादायक सूचनाही. गोग्यां खिडकीपासून बाजूला झाला आणि वळून म्हणाला, ''फार मनावर घेऊ नकोस तू, अगं आपण फ्रान्स सोडणं कसं शक्य आहे?''

''आपण फ्रान्समध्ये राहूच कसं शकतो? माझा विचार पक्का आहे. तुझ्यासोबत किंवा तुझ्याशिवाय मी जायचं ठरवलं आहे. तुझ्या ह्या वेड्या धंद्यापायी मी माझ्या मुलांचे हाल होताना पाहू शकत नाही.''

''मी कुटुंबाचा प्रमुख आहे आणि माझ्या संमतीशिवाय मुलांना घेऊन जाण्याचा तुला अधिकार नाही.'' तो रागाने म्हणाला.

''कायद्याप्रमाणे मला अधिकार नाही, हे मान्य. परंतु मी ओळखते तुला पॉल. तू काही दुष्ट नाहीस. तुझ्या हट्टापायी तुझं कुटुंब नेस्तनाबूत झालेलं तुला नाही आवडणार!'' ती शांतपणे म्हणाली.

गोग्यांनं बाहेरच्या वादळी बर्फाकडे पाहिलं. तो मनाशी म्हणाला, ''खरं आहे तिचं, नाही मी पाहू शकणार माझं कुटुंब नष्ट झालेलं.'' तिच्या माहेरच्या पैशावर आपलं कुटुंब पोसणं अपमानकारकच; पण त्याशिवाय त्याच्याकडे दुसरा पर्यायच नव्हता. कलेसंबंधीची धडपड खऱ्या अर्थानं सुरू होण्यापूर्वीच सोडून देऊन हातात टोपी घेऊन पुन्हा बँकेत परतायचं हे त्याहून निंदनीयच.

''देवा मला मदत कर, मेत्, तुझं बरोबर आहे.'' तिच्याकडे न पाहताच तो म्हणाला, ''आपण सगळे मिळून डेन्मार्कला जाऊ.''

प्रकरण दुसरे

कोपेनहेगमधल्या स्ट्रॉगेट ह्या हमरस्त्यावरून गोग्यां वाट काढत चालला होता. त्याच्या हातात कसल्या तरी नमुन्याची एक वजनदार पेटी होती. उंच कर्कश डॅनिश संभाषणांनी त्याला जाम वैताग आणला. लग्नानंतरच्या पहिल्या काही वर्षांत मेत्ची भाषा शिकणं म्हणजे करमणूकच वाटायची त्याला; पण त्यानं कधी तो गंभीरपणे घेतली नाही. हॉटनहॉट शिकण्यासारखी डॅनिश भाषा शिकणं म्हणजे त्याला विनोदच वाटायचा. आता डेन्मार्कमधल्या गेल्या सहा महिन्यांच्या वास्तव्यात त्याला ती भाषा आवडेनाशीच झाली होती. त्याचे कान फ्रेंच आवाज ऐकण्यासाठी आसुसले होते.

अनुक्रमणिका

डेन लोकांसोबत त्याला काही यश येत नव्हतं. त्याच्या चित्रांमध्ये काही प्रगती झाली नव्हती आणि धंद्याच्या गोष्टीही फारशा फायद्याच्या ठरत नव्हत्या. हूआँमधल्या कपडे तयार करणाऱ्या 'डिलिस अँड कंपनी'चा तो इथला प्रतिनिधी होता आणि ही तजवीज काही कामाला येत नव्हती. डॅनिश नौदलासाठी त्यानं एक मागणी मिळवली होती, तीसुद्धा मेत्चा कुणी एक चुलत भाऊ नौदलाच्या नेव्ही यार्डात व्यवस्थापकीय प्रमुख होता म्हणून! नौदलाला फ्रान्समधील टारपोलीन हवं होतं अशातला भाग नव्हता.

एका हातातली जड पेटी दुसऱ्या हातात घेतानाच गोग्यांची खात्री झाली की विक्रेता म्हणून आपलं काही खरं नाही. सकाळ संपतासंपताची दुपार होती; पण

तरीदेखील तो वैतागला. आपल्या काळ्या डायरीत नोंदलेले टेलिफोन नंबर फिरवत बसण्याच्या मनःस्थितीत तो आता नव्हता.

तो स्ट्रॉगेट रस्त्याने चालत राहिला. नंतर नॉरगेटनच्या गल्लीत वळला. त्याची घरी जायची इच्छा नव्हती; पण इतर कुठेही तो जाऊच शकत नव्हता. जाण्यासारखं एखादं हॉटेलही ह्या गावात नव्हतं. तो लोखंडी दरवाजातून आत वळला आणि अंगण ओलांडून दारात आला. सासूला टाळण्यासाठी त्याला बाजूच्या दरवाजातून चुपचाप घरात जायचं होतं. बैठकीच्या खोलीच्या दरवाजातून तो आत वळणार इतक्यात मोठ्याने हसण्याच्या आवाजाने तो थांबला. ते एक उच्च स्वरातलं मधुर हास्य होतं. एखाद्या तरुण मुलीच्या हास्यासारखं. त्यानं पेटी खाली ठेवली आणि तो बैठकीच्या खोलीत गेला. त्यानं ऐकलं की मेत् म्हणत होती, ''सद्गृहस्थांनो, आता विनोद संपला. चला, आपण मोलिएरच्या सुंदर भाषेकडे वळूया.''

ती तीन मुत्सद्यांच्या एका गटाला फ्रेंच धडे देत होती. रुबाबदार तरुण ब्रिटिश-पोशाख चढवून आले होते.

डॅनिश भाषेत ती सहजपणे सांगत होती की, फ्रेंच भाषेमध्ये प्रत्येक नियमाला अपवाद असतो. एक तरुण हसत हसत म्हणाला, ''मला असंही सांगण्यात आलंय की फ्रेंच भाषेप्रमाणे फ्रेंचांच्या जीवनाविषयीही हे खरं आहे म्हणून.''

मेत् पुन्हा हसली आणि ते तरुणही तिच्या हास्यात सामील झाले. गोग्यां खाकरला आणि एकाच वेळी अख्खी फलटण वळावी तसं तिन्ही तरुणांनी वळून पाहिलं. मेत्चं हास्य मावळलं. तिला हा अशा प्रकारचा अडथळा आवडला नाही.

''पॉल, लवकर आलास.'' ती म्हणाली.

''थोडासाच. तुला तसदी दिल्याबद्दल माफ कर!'' गोग्यां म्हणाला.

मेत् अडखळली, मग म्हणाली, ''सद्गृहस्थांनो, माझे पती गोग्यां आणि पॉल, सेक्रेटरी अल्सेन, कान्सुल सॉडरमन, काऊंट एरिक आँ दॉखन.''

त्या तिघा तरुण मुत्सद्यांनी एकाच वेळी लवून अभिवादन केलं. गोग्यांला 'मुलाँ द् ला गालेत्त' मधल्या कॅन-कॅन गर्ल्सची आठवण झाली.

''अभिवादन गोग्यां!'' ते म्हणाले.

''अभिवादन सभ्य गृहस्थांनो, असा तऱ्हेवाईकपणे तुमच्या अभ्यासात अडथळा आणल्याबद्दल मला पश्चात्ताप होतोय.'' गोग्यां म्हणाला.

''तसं मुळीच नाही, श्रीमती गोग्यांच्या औदार्यामुळेच आम्हाला फ्रेंच भाषेची काही सौंदर्यस्थानं ओळखीची होताहेत. जर कोणी एखाद्या लहान गावात राहात असेल तर त्याने जरूर आपल्या मोठ्या शेजाऱ्यांकडून काही उसने घ्यायलाच हवे!'' काऊंटनं नम्रतेनं म्हटलं.

गोग्यांला ते थोडं विपरीत वाटलं ही इंग्रज माणसांची नक्कल करणं, जणू एक चांगली करमणूक, याउलट मेत्ने सगळं नगद पैशांसाठी केलं होतं. ती मंडळी गेल्यानंतर तो हसला आणि म्हणाला, ''ह्या देशात प्रत्येकाला काही ना काही उपाधी असावीच असं वाटतं, काय तर म्हणे, हेरे काऊंसल हे, हेरे डिरेक्टर ते. जंग, हेरे झाडूवाला, जे हेरे मटणवाला, हास्यास्पदच आहे हे.''

''इथे तुझ्या कुटुंबाचं पोट भरतंय.'' मेत् तिखटपणे म्हणाली.

''घास भरवणाऱ्याच्या हाताचा चावा घ्यायचा नसतो, एवढंही कळत नाही का? खरं तर तुम्ही फ्रेंच मंडळी नीतिशास्त्रात चांगलीच पारंगत असूनही!''

''माहित्येय मला, मी तर दुर्गुणी श्वापदच आहे आणि कदाचित मला गोठ्यात बांधून ठेवलेलंच बरं



चित्र पॉल गोग्यां

ठरेल; पण तरीदेखील ह्या देशाचा एकूण चेहरामोहरा मला हास्यास्पद आणि मूर्खपणाचा वाटतो आणि ते बोलून दाखवणं असभ्यपणाचं असेल तर मी क्षमा मागतो; पण त्यामुळे अशा अयोग्य गोष्टी माझ्या वाट्याला येण्याचं थांबणार आहे का?'' गोग्यां म्हणाला.

''हा माझा देश आहे आणि मी कबूल करते की, मी इथं तुझ्या देशात होते त्याहून अधिक आनंदी आहे. मला निर्दयपणे वागायचं नाही पॉल! तू ह्या वयात एक गोष्ट लक्षात घे की भिकाऱ्यांना निवडीचा अधिकार नसतो.''

''हो, मला माहित्येय आणि पावा वाजवणाऱ्याला पैसे देणारेच त्याने कोणती धून वाजवावी हे सांगतात, हेही माहित्येय. अजून काही म्हणी तुला आठवतात का?'' गोग्यां तिरकसपणे म्हणाला.

ते डॅनिश तरुण गेल्यापासून त्या दोघांनी फ्रेंच भाषेत संभाषण सुरू केलं होतं. पण आता मेत् अचानक डॅनिशमध्ये म्हणाली, ''आता मला जाऊ दे. मला बरंच काम करायचं आहे. शेवटी कोणी तरी थोडे पैसे मिळवायलाच हवेत. तुला लागणारे रंग आणि तंबाखू-शिवाय आपल्याला लागणारं अन्न आणि डोक्यावरचं छप्पर अशा साऱ्या गोष्टी माझ्या आईनं पुरवाव्या अशी अपेक्षा आपण न ठेवलेली बरी. आपण निदान तीळभर तरी अस्मिता ठेवायला हवी.''

''हो, खरंच आहे ते. वाट्टेल ती किंमत देऊन अस्मिता राखायलाच हवी!'' गोग्यां म्हणाला.

''आता आणखीन भांडण उकरून काढू नकोस.'' ती म्हणाली.

ती खोलीतल्या कोपऱ्यात असलेल्या मेजापाशी गेली. गोग्यांही तिच्यापाठोपाठ गेला. हस्तलिखिताचा एक गठ्ठा टिपकागदावर ठेवलेला होता, मेत्च्या तिरप्या हस्ताक्षरात लिहिलेला. त्यातली 'ओ'ची अक्षर रागाने लिहिलेली वाटत होती, जणू कागदावरून उड्या मारण्याच्या तयारीत असलेली. त्याला वाटलं की, लिहितानादेखील ही भाषा बेढब दिसते आहे. एका डॅनिश वृत्तपत्रासाठी मेत् भाषांतरित करीत असलेली फ्रेंच कादंबरी त्याने उचलली.

''झोला!'' तिरस्काराने उच्चारत म्हणाला, ''गटारातली बखर. तू लोरी का नाही भाषांतरित करत? सगळ्यांना शुद्ध करते, फक्त झोलाला अडचणीची वाटते.''

''झोलाला जीवन समजतं.'' मेत् म्हणाली. तो मूर्ख रोमँटिक नाहीय; शिवाय मला झोला भाषांतरित करण्यासाठी पैसे मिळतात, लोरी नव्हे. मी हे स्वतःची करमणूक करण्यासाठी करीत नाही. मी हे रोख पैसे मिळवण्यासाठी करतेय.''

''झोला अल्पसंतुष्ट माणूस आहे. त्याने सेझाँकडे पाठ फिरवली. सेझाँच्या चुका असतीलही; परंतु तो एक महान कलावंत आहे. एक अद्‌भुत गूढवादी. झोलाला चित्रकलेविषयी बिलकूल काही माहिती नाही.''

''चित्रकला.'' मेत् कडवटपणे म्हणाली, ''आतापर्यंत तुला कळलं नाही का मी चित्रकलेला तुच्छ मानते ते? मला त्या शब्दाचीसुद्धा घृणा आहे. मी त्या निर्मितीचीही हेटाळणी करते. मला रंगाच्या वासाचीसुद्धा घृणा वाटते.

''पण ज्या अर्थी तू चित्रकाराशी लग्न केलंयस त्या अर्थी हे तुझं दुर्दैवंच म्हणावं लागेल.'' तो म्हणाला.

मेत्नं मुठी घट्ट आवळल्या.

''तू झोलाकडे उपहासाने बघतोस, कारण तो पैसे कमावतो.'' ती रागाने उद्गारली. ''तू आणि तुझा सेझाँ, तुझे मूल्यवान पिसारो, तुझे माने आणि मोने आणि आणखीन कोणी असतील तेही तू विकायचे नाकारतोस. तुझ्या बायकोनं काय करावं, तुझ्या मुलांनी मदतीवर जगावं पण तू मात्र चित्र काढणं चालूच ठेवणार आणि तुझ्या मित्रांनी बनवलेले घाणेरडे रंगीत तुकडे विकायला नकार देत राहणार, असंच ना?''

एका सरळ पाठ असणाऱ्या खुर्चीत गोग्यां बसला आणि त्यानं पुढे झुकून थेट बायकोच्या डोळ्यांत पाहिलं आणि जेव्हा तो बोलू लागला तेव्हा त्याच्या बोलण्यात तिरकसपणा नव्हता तर एक प्रकारचा सूचक कठोरपणा होता.

''ज्या रंगीत तुकड्यांची तू थट्टा करतेस ते एके दिवशी लुवर्‌मध्ये लावलेले आढळतील.'' तो शांतपणे म्हणाला.

''मला वाटतं तुझ्या डोक्यावर हे कलेचं भूत बसलंय.'' त्याच्याकडे एकटक बघत ती म्हणाली. ''तुला तुझ्या मुलांची मुळीच काळजी नाही. माझीही तुला काळजी नाही.''

''माझं प्रेम आहे तुझ्यावर!'' तो म्हणाला, ''माझं प्रेम आहे माझ्या मुलांवर. पण मला माझ्या मुलांपेक्षा अधिक काहीतरी मागे सोडून जायचंय. तू म्हणतेस की माझ्या डोक्यावर परिणाम झालाय. खरं आहे तुझं म्हणणं. ज्याच्यामुळे तुझ्या आईला मी कृतघ्न वाटत असलो तरी सत्य हे आहे की, त्या कफल्लकपणामुळेच मी दोन वर्षांपूर्वी होतो त्याहून दुप्पट माणूस झालोय.''

''वयाच्या सदतिसाव्या वर्षीही ज्याला आपलं कुटुंब सांभाळता येत नाही अशा माणसाकडून तिनं कशाची अपेक्षा ठेवायला हवी? अपयशी तो अपयशीच! इथे काय किंवा फ्रान्समध्ये काय सोडून दे पॉल, मी भीक मागते तुझ्याकडे, त्यात लाज वाटण्यासारखं काही नाहीय; पण तू अपयशी ठरलायस ह्या गोष्टीचा स्वीकार कर आणि सोडून दे हे.''

''यश किंवा अपयश हे चित्र विकण्यावर अवलंबून नसतं, चित्राची किंमत पैशाने करता येणे शक्य नाही.'' तो म्हणाला.

''आता तरी तू वस्तुस्थितीचा स्वीकार कर.'' ती म्हणाली. ''यशाची आशा आता नाही, पुढल्या वर्षीही नाही, त्यानंतरच्या वर्षीही नाही आणि दहा वर्षांनीसुद्धा नाही. तिनं एका जाड कागदावर लिहिलेलं पत्र आपल्या मेजावरून उचललं. त्या लेटरवर वरती सोनेरी शिक्का होता. म्हणाली, ''वाच हे, एरनानं निर्णय घेतलाय की यापुढे एमिलची शाळेची फी ती देणार नाही. त्याला घरी परतावे लागणार आहे.''

एरना म्हणजे मालथेची काऊंटेस. मेत्‌ची एक श्रीमंत नातेवाईक.

''तिचा विचार का बदलला? मुळात ही तिचीच तर कल्पना होती.'' गोग्यां म्हणाला.

''तू कॅथलिक असणं ही कल्पना तिला सुरुवातीपासूनच पूर्णपणे आवडली नव्हती आणि तिला शोध लागलाय की, तू कॅथलिक नाहीस, तर एक नास्तिक आहेस म्हणून.''

''धर्माचा ह्या गोष्टीशी काय संबंध आहे?'' गोग्यानं विचारलं, ''मी एक स्वतंत्र विचाराचा माणूस आहे म्हणून काय त्यामुळे एमिल राक्षस ठरतो?''

''इथे डेन्मार्कमध्ये धर्म ही एक गंभीर बाब आहे.'' ती म्हणाली, ''आपण जेव्हा प्रथम इथे आलो त्या वेळी मी तुला म्हणाले होते, की वरकरणी तरी तू आमच्याबरोबर चर्चमध्ये ये.''

''मी जर चर्चमध्ये परत आलो तर मी पुन्हा रोमच्या कचाट्यात सापडेन!'' गोग्यां म्हणाला. ''लुथर मला कधीच आवडला नाही. तो मला पॅरिसच्या बूरसमधल्या अनेक दलालांसारखा वाटतो.''

"आक्रमक वागल्याने काही साधणार नाही." मेत् आपला हक्क बजावत म्हणाली.

"बरोबर आहे तुझं!" तो संमती दर्शवत म्हणाला. "चल आपण दोघंही आपापल्या परीने त्याच्या आत्म्याचं रक्षण करू." त्यानं स्वतःचं डोकं खाली झुकवलं आणि स्वतःशीच बोलू लागला. "आता एमिल घरात असणं म्हणजे कुटुंबात भडका होणारं इंधनच पडण्यासारखं ठरणार; शिवाय तो शाळेत आनंदात होता. त्याला डेन मुलं आवडली होती. तो जिथे आनंदी आहे तिथे त्यानं राहावं हा त्याचा हक्क आहे."

"एमिल शाळेत राहणार!" त्यानं सरतेशेवटी डोकं वर करून सांगितलं. "नौदलांकडून मला चेक मिळालाय, यार्डासाठी शीपने कपडे पाठवल्याबद्दल. त्या चेकमधला बराचसा आर्थिक भाग माझाच आहे. माझी दलाली म्हणून. तेव्हा तो रोवॅंला पाठविण्याची काही गरज नाही. मी तो उद्या वटवतो आणि शाळेत पैसे पाठवतो."

"हे बऱ्यापैकी नियमबाह्य नाही का?" मेत्नं विचारलं.

"मुळीच नाही!" तो म्हणाला. "मी दिलिज्ना पत्राने कळवतो की मी कशा प्रकारे व्यवस्था केलीय ते, नाही तरी त्याच्याकडून मला पैसे येणं आहेच."

खरं म्हणजे स्वतःला पैसे मिळाल्याचं दिलिज्ना कळवायचं त्याच्या मनात नव्हतं. फ्रेंच सरकारबरोबर काम करण्याचा त्याला चांगला अनुभव होता. सरकारकडून पैसे फार सावकाशीने मिळत. त्यांनी जर पैशांची विचारणा केली तर तो काही तरी सबब सांगू शकेल झालं. शेवटी जेव्हा त्याच्याकडे पैसे असतील तेव्हा तो हिशेब चुकता करील. परकीय दलालांचा अशा प्रकारे नियम मोडून वागण्याचा खाक्याच होता, मेत् म्हणाली तसा. पण ते विश्वासघात मात्र करत नव्हते.

"मग काय, झालं तुझं समाधान?" त्यानं विचारलं.

"एमिलला आनंद होईल." त्याला अपेक्षित असलेली समाधानाची छटा चेहऱ्यावर न दाखवता ती म्हणाली.

त्यानं विचार केला, तिला असं वाटतं की सिद्धान्ताची बाब निघाली की तो असा तोंडघशी पडेल. जसं पाण्याला पार तळाशी गेल्यानंतर परत पृष्ठभागावर येण्याशिवाय गत्यंतर नसतं तसं! पण ती चुकतेय, जर मी तळाशी गेलो तर तिथंच राहीन आणि अशा ठिकाणी राहून आनंदी राहणाऱ्या लोकांप्रमाणे मीही माझ्या आवडीचा जीवनमार्ग तयार करीन.

"मला लवकरच आणखीन पैसे मिळणार आहेत." तो म्हणाला. "आर्ट क्लब मला 'वन मॅन शो' देत आहे. शक्यता आहे की, थोड्याफार डॅनिश चित्रसंग्राहकांना चांगली गोष्ट कोणती ते माझा 'शो' पाहिल्यानंतर कळेल आणि ते एखादुसरं चित्र विकत घेतील."

"आर्ट क्लबमध्ये कशाला दाखवतोस?" तिनं विचारलं, "कोपनहेगेनमध्ये काही चांगले व्यापारी आहेत. तुला असल्या कलावंत नसलेल्या बाजारबुणग्यांशी कशाला संबंध ठेवायला हवेत?"

"एखाद्या माणसानं असभ्य पद्धतीनं दाढी वाढवली असेल तर त्याचा अर्थ असा नाही की, त्याच्या खिशात बॉंब असेल!" गोग्यां म्हणाला. "मला नाही वाटत आर्ट क्लबमधला कोणी बेबंदशाहीची संवेदनशील व्याख्या करू शकेल. शिवाय, नॅशनल गॅलरीमधून मला कोणी प्रदर्शनासाठी विचारलेलंही नाही."

बैठकीमधल्या घड्याळात तास झाल्याची घंटा वाजली. मेत्नं आपलं पेन उचललं आणि त्याची नीब आपल्या अंगठ्यानं तपासून बघितली.

"मला आता माझं काम करायलाच हवं, हा चॅप्टर उद्या सकाळी छापून यायचाय." ती म्हणाली.

तो तिचा मुका घेण्यासाठी खाली वाकला; पण ती वळल्यामुळे तिच्या मानेजवळच त्याच्या ओठांचा पुसटसा स्पर्श झाला. एक हलकासा गंध तिच्या केसांत होता, ज्याच्यामुळे तो थोडासा कामनावश झाला. तो तिच्या शेजारी क्षणभर उभा राहिला आणि मग दूर झाला. बैठकीच्या खोलीत पोहचण्यापूर्वीच त्यानं तिच्या पेनचा कागद पार करून जाणारा आक्रमक आवाज ऐकला. त्याला वाटलं की, जणू एखाद्या शाळकरी मुलाला शाळेतून काढून टाकलंय.

• • •

(संपर्क : प्रभाकर कोलते : prabhakarkolte@hotmail.com)

अनुक्रमणिका

कथा

दहा सूक्ष्म कथा आणि एक टिपण

निखिलेश चित्रे

एक

हिवाळ्यातल्या एका गारढोण रात्री आपल्याविषयी प्रजेचं मत जाणून घेण्यासाठी राजा व्यापाऱ्याचा वेष घेऊन बाहेर पडला. धुकाळ चंद्रप्रकाशात तो एका कळकट झोपडपट्टीतल्या खानावळीत उतरला. तिथे शेकोटीच्या उबेच्या वर्तुळात अर्धवट उजळलेले सुकलेले चेहरे गोठवणाऱ्या थंडीचा कसाबसा प्रतिकार करत गप्पा मारत होते. बेमालूम वेषांतर केलेला राजा त्यांच्यात सहज मिसळला. गप्पांमध्ये राजकारणाचा विषय निघताच त्यानं 'आपल्या राजाविषयी मत काय?' असा प्रश्न निरागस सहजतेनं विचारला. त्याचा प्रश्न पूर्ण होण्याच्या आतच सगळे चेहरे संतापून लाल झाले. राजाच्या नावानं शिव्याशापांची बरसात सुरू झाली. तो राग संसर्गजन्य होता. व्यापाऱ्याच्या वेषातल्या राजानंही मग सरकारवर टीकेची झोड उठवली. जळजळीत शब्दांत राज्यकारभारातल्या अन्यायावर नेमकं बोट ठेवलं. बराच वेळ तिथे काढल्यावर मध्यरात्री उशिरा तो राजवाड्यात परतला.

पहाटे उठल्यावर त्याला रात्रीचा प्रसंग आठवला. राजावर टीका करणाऱ्या त्या लोकांविषयी मनात संतापाची लाट उसळली. राज्याची जबाबदारी सांभाळणं किती अवघड आहे हे माहीत नसणाऱ्या सामान्य जनतेच्या अनभिज्ञतेची त्यानं कीव केली आणि आन्हिकं आटपून तो दरबाराकडे रवाना झाला.

दुसऱ्या दिवशी रात्री तो पुन्हा व्यापाऱ्याच्या वेषात त्या खानावळीत गेला. या वेळी लोक आधीपासूनच राज्यकारभारातल्या गैरप्रकारांविषयी बोलत होते. भ्रष्ट अधिकारी, माजोरडे मंत्री, अवाजवी कर, राजाचा मनमानी कारभार, दडपशाही याविषयी प्रत्येकजण संतापून बोलत होता. त्याला लोकांचं म्हणणं पटलं. त्यातल्या सच्च्या संतापाची धग जाणवली. तोही त्यांच्याशी सहमत होऊन राजाच्या दोषांवर टीका करायला लागला.

काही महिन्यांनंतर त्या व्यापाऱ्यानं असंतुष्ट नागरिकांना एकत्र आणून राजाविरुद्ध बंड पुकारलं. त्याचं चातुर्य, निर्णयक्षमता आणि युद्धकौशल्य यामुळे तो अल्पावधीतच बंडखोरांचा लाडका नेता बनला; पण बंडखोरांचा प्रत्येक उठाव राजानं आपल्या सैन्यबळाचा वापर करून चिरडून टाकला.

हा संघर्ष अनेक वर्षं चालला. एके दिवशी व्यापारी राजाला फितूर असावा अशी बातमी कुणी तरी आणली. ती वणव्यासारखी पसरली. तिथे राजवाड्यात राजपुत्रानं मंत्र्यांना राजाविरुद्ध एकत्र आणायला सुरुवात केली. लवकरच बंडखोरांनी त्या खानावळीतच व्यापाऱ्याच्या छातीत खंजीर खुपसून त्याला ठार मारलं. नेमक्या त्याच वेळी राजवाड्यात काही अज्ञात मारेकऱ्यांनी राजाचा खून केला.

दुसऱ्या दिवशी राजपुत्र गादीवर बसला आणि त्यानं महिनाभरात बंडाळी मोडून काढली.

• • •

दोन

गोळी पुस्तकाच्या फडफडणाऱ्या पानांतून आरपार गेली आणि त्याच्या डोक्यात शिरली. त्याच्या हातातून पुस्तक टेबलावर पडलं आणि तो तत्काळ कोसळला. मरण्यापूर्वी वाचलेल्या कथेतल्या खुनी पात्राची प्रतिज्ञा त्याला आठवून गेली. त्या पात्रानं म्हटलं होतं, की मी खून केला आहे हे ज्याला कळेल त्याला मी गोळी घालीन.

• • •

तीन

चाळिशी ओलांडल्यावर मी महाकादंबरी लिहायला घेतली. तशी मला लेखक म्हणून थोडीफार ओळख मिळालेली आहे. एक कथासंग्रह, एक लेखसंग्रह आणि दोन कवितासंग्रह माझ्या नावावर आहेत. माझ्या कवितासंग्रहाला राज्य शासनाचा पुरस्कारही मिळालेला आहे; पण मराठीत लेखक म्हणून ठसा उमटवायचा असेल तर कादंबरीला पर्याय नाही हे मला चांगलं उमजलेलं आहे. म्हणून मी द्विखंडात्मक कादंबरी लिहायला घेतली. त्यासाठी वर्षभर मी नोट्स वगैरे काढून ठेवल्या. थोडाफार अभ्यासही केला. ही कादंबरी बृहत्कथेचा कर्ता गुणाढ्याच्या आयुष्यावर होती. म्हणजे त्यात दोन कथानकं समांतर जातात. एक गुणाढ्याचं. दुसऱ्या शतकातलं. दुसरं आजच्या काळातल्या एका लेखकाचं. गुणाढ्याचं बालपण, त्याचं त्या काळच्या संस्कृत आणि प्राकृत भाषांवर असलेलं प्रभुत्व, राजानं केलेला गुणाढ्याचा अपमान, त्यानं संस्कृत भाषेवर टाकलेला बहिष्कार आणि बहुजनाच्या पैशाची भाषेत केलेली बृहत्कथेची रचना आणि आगीत नष्ट केलेले बृहत्कथेचे सहा लाख श्लोक– हे सगळं विषम क्रमांकांच्या प्रकरणांतून येतं, तर सम क्रमांकांच्या प्रकरणांतून आजच्या काळातल्या लेखकाची कादंबरी लिहायची धडपड, त्याचं विविध प्रकारे कादंबरी लिहून पाहणं आणि सोडून देणं, मग शेवटच्या प्रकरणात तो अचानक काळात मागे फेकला जाऊन त्याची आणि गुणाढ्याची भेट – अशी कादंबरीची ढोबळ रचना होती. मी दोन वर्षं बाकी सगळी कामं बाजूला ठेवून ही कादंबरी पूर्ण केली. म्हणजे दोन्ही खंड पूर्ण केले. साधारण पाचेकशे पानांचे. मग मी ती कादंबरी प्रकाशकाला पाठवली. त्यानं महिनाभरात मला फोन केला. त्याला कादंबरी आवडली होती. पण त्याला एवढी मोठी कादंबरी छापणं शक्य नव्हतं. त्यानं मला ती एका खंडात बसवायला सांगितली. मला त्याची सूचना पटली. मी लगेच कामाला लागलो. कादंबरीतील सगळी उपकथानकं छाटून टाकली. अनावश्यक पात्रं कमी केली. शेवटी चारशे पानांत कादंबरी पूर्ण झाली; पण तरीही माझं समाधान होईना. मी आणखी काटछाट केली. गुणाढ्याचं कथानक कमी केलं. शेवट बदलला. आता ती शंभर पानांची छोटी, सुटसुटीत कादंबरिका झाली. पुन्हा वाचताना मला त्यात अनेक अनावश्यक जागा दिसायला लागल्या. मग मी ती आणखी छाटून तिची तीस पानांची दीर्घकथा केली. आता त्यात फक्त लेखकाला कादंबरी न सुचण्याची गोष्ट उरली; पण माझं समाधान होईना. मी आणखी तासून तिची पानभराची सूक्ष्मकथा केली. ती मी पुन्हा पुन्हा वाचली. मग मला वाटलं, आजकाल सगळे आपापल्या आयुष्याला एवढे विटलेले असताना कादंबरी न सुचणाऱ्या लेखकाची गोष्ट वाचायला कोणाला वेळ आहे? अशी गोष्ट लिहिण्याची मुळात गरजच काय? माझी कादंबरी मुळातच चुकली होती. ती नष्ट करण्याशिवाय पर्याय नव्हता.

मी डिलीटचं बटण दाबलं आणि माझ्या डोळ्यांसमोर माझी सूक्ष्मकथा, माझ्या कादंबरीचा उर्वरित अंश झरझर डिजिटल शून्यात विरत जाऊन नाहीसा झाला. माझ्यासमोर वर्डचं कोरं इलेक्ट्रॉनिक पान उरलं. जसे सगळे तारे एकसारखे नसतात, जसे वाळूचे सगळे कण एकसारखे नसतात, तशीच सगळी कोरी पानंही सारखी नसतात. माझं कोरं पान फक्त माझं आहे; कारण हजार पानांच्या कादंबरीला जन्म देण्याचे कष्ट मी भोगले आहेत. त्यातून तिची कादंबरी होताना, कादंबरीची कथा आणि कथेची सूक्ष्मकथा होईपर्यंतचा प्रवास अनुभवला आहे. शेवटी ती नाहीशी झाल्यावर उरलेलं सुंदर, राजस, अपराजित कोरं पान मी पाहतो आहे. ही लेखक म्हणून माझी आजवरची सर्वोच्च निर्मिती आहे.

• • •

चार

गढी तशी जवळच आहे; पण ती सहज दिसत नाही. तिथे पोहचण्यासाठी झोपेतून रस्ता जातो. तोही प्रत्येक वेळी दिसेलच याची खात्री नसते. कधी तरी झोपेचा काठ जाणिवेच्या पृष्ठभागाला स्पर्श करण्याच्या बेतात असताना अचानक गढीकडे जायचा रस्ता उघडतो. त्यावरून खूप काळजीपूर्वक तोल सांभाळत जावं लागतं; कारण रस्त्याच्या दोन्ही बाजूंना तुमचा घास घ्यायला टपलेली अदृश्य दरी आहे.

गढी लांबून लहान वाटते; पण आत प्रवेश केला की तिच्या विराट भव्यतेची कल्पना येते. दिवाणखान्याच्या चारी बाजूंना अनेक दिशांना उघडणाऱ्या वाटा फुटतात. प्रत्येक ठिकाणी वर जाणारे चक्राकार जिने आणि जिन्यांच्या सभोवती एकसारख्या दारांच्या अनेक खोल्या आहेत. एका जिन्यानं तुम्ही खाली उतरलात तर कायम उतरत राहता, तो अनंत आहे. एका खोलीत पाय टाकताना जरा सांभाळून. तिथे आत गेल्यावर आपण खालीच खाली कोसळत जातो. ही कोसळण थांबतच नाही. एका खोलीतून सतत कुजबूज ऐकू येते; पण दिसत कुणीच नाही. एका खोलीत काळ गोठलेला आहे. तिथे गेलं की बाहेर पडणं अशक्य. एका खोलीत सतत आंधळे पक्षी फडफडत असतात. आणखी एका खोलीत अख्खा समुद्रच हेलकावताना दिसतो.

ती गढी धोकादायक आहे; कारण तिथून बाहेर निघण्यासाठी झोपेतून जागं व्हावं लागतं आणि बऱ्याच जणांना ते जमत नाही. हे लोक तुम्हाला रोज तुमच्या अवतीभवती दिसतात तेव्हा तुम्हाला आणि त्यांनाही ते जागे आहेत असंच वाटतं.

• • •

पाच

तो समुद्राकाठी फिरायला गेला असताना एक छोटी काळी बाटली लाटांवरून हेलकावत त्याच्या पायाशी येऊन पडली. त्यानं कुतूहलानं ती उचलली. खाली काचेचा गोल, वर लांबट नळीसारखी मान. बाटलीच्या तोंडावर बूच. प्रयत्न करूनही आत काय आहे ते दिसलं नाही. काच अगदी गडद काळी होती. प्रकाश शोषून घेतल्यासारखी. लहानपणी वाचलेल्या गोष्टींच्या पुस्तकात त्यानं तशा बाटल्यांची चित्रं पाहिली होती. त्यात अशा बाटलीत बहुधा एखादा जिन्न किंवा राक्षस असायचा. त्यानं गमतीनं बूच बोटांनी खेचून उघडण्याचा प्रयत्न केला; पण ते जाम उघडेना. त्यानं सभोवती पाहिलं. काही अंतरावर एक माशाचा काटा पडलेला दिसला. त्यानं तो उचलून बुचाच्या एका बाजूला घुसवला आणि जोर लावून ते उचकटण्याचा प्रयत्न केला. ते घट्ट बसलं होतं. त्यानं काटा जास्त आत ढकलून मनगटाचा जोर लावला. हळूहळू बूच ढिलं झालं. त्यानं आणखी जोरात ते वर ढकललं. 'फच्च' आवाज करून बूच वर उडालं आणि वाळूत पडून गरगरत राहिलं. तेवढ्यात बाटलीतून खोल श्वास घेतल्यासारखा आवाज आला. त्यानं दचकून बाटली टाकून दिली. आवाज वाढत गेला. सरसराट वारा सुटला आणि बाटलीत घुसला. वारा वाढत गेला. त्याचं झों झों आवाज करणारं वादळ झालं. त्यानं सभोवतीचं सगळं बाटलीत खेचायला सुरुवात केली. आधी वाळू, पाचोळा, प्लास्टिकच्या पिशव्या गेल्या. मग माणसं हेलपाटल्यासारखी उडून सटकन बाटलीत नाहीशी झाली. तोसुद्धा त्यात होता. बाटलीची खेच वाढत गेली तशा इमारती, झाडं, प्राणी न् बाकीचं सगळं बाटलीनं आत ओढून घेतलं. मग समुद्रही पाळीव प्राण्यासारखा निमूटपणे बाटलीत गडप झाला. त्या बाटलीनं अख्खी पृथ्वीच शोषून घेतली. पाठोपाठ सूर्यमाला, आकाशगंगा, दीर्घिका, ग्रह, तारे, सगळं ब्रह्मांड बाटलीच्या पोटातल्या अनंत अंधारात शोषलं गेलं. शेवटी बाटलीनं काळही गपकन गिळून टाकला आणि ती स्वतःत विलीन होऊन निव्वळ काळं सर्वव्यापी शून्य स्वतःत मिटून निखळ उरलं.

• • •

अनुक्रमणिका

सहा

बघता बघता त्याचं घर सूक्ष्मकथांनी भरून गेलं. त्या झपाट्यानं वाढत गेल्या. हॉल, बेडरूम, किचन, बाथरूम, टॉयलेट - त्यांनी मिळेल ती जागा व्यापली. त्याचं पुस्तकांचं कपाट तर सूक्ष्मकथांनी झाकून टाकलं. त्यानं खूप सापळे लावले. विष घातलं. पण काही उपयोग झाला नाही. शेवटी कंटाळून त्यानं घर बदललं. आता पुस्तकं सुरक्षित आहेत असं समजून तो निवांत आहे; पण नव्या घराला चारी बाजूंनी सूक्ष्मकथांनी वेढा दिलाय हे त्याला माहीत नाही. त्याहून धोकादायक असलेल्या अनेक सूक्ष्मकथा त्याच्या लॅपटॉपमध्ये लपून बसल्यात हे त्याला अजून कळायचं आहे.

• • •

सात

रात्री कसल्याशा आवाजानं रखवालदाराची झोप मोडली. तो डोळे चोळत उठून बसला. त्यानं कान देऊन ऐकलं. शस्त्रं ज्या खोलीत ठेवली होती तिथूनच आवाज येत होते. अगदी अस्पष्ट. सावधपणे हालचाल केल्यासारखे. रखवालदार सावध झाला. त्यानं हातातली बंदूक सरसावली आणि तो शस्त्रांच्या खोलीकडे निघाला. खिडकी बंद होती. त्यानं पुन्हा कान देऊन ऐकलं. तसेच दबल्या हालचालींचे आवाज. त्यानं खिडकीच्या फटीतून एक डोळा बारीक करून पाहिलं. आतली शस्त्रं स्वतःहून हालचाल करत होती. सुरे वापरले जाण्यासाठी उतावीळ झाल्यासारखे एकमेकांवर घासले जात होते. तलवारींच्या मुठी अदृश्य हातांनी धरल्यासारख्या हलत होत्या. बंदुकी हवेत स्थिर राहून भक्ष्य शोधल्यासारख्या नळ्या हलवून सभोवताली बघत होत्या. अचानक एका बंदुकीचं लक्ष त्या खिडकीकडे गेलं आणि ठापकन् गोळी सुटली.

• • •

आठ

टोळीयुद्ध ऐन भरात असताना एका बड्या टोळीच्या प्रमुखाला स्वप्न पडलं. दुसऱ्या छोट्या टोळीचा प्रमुख त्याच्या घरी आला. त्यानं सपशेल शरणागती पत्करली. तो म्हणाला, 'भाई, मला वाचवा. उद्या तुमचा भाऊ मला गोळी घालणार आहे.' त्याची अवस्था बघून भाईचं काळीज द्रवलं. त्यानं त्याच्या कुलदैवताची शपथ घेतली आणि छोट्या टोळीच्या प्रमुखाला अभय दिलं. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर भाईला त्याचं स्वप्न लख्ख आठवलं. पहाटेच्या स्वप्नांवर त्याचा जाम विश्वास. त्यानं दिलेला शब्द पाळायचं ठरवलं. भावाला बुद्धिबळ खूप आवडायचं. तो भावाशी बुद्धिबळ खेळत बसला. त्यानं दुपारपर्यंत भावाला खेळात गुंतवलं. दोघंही खेळात एवढे रंगून गेले की त्यांना जेवायचीही शुद्ध राहिली नाही. शेवटी भाऊ थकून झोपला. थोड्या वेळानं भाईची माणसं छोट्या टोळीच्या प्रमुखाचं प्रेत घेऊन आली. त्याला चकमकीत मारल्याचं ते म्हणाले. भाई बघत राहिला. तेवढ्यात त्याचा भाऊ झोपेतून उठून तिथे आला. छोट्या टोळीच्या प्रमुखाचं प्रेत बघून तो म्हणाला, 'कमाल आहे. मी याला गोळी घातलीय असं मला आताच स्वप्न पडलं.'

• • •

अनुक्रमणिका

नऊ

कामानिमित्त परगावी गेला असताना त्याला अपघात झाला. त्यात त्याची स्मृती तर गेलीच; शिवाय आधार कार्ड, पॅन कार्ड वगैरे ओळख पटवणारी सगळी कागदपत्रं जळून खाक झाली. बरेच दिवस तो अपरिचित शहरात वणवण भटकला. तो तिथे फुटपाथवर झोपायचा. भीक मागून मिळेल ते खायचा. एके दिवशी त्याला अचानक स्वप्नात एक ओळखीचं शहर दिसलं. त्यात काही परिचित वाटणारी माणसं होती आणि एक मोबाईल नंबर कागदावर लिहिलेला होता. जाग आल्यावर त्याला तो नंबर लख्ख आठवला. त्यानं कुठून तरी त्या नंबरवर कॉल करण्यात यश मिळवलं. पलीकडून एका बाईचा आवाज आला. त्याचा आवाज ऐकल्यावर तिला रडू कोसळलं. आपला नवरा जिवंत आहे हे ऐकून तिला फार आनंद झाला. ती दुसऱ्याच दिवशी त्याला घरी घेऊन आली. घरी येताच मुलं त्याला बिलगली. त्याची स्मृती परत आली नाही. मात्र तो आपल्या कुटुंबासह आनंदात राहू लागला. अशीच काही वर्षं गेली. एक दिवस त्याला अचानक जाग आली. सगळं लख्ख आठवलं. त्याचं घर, त्याचं गाव, आईवडील, बायको, मुलं. सगळंच. त्यानं मान वळवून शेजारी झोपलेल्या बाईकडे पाहिलं. ती कोण आहे ते मात्र त्याला कळेना.

• • •

दहा

स्वप्नात मी एका विशाल वास्तूसमोर उभा होतो. बहुतेक राजवाडा किंवा महाल असावा. माझ्या सभोवती मानवाकार धातूंच्या मूर्ती होत्या. मला शिल्पकलेतलं फारसं काही कळत नसलं, तरी त्या एखाद्या प्रतिभावंत शिल्पकारानं जीव ओतून निर्माण केल्या आहेत हे जाणवत होतं. सर्वत्र प्राचीन, खूप दूरच्या भूतकाळातलं काही तरी व्यापून राहिल्याची तीव्र जाणीव. तिथे येणारे वासही अपरिचित. अज्ञात. राजवाड्यासमोर एक प्रवेशद्वार. साधारण तीसेक फुटांचं. मागे सोन्याची झळझळीत कमान. मी दरवाजाजवळ गेलो. तिथे धातूचं शिरस्त्राण घातलेला सैनिक होता. त्याच्या हातात एक लांब भाला. तो भाला सरळ धरून ताठ उभा होता. मी जवळ गेल्यावर त्यानं माझ्याकडे मोहर मागितली. तो कोणत्या भाषेत बोलला ते मात्र मला आठवत नाही. मी त्याला नकारार्थी खूण केली. आत सोडण्याची विनवणी केली. पण त्यानं मला आत जाऊ दिलं नाही. मी बराच वेळ प्रवेशद्वाराबाहेर त्या निश्चल रखवालदारासमोर उभा राहिलो. मग अचानक जाग आली. हे स्वप्न मला रोजच पडायला लागलं. प्रत्येक वेळी मी मोहर नसल्यामुळे प्रवेशद्वाराबाहेरच उभा राहायचो. एकदा मी सकाळी बायकोला हे स्वप्न सांगितलं. ती हसली. 'आज झोपताना खिशात एक रुपया ठेवून झोप.' ती गमतीनं म्हणाली आणि निघून गेली. मी झोपताना खरंच माझ्या ट्रॅक पँटच्या खिशात रुपयाचं नाणं ठेवलं. त्या दिवशी त्या रखवालदारानं माझ्याकडे मोहर मागितल्यावर मी त्याच्या हातावर ते रुपयाचं नाणं ठेवलं. त्यानं तो प्रचंड दरवाजा उघडला. मी आत गेलो. राजवाडा खूपच मोठा होता. गंमत म्हणजे आत माझ्याशिवाय कुणीच नव्हतं. मी सगळी दालनं सावकाश पाहिली. ती पाहताना मला सारखं आधी तिथे येऊन गेल्यासारखं वाटत होतं. फिरून फिरून पाय दुखले. प्रकाश मळकट झाला तेव्हा संध्याकाळ झाल्याचं जाणवलं. मी बाहेर आलो. दरवाजा बंद होता. आता रखवालदार आतल्या बाजूला दरवाजाकडे पाठ करून ताठ उभा. मी त्याला दरवाजा उघडायला सांगितलं. तो पुढे आला. त्यानं माझ्याकडे पुन्हा मोहर मागितली आणि हात पुढे केला. त्यानं रागावून माझ्यावर शस्त्र उगारलं. मोहर देईपर्यंत बाहेर जाता येणार नाही, असं सांगून तो बाजूला झाला. आता मी जाग येण्याची वाट पाहात दरवाजासमोर कधीचा उभा आहे; पण जाग काही येत नाही.

• • •

सूक्ष्म कथेबाबत टिपण : निखिलेश चित्रे

जागतिक वाङ्मयात सूक्ष्मकथांना प्रदीर्घ परंपरा आहे. महाभारत, बायबल, कुराण, पंचतंत्र, जातककथा, एक हजार एक रात्री, कथासरित्सागर, जैन कथाग्रंथ, तिलिस्म-ए-होशरुबा अशा अनेक प्राचीन आणि मध्ययुगीन ग्रंथांमध्ये सूक्ष्मकथा आढळतात. आधुनिक काळात चेखव, काफ्का, बेकेटपासून हुलियो कोर्तासार, इशत्वान ओर्केन्य, जॉर्जिओ मान्गानेली, ऑगुस्तो मोन्तेरोस्सो अशा अनेक समर्थ लेखकांनी अप्रतिम सूक्ष्मकथा लिहिल्या आहेत. हिंदीत देवीप्रसाद मिश्र यांच्या गद्यकविता सूक्ष्मकथेचंच रूप आहेत. उर्दूत इंतजार हुसैन यांनी प्राचीन आख्यानांचं समकालीन सूक्ष्मकथांमध्ये केलेलं रूपांतर जागतिक पातळीवर वाखाणलं गेलं आहे.

सूक्ष्मकथेमध्ये लघुतावादी (Minimalistic) कथनाविष्काराला महत्त्व आहे. त्यात भाषेचा नेमकेपणा आणि संरचनेचा आटीवपणा केंद्रस्थानी असतो. भाषिक साधनं आटवून आशयाचं स्फटिकीकरण साध्य करण्याची ही तारेवरची कसरत अतिशय अवघड असते. गेल्या दशकभरापासून मराठी कथेत विस्तारवादाला अनाठायी महत्त्व प्राप्त झालेलं दिसतं. कथा जेवढी लहान तेवढी कमअस्सल आणि जेवढी दीर्घ तेवढी महत्त्वपूर्ण असा समज मराठीत दृढ आहे. त्यामुळे समकालीन राष्ट्रीय आणि जागतिक वाङ्मयात सूक्ष्मकथेला दीर्घकथेच्या बरोबरीनं प्रतिष्ठा असली, तरी मराठी कथेत मात्र लघुतावाद त्याज्य मानला जातो. जयंत पवारांनी 'लेखकाचा मृत्यू'मध्ये या समजाला छेद देऊन काही महत्त्वाच्या सूक्ष्मकथा लिहिल्या आहेत; पण तो सन्माननीय अपवाद. सूक्ष्मकथेमध्ये लेखकाची कल्पनाशक्ती आणि भाषेवरचा ताबा पणाला लागतो. चिमुकल्या अवकाशात निवेदनाचे विविध प्रकार हाताळता येतात. अर्थाचे विविध स्तर निर्माण करता येतात. सूक्ष्मकथेचं गद्य कवितेची सरहद्द सहज ओलांडून जाऊ शकतं. या लवचीकतेमुळेच सूक्ष्मकथेला मुद्दाम समकालीन राहण्याचा हट्ट करावा लागत नाही.

• • •

(इ-मेल : satantangobela@gmail.com
भ्रमणभाष : ९८१९१००१७६)

अनुक्रमणिका

कवितांतर

युगवाणी

अलेक्सांद्र पूश्किनच्या कविता

अनुवाद आणि टिपण : मेघा पानसरे

१९वे शतक हे रशियन साहित्याचं सुवर्णयुग मानलं जातं. रशियाच्या इतिहासातील हा काळ म्हणजे जागतिक इतिहासातील कलात्मक निर्मितीच्या सुवर्णकाळासारखा होता. याच काळात अलेक्सांद्र पूश्किन (१७९९-१८३७) हा महान कवी होऊन गेला. या प्रतिभासंपन्न कवीच्या विपुल, आशयघन, सौंदर्यात्मक मूल्य असलेल्या वैविध्यपूर्ण रचनांमुळे रशियन साहित्याचा सर्वांत समृद्ध कालखंडात प्रवेश झाला. स्वच्छंदतावादाच्या काही प्रमुख अवस्थांत सहभाग घेतल्यानंतर सर्जनशील जीवनाच्या उत्तरार्धात पूश्किन वास्तववादाकडे वळला. गेय कविता, कथनात्मक कविता, काव्यरूपातील कादंबरी, गद्य कादंबरी, दीर्घकथा, लघुकथा, नाटक, समीक्षात्मक निबंध आणि व्यक्तिगत पत्र असे सर्वच साहित्यप्रकार त्याने हाताळले. म्हणूनच पूश्किनला रशियन साहित्यिक भाषेचा जनक मानतात.

समृद्ध रशियन भाषेवर पराकोटीचं प्रेम, रशियन लोकसाहित्य व लोकगीताचं सखोल ज्ञान, तीक्ष्ण बुद्धिमत्ता, उच्च प्रतिभा, काव्याप्रती समर्पितता, वास्तववादी विचार आणि ऐतिहासिक व राजकीय अंत ही पूश्किनची वैशिष्ट्ये सांगता येतील. स्वातंत्र्याप्रती उत्स्फूर्त व स्वच्छंदी प्रेम आणि 'डिसेंब्रीस्ट' विद्रोही कवींशी संबंध यामुळे तत्कालीन त्सारनिकलाइ (पहिला) याच्याशी त्याचा सातत्यानं संघर्ष होत राहिला. परिणामी त्याने दीर्घ काल हद्दपारीची शिक्षा भोगली. त्याचा उदारमतवादी राजकीय दृष्टिकोन आणि रशियन विद्रोही युवकांच्या अनेक पिढ्यांवर टिकून राहिलेला प्रभाव याची जाणीव ठेवून बोल्शेविकांनी पूश्किनची 'बूर्झ्वा साहित्य-संस्कृती विरोधी लेखक' अशी प्रतिमा ठळकपणे मांडली आणि त्याला सोविएत साहित्य व



काव्याचा पूर्वज म्हणून जाहीर केले.

पूश्किनने साधारण ८०० पेक्षा जास्त कविता लिहिल्या. त्यात बहुसंख्य प्रेमकविता आहेत. अत्यंत गहिरा अर्थ आणि प्रेमभावनांनी ओतप्रोत भरलेल्या त्याच्या कित्येक कविता रशियन लोकांना तोंडपाठ असतात. 'माझं तुमच्यावर प्रेम होतं...' ही त्याची एक प्रसिद्ध कविता आहे.

माझं तुमच्यावर प्रेम होतं

माझं तुमच्यावर प्रेम होतं : हे प्रेम, कदाचित,
माझ्या हृदयातून पूर्णतः विझून गेलं नाही;
परंतु ते तुम्हाला आणखी त्रास न देवो,
मला तुम्हाला कशानेच दुःखी करायचं नाही...
मी तुमच्यावर मूकपणे
निरपेक्षपणे प्रेम करत राहिलो.

कधी संकोचून तर कधी ईर्ष्येने पेटून;
मी तुमच्यावर किती मनापासून,
किती हळुवारपणे प्रेम करत होतो
ईश्वर करो, तुम्ही माझ्याइतक्याच
दुसऱ्या कोणास प्रिय व्हाल. (१८२९)

१८२५ मध्ये लिहिलेली ही प्रेमपत्ररूपातील कविता रशियन प्रेमकाव्याचा एक अतुलनीय उत्कृष्ट नमुना मानली जाते. कमालीचा प्रामाणिकपणा, साधेपणा आणि आत्मिक उदात्तता ही त्याची मुख्य वैशिष्ट्ये वाचकांना आजही प्रभावित करतात. कवी आणि कवितेचा नायक हे एकच असल्याचे स्पष्ट होते. या कवितेच्या नायकात पूश्किनने त्याच्या जीवनानुभवाचा एक अंश वस्तुनिष्ठपणे व्यक्त केला आहे. त्याने आन्ना अल्येनिना हिला ती अर्पण केली होती, असे मानले जाते. प्रथमपुरुषी निवेदन करताना कवितेचा नायक प्रेमिकेला 'तुम्ही' असं संबोधतो. आठ ओळींत पाच वेळा त्याचा हा आदरभाव सूचित झालेला आहे. कवितेच्या आठ पंक्ती कडव्यांत विभागलेल्या नाहीत. त्यामुळे रशियन भाषेत ऐकताना त्या एका श्वासात उच्चारल्याचा भ्रम निर्माण होतो, ''माझं तुमच्यावर प्रेम होतं...'' या पंक्तीची तीनदा पुनरावृत्ती कवितेचा पहिला भाग दोन चतुष्पदींमध्ये आणि नंतर दुसरा भाग दोन द्विपदींमध्ये विभागते. अवकाश आणि काळाचे कोणतेही स्पष्ट निकष इथे दिसत नाहीत; परंतु तरीही नायकाच्या मनःस्थितीच्या गतकाळ आणि वर्तमान या दोन अवस्था जाणवतात. अर्थातच मूळ कवितेची सौंदर्यात्मकता, गेयता भाषांतरात जशीच्या तशी उतरणे अशक्य आहे. खरे तर भाषांतराच्या मर्यादेमुळेच पूश्किन युरोपियन विश्वात फारसा परिचित नव्हता.

पूश्किनची दुसरी एक नितांत सुंदर कविता 'क...' अत्यंत लोकप्रिय आहे. ती आन्ना पित्रोव्ना केर्न हिला अर्पण केलेली आहे. आन्ना ही पूश्किनच्या शेजारणीची नातलग त्रिगोर्स्कयेमध्ये १८२५ च्या उन्हाळ्यात पाहुणी म्हणून राहायला आली होती. त्रिगोर्स्कयेहून तिच्या प्रस्थानाच्या दिवशी सकाळी पूश्किनने तिला त्याच्या 'इवगेनी अनेगिन' या काव्यरूपातील कादंबरीच्या दुसऱ्या प्रकरणाची प्रत दिली. त्यात ही कविताही होती, असे आन्ना केर्नने तिच्या आठवणींत नमूद केले आहे. १८१९ मध्ये सेंट पीटर्सबर्गमध्ये तिच्याशी झालेल्या प्रथम भेटीचे स्मरण पूश्किन कवितेच्या पहिल्या पंक्तीत जागवतो.

के...

मला स्मरतो तो अद्भुत क्षण :
माझ्यासमोर अवतरलीस तू,
क्षणिक दृष्टिक्षेप जसा,
विशुद्ध सौंदर्याची प्रतिभा जणू.

आशाहीन दुःखाची तळमळ
नि दैनंदिन कोलाहलाच्या चिंतेत
ऐकू आला मला खूप वेळ तो कोमल स्वर
नि स्वप्नात आला तो गोड चेहरा.

वर्षे उलटली, वादळी झोताने विद्रोही
विस्कटली आधीची स्वप्नं
अन् विस्मरलो तुझा आवाज कोमल
तुझा चेहरा अद्भुत.

निर्जन प्रदेशांत, कारावासाच्या अंधारात
कंठले मी शांतपणे दिवस
ना ईश्वर, ना प्रेरणा,
ना अश्रू, ना जीवन, ना प्रेम.

साक्षात्कार झाला मनात :
अन् पुन्हा अवतरलीस तू
क्षणिक दृष्टिक्षेप जसा,
विशुद्ध सौंदर्याची प्रतिभा जणू.

नि हृदय धडधडतेय हर्षाने,
नि पुन्हा जिवंत झाले
ईश्वरही, प्रेरणाही
जीवनही, अश्रूही आणि प्रेमही. (१८२५)

मानवी जीवन क्षणभंगुर आहे. या जगात सर्व काही नश्वर आहे. फुले थोड्या काळासाठी फुलतात आणि

अनुक्रमणिका

मानवी जीवनदेखील अल्प कालावधीसाठी टिकते. जीवन आणि मृत्यूची खोल जाणीव करून देणारी 'फूल' ही पूश्किनची कविता प्रसिद्ध आहे :

फूल

सुकलेले गंधहीन फूल
दिसतेय मला पुस्तकात विस्मृतीत गेलेले ;
अन् भरून गेले मन माझे
एका विलक्षण स्वप्नाने :

कुठे उमलले ? केव्हा ? कोणत्या वसंत ऋतूत ?
खूप काळ फुलले होते का ते ? अन् कुणी खुडले
परक्या हातांनी की परिचित ?
अन् का बरे ठेवले इथे ?

स्मृती जपलेली ही नाजूक प्रेमभेटीची
की जीवघेण्या ताटातुटीची,
की एकाकी फिरस्तीची
शेतांच्या निरवतेतील,
जंगलाच्या गर्द सावल्यांतील ?

आहे का तो जिवंत ? अन् ती आहे जिवंत ?
अन् आहे कुठे आता घर त्यांचे ?
की कधीच कोमेजून गेले ते दोघे,
या अज्ञात फुलासारखे ? (१८२८)

डिसेंबर, १८२५ मध्ये निकलाइ (पहिला) या रशियन त्सारच्या विरोधात सेंट पीटर्सबर्ग शहरात एक विद्रोह झाला तो 'डिसेंब्रीस्ट विद्रोह' म्हणून ओळखला जातो. हा विद्रोह दडपण्यात आला. पाच प्रमुख विद्रोहींना मृत्युदंड दिला गेला. इतरांना हद्दपारी आणि सैबेरियात जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.

ही शोकपूर्ण घटना आणि त्यानंतरचे दुःखद अनुभव अलेक्सांद्र पूश्किनची स्वातंत्र्याची भावुक तृष्णा अन् ते प्राप्त करण्याची आशा दडपू शकले नाहीत. त्याची राजकीय मते आणि डिसेंब्रीस्ट क्रांतिकारकांबद्दल सहानुभूती यामुळे त्सारने त्यालाही सैबेरियात हद्दपारीची शिक्षा दिली ; परंतु मित्रांच्या मध्यस्थीमुळे त्याला दक्षिण रशियात पाठवले गेले. पूश्किनचे अनेक मित्र डिसेंब्रीस्ट होते. १८२७ मध्ये त्याने सैबेरियात जन्मठेप भोगणाऱ्या मित्रांसाठी 'सैबेरीयास' ही संदेश कविता लिहून ती डिसेंब्रीस्ट क्रांतिकारकाची पत्नी अलेक्सांद्रा मुराव्योवासोबत पाठवली. अनेक डिसेंब्रीस्ट क्रांतिकारकांच्या पत्नी विवाहबंधनातून मुक्ती न स्वीकारता ऐषारामाचा त्याग करून सैबेरियात आपल्या पतीकडे गेल्या. रशियन इतिहासात त्या 'डिसेंब्रीस्ट पत्नी' या नावाने निरपेक्ष प्रेमाच्या प्रतीक म्हणून अजरामर झाल्या. सैबेरियातील कैद्यांचे शोकात्म जीवन, तिथले अंधारे, विषण्ण वातावरण याची जाणीव पूश्किन कवितेत व्यक्त करतो ; परंतु अखेरीस मुक्तीचा आशावाद जागवतो. १८५५ मध्ये त्यांची आशा साकार झाली आणि डिसेंब्रीस्ट क्रांतिकारकांची मुक्तता झाली.

सैबेरियास संदेश...

सैबेरियाच्या खोल खार्णीत अंधाऱ्या
जपून ठेवा स्वाभिमान अन् सहनशीलता
व्यर्थ नाही जाणार तुमचे कष्ट अपार
विचार अन् उच्च आकांक्षा

आशा, दुर्दैवाची बहीण प्रामाणिक
जागवेल उत्साह अन् आनंद
खिन्न अंधारकोठडीत
येईल तो दीर्घ प्रतीक्षित क्षण

पोहचेल प्रेम अन् मैत्रीही
विषण्ण बंद फाटकातून तुम्हापर्यंत
बंदिवान तुमच्या कोठड्यांत जसा
पोहचेल माझा मुक्त स्वर

तुटतील जड साखळदंड
होतील उद्ध्वस्त अंधारकोठड्या – अन् स्वातंत्र्य,
करेल स्वागत तुमचं प्रवेशद्वारी आनंदानं
अन् देतील मित्र पुन्हा तुमच्या हातात तलवार (१८२७)

अनुक्रमणिका

स्वातंत्र्यप्रेमाच्या चेतनेने ओतप्रोत भरलेली 'चअदाइव यास...' ही अलेक्सांद्र पूश्किनची कविता 'सिव्हिक पोएट्री' या काव्यप्रकारात मोडते. ती एक सार्वजनिक आणि राजकीय कविता आहे. स्वातंत्र्य, निरंकुश सत्तेचे उच्चाटन आणि चांगल्या भविष्यासाठी रशियाच्या प्रबोधनाची गरज हे पूश्किनचे विचार स्पष्टपणे व्यक्त करते.

'चअदाइव यास...' हा काव्यरूपी संदेश पूश्किनने रशियन तत्त्वज्ञ आणि १८१२ च्या नेपोलियनच्या आक्रमणाविरुद्ध झालेल्या 'देशभक्तिपूर्ण युद्धा'त सहभागी असलेला ज्येष्ठ मित्र प्योत्र चअदाइवला समर्पित केला. त्यांच्यात दीर्घ मैत्री तर होतीच; पण स्वातंत्र्यप्रेमी विचार आणि रशियाच्या भावी विकासाच्या मार्गाबद्दल चिंतन हे त्यांना जोडणारे धागे होते. १८२१ पासून चअदाइव 'वेल्फेअर युनियन' या गुप्तपणे काम करणाऱ्या डिसेंब्रीस्ट समाजाचा सदस्य होता; परंतु डिसेंब्रीस्टांच्या पराभवाची प्रतिक्रिया आणि राजकीय छळाच्या काळात त्याने क्रांतीच्या विचारांचा त्याग करून प्रबोधनाची भूमिका आणि विचारांचा स्वीकार केला. डिसेंब्रीस्ट विद्रोहींमध्ये ही कविता एक क्रांतिकारी आवाहन बनली.

चअदाइव यास...

प्रेम, आशा, सहजप्राप्त प्रसिद्धी
फार काळ नाही टिकला आपला तो भ्रम
विरली तारुण्यसुलभ मौज,
जसं विरतं एखादं स्वप्न, पहाटेचं धुकं;
पण धगधगतेय अजूनही आकांक्षा आमच्या अंतर्यामी,
त्या घातक सत्तेच्या जुलुमाखाली
अधीर मनाने
लक्ष आहे आमचं पितृभूमीच्या आवाहनाकडे
प्रतीक्षा करतो आहोत उत्कट आशेने
स्वातंत्र्याच्या पवित्र क्षणांची
जसं तरुण प्रेमिक करतो प्रतीक्षा
प्रामाणिक भेटीच्या क्षणांची
जोवर जळतो आहोत स्वातंत्र्याच्या भावनेने
जोवर जिवंत आहेत आपली हृदयं सन्मानासाठी
माझ्या मित्रा, अर्पण करू आपण पितृभूमीला
आत्म्याचे अप्रतिम आवेग!
विश्वास ठेव, मित्रा : तो उगवेल
तारा मोहक सुखांचा
होईल जागा निद्रेतून रशिया
अन् उद्ध्वस्त अवशेषांवर निरंकुश सत्तेच्या
लिहितील ते आपली नावं! (१८१८)

शैली आणि रचना पाहता हे एक शोकगीतही आहे आणि मैत्रीपूर्ण संदेशही. कवितेत सुरुवातीला नायक आणि त्याचा मित्र परिपक्व होताना दिसतात. तारुण्यसुलभ मौज विरून पितृभूमीची हाक ऐकण्याचा काळ येतो. कवी आणि त्याचा समविचारी मित्र मिळून रशियासाठी 'पवित्र' स्वातंत्र्याचे स्वप्न पाहतात. तो मित्राला स्वातंत्र्याची 'आकांक्षा' साकार करण्यासाठी पितृभूमीच्या सेवेत स्वतःला समर्पित करण्याचे आवाहन करतो. रशियाचा पुनर्जन्म होईल, तो जागा होईल आणि निरंकुश एकाधिकारशाहीपासून मुक्त होईल. ज्यावर त्याचा विश्वास आहे. कविता एका आश्वासक आणि आनंदी आवाहनाने संपते ''...आणि निरंकुशतेच्या अवशेषांवर ते आपली नावे लिहितील!'' त्यात वसीली झुकोव्स्कीच्या 'सिव्हिक पोएट्री'चे प्रतिध्वनी उमटतात. नायकाचे वैयक्तिक, आंतरिक भावानुभव आणि नागरी देशभक्तीच्या भावना हे विलक्षणरीत्या परस्परांत गुंफलेले आहेत. म्हणून स्वातंत्र्य हे प्रेमासम आहे आणि स्वातंत्र्याच्या अपेक्षेची भावना आणि प्रियकराच्या अपेक्षेची भावना समपातळीवर आहेत. 'घातक शक्ती', 'पवित्र स्वातंत्र्य', 'मोहक सुखाचा तारा' या प्रतिमा कवितेला एका उदात्त पातळीवर नेतात; शिवाय कवितेत केवळ मित्राचाच नव्हे, तर संपूर्ण पिढीचा संदर्भ आहे. तो त्यांना 'आपण' म्हणतो, राजकीय क्रांतिकारी कवितेप्रमाणे कवितेच्या शेवटी कृतीचे जोरदार आवाहन आहे. एक मैत्रीपूर्ण संदेश काव्य नागरी आवाहन बनते.

• • •

(भ्रमणभाष : ९८२२४२१८०६
इमेल : megha.pnsr@gmail.com)

अनुक्रमणिका

आमची प्रकाशने

- **मराठी वर्णोच्चार विकास** : डॉ. द. ह. अग्निहोत्री — १००.०० रु.
- **लोकसाहित्यसंपदा** : संपादक - ना. रा. शेंडे — १००.०० रु.
- **आणखी गडकरी** : डॉ. मधुकर आष्टीकर — २५.०० रु.
- **तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७** : डॉ. र. शं. केळकर — ६०.०० रु.
- **'प्रातिभ' : प्रातिनिधिक लघुकथासंग्रह (१९८०)** : संकलन - प्रा. ज. रा. फणसाळकर — १००.०० रु.
- **समग्र बजाबा** : संपादन/संकलन - द. भा. प्रधान — १००.०० रु.
- **ज. के. उपाध्ये यांची कविता** (१८८३-१९९३) : संपादन - डॉ. आशा सावदेकर — १००.०० रु.
- **दक्षिणेतील दोन आचार्य** : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी — २०.०० रु.
- **कविता विदर्भाची** : संपादन - डॉ. आशा सावदेकर — १२५.०० रु.
- **छंदःशास्त्र : एक अध्ययन** - कुंदर दिवाण — ४०.०० रु.
- **वसंतवैभव (कै. व. कृ. व्हराडपांडे)** : संपादन - डॉ. सौ. कुंदा केळापुरे/डॉ. मदन कुलकर्णी — १५०.०० रु.
- **धन्यतेची थाप** (निवडक प्रस्तावना) : डॉ. वि. भि. कोलते — १००.०० रु.
- **वक्ता दशसहस्रेषु** (प्रा. राम शेवाळकर यांची भाषणे) : संपादक - डॉ. वि. स. जोग — १५०.०० रु.
- **विदर्भ साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे : खंड १** - संपादक : तु. ना. काटकर — २००.०० रु.
- **विदर्भ साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे : खंड २** - संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी — २५०.०० रु.
- **युगवाणी साहित्यसूची** : संपादक - डॉ. व. वि. कुलकर्णी — १००.०० रु.
- **युगवाणी साहित्यसूची : (पुरवणी)** : संपादक - केशव जोशी — १००.०० रु.
- **वैदर्भीय मराठी प्रबंधसूची** : संपादक - केशव जोशी — ७५.०० रु.
- **कै. वा. ना. देशपांडे यांचे स्फुटलेखन तीन खंड : तुलाधर, चित्रगुप्त, त्रिविक्रम** : संपादक - प्रा. राम शेवाळकर — १०००.०० रु.
- **विदर्भ साहित्य संघ अमृत महोत्सवी स्मरणिका (११९९)** : संपादन - वामन तेलंग — २००.०० रु.
- **युगवाणी : ग. त्र्यं. माडखोलकर विशेषांक १९९८** : संपादन - डॉ. सुलभा हेर्लेकर — १००.०० रु.
- **युगवाणी** : भालचंद्र नेमाडे विशेषांक : अजय देशपांडे (२०१५) — १००.०० रु.
- **युगवाणी** : त्र्यं. वि. सरदेशमुख जन्मशताब्दी विशेष : संपादक - प्रफुल्ल शिलेदार (२०१९) — १००.०० रु.
- **युगवाणी** : जयंत पवार मुलाखत विशेष विभाग : संपादक - प्रफुल्ल शिलेदार (२०२०) — १००.०० रु.
- **युगवाणी** : महेश एलकुंचवार विशेष विभाग : संपादक - प्रफुल्ल शिलेदार (२०२०) — १००.०० रु.
- **युगवाणी** : कमल देसाई विशेष विभाग : संपादक - प्रफुल्ल शिलेदार (२०२१) — १००.०० रु.
- **युगवाणी** : अरुण कोलटकर विशेषांक : संपादक - प्रफुल्ल शिलेदार (२०२१) — २००.०० रु.
- **युगवाणी** : गोमंतक विशेष विभाग : संपादक - प्रफुल्ल शिलेदार (२०२२) — २००.०० रु.
- **निवडक युगवाणी भाग १**: संपादक : वामन तेलंग — ३५०.०० रु.
- **निवडक युगवाणी भाग १**: संपादक : वामन तेलंग — ३५०.०० रु.

मकर संक्रांत १९२३


विदर्भ साहित्य संघाने आजवर प्रकाशित केलेले दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध.
(पार्सल खर्च वेगळा). टपाल खर्च ४० रुपये वेगळा पाठविण्यात यावा.
संपर्क : सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ/व्यवस्थापक, युगवाणी

अनुक्रमणिका



Prabhakar Kolte - Watercolour on board 2002

अनुक्रमणिका


SK
JEWELLERS
श्रीराम गोविंद
कठाणे
ज्वेलर्स
Shriram Govind Kathane Jewellers
Prop. Ashok Shrirampant Kathane
Saraf Line, Wardha 442 001
: +91-7152-242461
follow us on facebook
https://www.facebook.com/shriramgovindkathanejewellers

अनुक्रमणिका